# मिरा भाईंदर महानगरपालिका
## स्थायी समिती सभा दि. २४/०१/२००८

लालबहादुर शास्त्री स्थायी समिती सभागृह, दुसरा मजला,
दि. २४/०१/२००८

आज गुरूवार दि. २४/०१/२००८ रोजी स्थायी समितीची सभा सुचना क्र. ०८ दि. १७/०१/२००८ रोजीच्या विषयपत्रिकेवरिल विषयांवर विचार विनिमय करण्याकरिता लाल बहादुर शास्त्री, स्थायी समिती सभागृह, दुसरा मजला, मुख्य कार्यालय येथे सकाळी ११.०० आयोजित करण्यांत आलेली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. मॉरस जोसेफ रॉड्रिक्स हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**<u>उपस्थित सदस्य</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. मॉरस जोसेफ रॉड्रिक्स | -- | सभापती |
| २) | श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे | -- | सदस्य |
| ३) | ॲड. एस.ए. खान | -- | सदस्य |
| ४) | श्री. मिलन वसंत म्हात्रे | -- | सदस्य |
| ५) | सौ. शानु गोहिल | -- | सदस्या |
| ६) | सौ. सुनिता कैलास पाटील | -- | सदस्या |
| ७) | सौ. नयना गजानन म्हात्रे | -- | सदस्या |
| ८) | श्री. गणेश गोपाळ शेटटी | -- | सदस्य |
| ९) | श्री. ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | -- | सदस्य |
| १०) | श्री. ओमप्रकाश गंगाधर अग्रवाल | -- | सदस्य |
| ११) | श्री. शरद केशव पाटील | -- | सदस्य |
| १२) | श्री. प्रकाश पांडुरंग ठाकूर | -- | सदस्य |
| १३) | सौ. ज्योत्स्ना हसनाळे | -- | सदस्या |
| १४) | श्री. टेरी पॉल परेरा | -- | सदस्य |
| १५) | श्री. राजु भोईर | -- | सदस्य |

**<u>गैरहजर सदस्य</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. प्रशांत भगवंतराव पालांडे | -- | सदस्य |

**मा. सभापती :-**

नमस्कार, सर्व सन्मा. सदस्य, सदस्या तसेच उपायुक्त साहेब, सचिव हरेश पाटील व कर्मचारी वर्ग आपण आजच्या सभेला उपस्थित असल्यास ही सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडाल अशी अपेक्षा करतो. सर्वांचे धन्यवाद करतो. आणि सचिव साहेबांनी कामकाजाला सुरुवात करावी.

(नगरसचिव यांनी विषय पत्रिकेचे वाचन केले.)

(नगरसचिव यांनी प्रकरण क्र. ३९ चे वाचन केले.)

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मागच्या इतिवृत्तांतामधल्या रुलिंगचे पत्र देणार होता.

**नगरसचिव :-**

सगळ्यांना चार पाच रुलिंग चे पत्र दिले.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

कसले पत्र दिले?

**नगरसचिव :-**

मागच्या सभेत जी रुलिंग झाली होती. तर संबंधितांना कळवलेले आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब कुठले कुठले विषय झाले त्याची कॉपी द्या.

**मिलन म्हात्रे :-**

असा आणखीन एक विषय होता की, ह्या मिटींगला हे जे इतिवृत्तांत आम्ही बोललो. त्याच्यामध्ये ज्या काही प्रोसिडींग आणि ठराव असतात. तर आमच्याकडे फक्त इतिवृत्तांत आले. ठरावाची डेट आली. ह्याच्यात त्याचे

रिफ्लेक्शन नाही. त्या मिटींगमध्ये आपले ठरले होते. ही मिटींग जेव्हा झाली. जे झालेले ठराव आहेत. मागच्या हाउसचे आमचे नाही. ते तुम्ही ठराव दाखवा साहेबांनी सांगितले होते की ते तुम्हांला देण्यात येईल. त्याच्यात तशी नोंद आहे. आपण इतिवृत्तांत मंजूरीला आणले. त्याच्यामध्ये जे ठराव होते ना त्याची आम्हांला काही कल्पनाच नाही.

**नगरसचिव :-**

ठराव दिले. सेट दिलेला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

आम्हांला मिळाला नाही.

**नगरसचिव :-**

मागच्या मिटींगला ठरावाचा सेट दिलेला आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आम्हांला दिलेला नाही.

**नगरसचिव :-**

ठरावाचा सेट दिलेला आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आपल्याकडे किती ठराव आहेत. तुम्ही कुठल्या संबंधित अधिकाऱ्यांना दिले. त्याची जरा आम्हांला माहिती द्या ना.

**नगरसचिव :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे साहेब म्हणतात ना की पाच मिटींग चे जे ठराव होते त्याचा एकत्र बंच सगळ्यांना वाटलेला आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

पण तो बंच मला भेटला नाही.

**मिलन म्हात्रे :-**

मला सुद्धा बंच नाही आला.

**नगरसचिव :-**

त्यादिवशी विभागाने आणला होता.

**मिलन म्हात्रे :-**

एका मिटींगमध्ये मी गैरहजर होतो. कदाचित त्या मिटींगला दिला असेल.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

त्या मिटींगला मी होतो.

**नगरसचिव :-**

ज्या दिवशी तुम्ही गैरहजर होता. त्याच मिटींगला ठरावचा सेट दिलेला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब मग तुम्ही मला ते घरी पाठवायला पाहिजे ना. दि. ३/१/०८ च्या मिटींगला दिला असेल. ती त्यादिवशी गैरहजर होतो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सचिव साहेब तुम्ही जे ठराव संबंधित अधिकाऱ्यांना दिले ते जरा वाचून दाखवा ना.

**नगरसचिव :-**

रुलिंगचे वाचून दाखवतो १) सचिवांसाठी होते ते इतिवृत्तांत सभेत देण्यात यावे. आणि २) पाणी पुरवठा :- महापालिकेसाठी चोरीचे नळ तोडणे व संबंधित पोलिस स्टेशनमध्ये गुन्हे दाखल करणे ३) आरोग्य विभाग :- नगरसेविका ज्योत्स्ना हसनाळे यांच्या वॉर्डमध्ये शेतामध्ये शेण टाकल्यामुळे डासांचा उपद्रव्य वाढला. सदर संबंधित शेतकरी शेतात शेण टाकणे. बंदी करुन त्यांच्यावर योग्य ती कारवाई दोन दिवसात करावी. असे मा. सभापती साहेबांचे रुलिंग आहे. ४) प्रकरण क्र.३५ विषय :- अंदाज पत्रकात २० लाख रुं.ची तरतुद आहे कामाचा खर्च ६० लाख रु. असल्याने त्यामुळे पुर्न विनियोजन कसे करणार? ह्याचा अहवाल पुढील सभेत देण्यांत यावा. ५) प्रभाग समिती क्र. ३ मधील अधिकारी शाळा, समाजमंदीर इ. ठिकाणी फिनायल ९ इतर किटक नाशके वेळच्या वेळी पूरविण्यात यावे. प्रभाग अधिकाऱ्यांनी त्यांच्या प्रभागाकडून साफसफाई तक्रारी व इतर कामकाजावर स्वतः देखरेख ठेवावी. असे मा. सभापती साहेबांची रुलिंग आहे. हे मिटींगला आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

एक ठराव मी मांडला होता. त्या फुट ओव्हर ब्रिजवरती जे होल्डिंग्ज लावले होते. त्याचे ॲग्रीमेंट त्याचा ठराव हे सगळं चुकीचे होते. आणि आपण त्यासाठी पुन्हा स्थायी समितीमध्ये विचार करण्यासाठी आणणार होतो. तुम्ही सुद्धा रुलिंग दिले होते की पुढच्या मिटींगला सदरचा विषय पुन्हा घेणेबाबत.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

तो जाहिरातीचा विषय आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

हो जाहिरातीचा विषय आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो. ) :-**

आपण जाहिरातीचे टेंडर काढणार आहोत. मग, त्यावर चर्चा करणार.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब तो विषय वेगळा आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो. ) :-**

मा. सभापती साहेबांनी त्याच्यावर रुलिंग दिले नव्हते.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब स्वतः सभापती साहेबांनी रुलिंग दिले होते की हे जे सगळं ॲग्रीमेंट झालेले आहे ते सगळं चुकीचे झालेले आहे आणि स्वतः जो विषय आहे तो विषय पुढच्या मिटींगमध्ये पुन्हा आणण्याबाबत सांगितले होते.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो. ) :-**

सन्मा. सदस्यांनी जो मुद्दा मांडलेला आहे. त्यावेळी त्याच्या बद्दल चर्चा झाली होती आणि संबंधित विभागाकडून येणा-या काळासाठी त्यांचे जे जुने ॲग्रीमेंट होते. ते संपत आलेले आहे. जनरल जाहिराती बाबत म्हणत नाही. आणि एक अेजेन्सी निश्चित करुन आपल्याकडे डिटेल अहवाल तयार केलेला आहे. त्याच्याआधारे टेंडर काढण्याचा प्रस्ताव स्थायी समितीमध्ये येणार असल्यामुळे मा. सभापती साहेबांनी तुमची ती चर्चा स्विकारलेली आहे. त्याच्यावर रुलिंग झाली असे मला वाटत नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब रुलिंग झालेली आहे. तुम्ही ती प्रोसिडींग बघा आणि कॅसेट पण पुन्हा वाजवून बघा. आपण स्वतः रुलिंग दिली होती. तुम्ही अधिका-यांना सांगितले होते श्री. लाकडे आणि श्री. मनोहर म्हात्रे साहेब बसले होते. त्यांना तुम्ही सांगितले होते की सदरचा विषय तुम्ही पुढच्या मिटींगमध्ये आणा. साहेब दोन्ही वेगवेगळे विषय आहे. दोन्ही मर्ज करु नका. टेंडर काढण्याचा विषय वेगळा आहे आणि होल्डिंग्जचा विषय वेगळा आहे आणि दोन्ही विषय आम्ही तुम्हांला निदर्शनास आणून दिले होते.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो. ) :-**

होल्डिंगच्या विषय अंतर्गत पुर्ण शहरामध्ये होल्डिंग्ज कुठे असावेत. कमानी कुठे असावेत, जाहिरातीचे साईड निश्चित करुन आपण समाविक निवीदा काढणार आहोत. स्थायी समिती समोर तो अहवाल येणार आहे. म्हणुन तो इंडिव्हीजव्हल विषय आणला नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, त्याच्यामध्ये हा विषय नाही कारण त्यांनी आताच होल्डिंग्ज बसवले असल्यास तो विषय त्याला लागु होत नाही. फुट ओव्हर ब्रिजला आपण जे एन्ट्री मारताना सुरु करतो ना त्याचे जे होल्डिंग्ज लागते.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुम्ही रुलिंग दिली तर अधिका-यांनी त्याच्यात काय केले? तुम्ही रुलिंग वाचली पण त्यांनी केले काय? दोन रुलिंग आणखिन होत्या. एक रुलिंग स्टॅंडींगमध्ये प्रभात समिती मधल्या कामाची निविदा जो पास करणार आहोत. त्या संबंधित नगरसेवकांना त्याच्याबद्दल माहिती द्यावी. दुसरी रुलिंग अशी होती की, गार्डनमध्ये किंवा ज्या ठिकाणी सेक्युरिटी आहे. त्या ठिकाणी मालमत्तेचे नुकसान झाल्या बरोबर प्रभाग अधिका-यांनी त्याची नोंद घेवुन पंचनमा करुन संबंधित खात्याला म्हणजे सिक्युरिटीवाल्यांना पैसे भरायला सांगायचे ह्या दोन रुलिंग होत्या. त्याच्यावर निर्णय झालेला नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो. ) :-**

साहेब, मुद्दा कसा आहे की, मा. सभापती साहेब रुलिंग देतात. सदस्यांनी विचार मांडलेले आहे. हा मुद्दा चर्चेला आला होता पण त्याच्यावर रुलिंग झालेली नव्हती.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

रुलिंग झाली होती ना.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो. ) :-**

त्याच्यावर कुठे रुलिंग झाली होती?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आहे. साहेब, तुम्ही लिहुन ठेवले असेल.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

नाही. तुम्ही फक्त मुद्दा मांडता होता. तुमच्या माहितीस्तव सांगतो. प्रोसिजर मध्ये असे आहे की, सेक्युरीटी असतांना सुध्दा चोरी झाली. तर, ते त्या सेक्युरिटी कडुनच वसुल व्हावे असे कायद्यात अपेक्षित नसते.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

प्रभाग अधिका-यांनी जावुन त्याचा पंचनामा केला. वस्तु काय - काय आहे, काय - काय गेल्या?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

बरोबर आहे. त्याच्यात पोलिस केस दाखल होवु शकते. आणि आतापर्यंत ते आपण करत नव्हतो. ह्याच्यापुढे अशी घटना कोणती झाली ना तर, आपण त्या प्रकरणात पोलिस केस दाखल केली जाईल.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

प्रभाग अधिकारी म्हणतात की, आम्हाला अधिकारच नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपण तसे त्यांना आदेश काढु.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

हाच तर विषय आहे ना. हेच तर रुलिंग झाली ना. की, इंम्प्लीमेंट आजच करणार. त्याला प्रभाग अधिकारी जबाबदार राहिल. समजा, सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे साहेबांनी सांगितले तिकडुन दोन लाईट चोरी झाली....

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

महापालिकेची मालमत्ता प्रभाग अधिका-यांच्या कस्टडीत असो किंवा कोणत्याही अधिका-याच्या कस्टडीत असो. त्याचे जर नुकसान झाले. किंवा त्याबाबतीत चोरी झाली. तर, त्याबाबत संबधित गर्व्हनिंग ऑफिसर जे असतील त्यांनी रितसर त्याचा पंचनामा करुन एक अहवाल मा. आयुक्त साहेबांकडे द्यावे. आणि संबधित पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा नोंदवावा अशी चर्चा झाली होती. त्याचे आदेश निर्गमित करु.

**नयना म्हात्रे :-**

साहेब, त्याला जबाबदार सेक्युरिटी गार्ड नाही का? आता, असे बोलले की, त्याला प्रभाग अधिकारी जबाबदार राहणार. तर, असे कसे प्रभाग अधिकारी जबाबदार असतील?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

प्रभाग अधिकारी जबाबदार नाही.

**नयना म्हात्रे :-**

आपण आता असेच बोलला ना.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

एखाद्या घटनेमध्ये एखादी अफरा - तफर झाली. तर, त्याची जबाबदारी एका सेकंदात निश्चित करता येत नाही. त्याची चौकशी व्हायला लागते. त्याच्यात पोलिसकेस दाखल व्हायला लागते. त्याची डिटेल पंचनामा व्हायला लागतो. आणि त्याच्यात जे दोषी असतील त्याच्यावर कार्यवाही होते. एखादी घटना घडु नये. ह्याच्यावर ही यंत्रणा आहे. म्हणजे घटना घटली तर ती यंत्रणा जबाबदार आहे असे होवु शकत नाही. असे कधीही कोणताही लॉ म्हणत नाही. त्याला डिटेल इनव्हेस्टीगेशन व्हावे लागते. त्या घटना घडु नये. ह्याच्यासाठी आपली जी सुचना आहे.त्या अनुषंगाने लाईटली न घेता. त्याबाबत आवश्यक तो गुन्हा दाखल होणे आवश्यक आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ह्यांचे जबाबदारी कोणाला तरी द्यायला पाहिजे ना. प्रभाग अधिकारी सांगतात की, आमच्याकडे अधिकारच नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मालमत्ता ज्याच्या अधिपत्याखाली असतील त्याचे आदेश निर्गमित करुन त्याची कॉपी आपणाला देवू. असे प्रशासकीय स्तरावर निर्णय घेवु

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

स्थायी समितीमध्ये ज्या प्रभागाच्या निविदा पास होणार त्याला पत्र गेले काय? मागच्या वेळेला चार निविदा पास झालेल्या. त्या नगरसेवकांना तुम्ही पाठवले का? की, तुमच्या त्या कामाची निविदा पास झालेली आहे. तुमच्या प्रभागातले पुढे काम होणार आहे. एक महिन्याने होणार, दोन महिन्याने होणार असे आपण त्या दिवशी ठरलेले होते. नगरसेवकांना पत्र माहिती पडावे.

**शिवाजी बारकुंड (कार्यकारी अभियंता) :-**

त्या संबंधितांना कळवायला पाहिजे. ज्या अगोदर त्यांना इंम्प्लीमेटेंशन राईटिंग मध्ये द्यायचे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

नगरसचिव साहेब, तुम्ही आदेश दिल्यानंतर त्यांनी केलेल्या कामाची टिपणी द्याना वेळ जाणार नाही. आता रुलिंग दिले संबधित खात्याच्या प्रभाग अधिका-यांना आम्हाला विचारायची गरज नाही. आता, रुलिंग आली असती तर, विषय संपला असता.

**एस. ए. खान :-**

संबधित प्रभाग अधिका-यांनी जमा करायला पाहिजे ना येथे कोणच करत नाही.

**नगरसचिव :-**

दुस-या विषयावर रुलिंग दिलेली आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. सभापती साहेब, आमचे हेच म्हणणे आहे. तुम्ही प्रत्येक गोष्टीची रुलिंग देतात. त्याची प्रतिबिंब काय आहे? निविदा आणली बघितली आणि विषय संपला. तुम्ही त्याला पत्र पाठवले आणि तुमच्याकडे उत्तर आले नाही. तुमच्याकडे आले नाही. आमच्याकडे आले नाही. एकच झाले ना.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े ) :-**

जे रुलिंग झाले ना. त्याबाबत प्रशासनाकडे अहवाल आलेला आहे. आणि त्याची कारवाई प्रशासनाने करणे अपेक्षित आहे. ज्या कंन्टीन्यू करणे अपेक्षित आहे ते कार्यान्वित होणे अपेक्षित आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ज्या मिटींगमध्ये जी रुलिंग झाली. समजा, ते अपेक्षित आहे. तुम्हांला मी सांगितले किती ठराव झाले. त्याचे इम्प्लीमेंट नाही. हा आता अपेक्षित आहे. पण ते करत नाही ना. म्हणून आम्ही ह्या मिटींगचा आधार घेवून...

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े ) :-**

आता जे रुलिंगचे मसूदा दिलेला आहे ना. प्रशासन त्याची नोंद घेवून कारवाई करत आहे. बारकुंड साहेबांचा विषय आहे. आरोग्य विभागाचा विषय आहे. स्वतः सचिवांचा एक विषय आहे. तर त्याच्यात निश्चितच नोंद घेवून कारवाई होते ना.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आम्हांला देवून टाका ना की ह्या डिपार्टमेंट मध्ये ह्या कामासाठी रुलिंग दिलेली आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े ) :-**

सचिव साहेबांनी तेच वाचून दाखवले.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आम्हांला द्या ना. वाचून किती लक्षात राहणार आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े ) :-**

सर्वांना रुलिंगची एक एक कॉपी द्या.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

मा. उपायुक्त साहेब, रुलिंग दिली की शेणावर कार्यवाही करा. पण अजून कारवाई झालेली नाही म्हणजे त्यांनी रुलिंग देवून सुद्धा त्याच्यावर कारवाई होत नाही. मग ते योग्य नाही ना. त्यांनी माझ्या विषयावर रुलिंग दिली होती. तर पानपट्टे साहेबांनी काय केले? काहीच नाही केले.

**सुनिता पाटील :-**

म्हणजे एकाही रुलिंगवर कारवाई झाली नाही.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

का करत नाही? ते एवढे आपल्या सगळ्यांसाठी करतात ना. रुलिंग देतात ना. मग, कार्यवाही का करत नाही? ह्याच्यामध्ये कोणाची चूक आहे? अधिका-यांची चुक आहे ना.

**नयना म्हात्रे :-**

अधिकारी चुका करतात म्हणून हा विषय मा. महासभेला येतो.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े ) :-**

शेणाच्या बाबतीत स्वतः उपायुक्त श्री. पानपट्टे साहेब येवून त्याठिकाणी कार्यवाही केलेली आहे. पण त्याला अजून अंतिम बंदोबस्त झालेला नाही. त्याबाबत कालच मा. सभापती महोदयांच्या दालनात चर्चा झालेली आहे. आपल्याला उपायुक्तांनी सांगितलेले आहे की ती कार्यवाही पूर्ण करुन त्याचा आपल्याला अहवाल देवू. त्याच्यावर कार्यवाही होईल. त्यांनी स्वतः एकदा येवून त्याच्यावर कार्यवाही केलेली आहे. तरी दुबारा ते लोक तेच कृत्य करतात.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

तुम्ही गाडया जमा करा.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सा़े.) :-**

कार्यवाही करतो ना. त्याच्या ॲग्रीमेंटची कॉपी तुम्हांला देतो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब मागच्या मिटींगमध्ये आपला काय विषय झालेला? तिथे फुट ओव्हर ब्रिजवर जे होल्डिंग आहे. तर ती गॅन्ट्री जी आहे. ती गॅन्ट्री आता बसवलेली आहे. आणि वरकटर जूना आहे. आणि ॲग्रीमेंटची कॉपी पण जुनी आहे. आणि ती फक्त १०० रु. च्या स्टॅंप पेपरवर आहे. तर आपले मिटींगला ठरले होते की ते सगळं चुकीचे झालेले आहे तर आपण पुढच्या मिटींगला फ्रेश प्रस्ताव आणा. बरोबर आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सा़े.) :-**

साहेब हा प्रस्ताव मा. महासभेला जाईल. फ्रेब्रुवारीच्या महासभेमध्ये हा प्रस्ताव देणार.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

त्याच्यामध्ये तुम्ही हा विषय घेतला का?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त साो.) :-**

हो घेतला आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

कसा येणार? कारण ह्या संबंधित...

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त साो.) :-**

जुन्या ठेक्याचे जे काही होल्डिंग्ज केलेले आहे ते पी.डब्ल्यू.डी. विभागाकडून सगळं केलेले आहे. साहेब येथे सर्व रद्द करुन नव्याने करावे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो ) :-**

एकच करणार आहोत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

ह्या गॅन्ट्री चे तुम्ही रद्द करणार आहे का?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

त्याच्यामध्ये एस्सलवर्डचे आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

नक्की आहे का?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

हो नक्की आहे.

**नगरसचिव :-**

इतिवृत्तांतांत पानप्रमाणे जातो.

**शरद पाटील :-**

पान क्र. १० मध्ये मा. सभापती साहेबांचे रुलिंग आहे. नाव बदलण्याविषयी आहे. तो विषय आपण मा. महासभेमध्ये घेवू या. असे सांगितले होते. तर, तो विषय आपल्याला घेता येईल का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

त्यावेळी सन्मा. सदस्य रोहिदास पाटील यांचा आक्षेप होता.

**शरद पाटील :-**

तो विषय नाही. नाव बदलण्याचा विषय आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

ह्याचे असे असते की, एकदा दिलेले नाव बदलू नये. जर तीन महिन्याचा कालावधी लोटला असेल. तर, मा. महासभा ठरवेल.

**शरद पाटील :-**

मा. महासभा ठरवेल. पण, मा. महासभेमध्ये तसा ठराव आला नाही ना.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

कोणीतरी प्रस्ताव द्यावा आणि विभागाने .........

**शरद पाटील :-**

विभागाकडून त्याचे उत्तर आले पाहिजे ना. बदली झाले तर ते का नाव बदली झाले? त्यांनी उत्तर द्यायला पाहिजे. आम्ही त्यांना विचारले ना आणि मा. सभापती साहेबांचे रुलिंग आहे की, मा. महासभेमध्ये हा विषय घेवू.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

दि. ०६/१२/२००७ च्या बैठकीमध्ये सन्मा. सदस्य शरद पाटील यांनी तो विषय घेतला होता. तेव्हा मा. सभापती साहेबांनी रुलिंग दिले होते की, हा विषय मा. महासभेत घ्यावा. मग, तुम्ही त्याबाबत काही तयारी केली का?

**शिवाजी बारकुंड (कार्यकारी अभियंता) :-**

आपण जी मागणी केली होती. त्याची सविस्तर डिटेल काढायचे काम चालू आहे. आपण मागणी केली होती की, कुठल्या ठरावानुसार कुठली कुठली नावे दिलेली आहे? आणि कुठली नावे बदललेली आहे. गेले तीन चार वर्षाचे सगळे ठराव काढून त्याची माहिती काढायचे काम चालू आहे. त्याची सविस्तर माहिती प्राप्त होताच तुम्हाला माहिती देतो.

**शरद पाटील :-**

कधीपर्यंत माहिती प्राप्त होणार?

**शिवाजी बारकुंड :-**

माहिती प्राप्त करुन देईल. कारण, अर्धवट माहितीवर विषय ठेवणे योग्य नाही.

**शरद पाटील :-**

माहिती कधीपर्यंत प्राप्त होईल ते सांगा? लवकरात लवकर द्या. आता ह्या विषयाचा किती महिने झाले?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

एक महिना झाला.

**शरद पाटील :-**

म्हणजे अजून एक महिना पाहिजे.

**शिवाजी बारकुंड :-**

फेब्रुवारी महिन्यात तुम्हाला माहिती देतो.

**शरद पाटील :-**

ठिक आहे.

**शरद पाटील :-**

पान नं. ३५ वर पुढचे टायर बदलले जातात.

**नयना म्हात्रे :-**

पान नं. ३८ वर मा. सभापती साहेब, गेल्यावेळेस टेम्पोचा विषय निघालेला. त्यावेळेला मी अशी बोललेली की, टॅम्पोवाल्यांचा जो पगार आहे. ड्रायव्हर लोकांचा तलवारने द्यावे. आणि आपल्या आयुक्त साहेबांनी सुध्दा सांगितले की, तलवारनेच पगार द्यावा. पण, तो तलवार पगार न देता आपली पालिका त्यांना पगार देते.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

त्यादिवशी सुध्दा निर्णय झाला ना. मा. सभापती साहेबांनी निर्देश दिलेले की, त्यांचा पगार ठेकेदारकडे वर्ग करावा.

**नयना म्हात्रे :-**

साहेब, पण ठेकेदार पगार देत नाही. तो पगार आपली महानगरपालिकाच देते. कारण त्याचा ठेका इतर कोणत्या माणसाला दिलेला आहे. मग तो पगार तलवारने द्यायला पाहिजे. तर तो तलवार न देता आपणच देतो. असे झाले.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

त्यांची जी रक्कम आहे ना. त्याच्यातून वजा करण्यासाठी आम्ही आदेश देतो.

**नयना म्हात्रे :-**

कधी देता? आता किती महिने झाले? दर महिन्याला २०-३० हजार रु. केले तर किती झाले? त्यांना आदेश काढणार कधी? तुम्ही गेल्यावेळेला रुलिंग दिले होते तेव्हा ते व्हायला पाहिजे होते. पुढच्या महिन्यात ताबडतोब व्हायला पाहिजे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

तलवारचा जो पेमेन्ट असेल ना. त्याच्यातून पगाराच्या ठेक्याची रक्कम असेल ना. त्यांचे वजा करायचे हे मागे ठरलेले होते.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, आजच्या मिटींगला कांबळे साहेब का नाही?

**नयना म्हात्रे :-**

मा. सभापती साहेब, गेल्या मिटींगला औषधाचा विषय निघालेला. म्हणून मी उंदराच्या औषधाबद्दल बोलायला गेली तर मला कांबळे साहेब बोलले की, तुम्ही थांबा. मी तुम्हाला औषध देतो. म्हणून मी काही बोलली नाही. आज पंधरा दिवस झाले. माझ्या घरी मला अजून ते औषध पोहचले नाही. मी असा विचार केला होता की, पहिला औषध मी माझ्या घराच्या बाजूला टाकते. जर त्या औषधाने खरोखरच उंदीर मेले आणि त्याचा काहीतरी फायदा झाला. तर मी पूर्ण वॉर्डमध्ये औषध टाकेल. साहेब, १५ दिवस झाले. त्यांनी मला औषध पाठवले नाही. त्या एस. आय. ला सुध्दा सांगितले की, नयना म्हात्रे मॅडमच्या घराच्या आजूबाजूला औषध नेवून टाका. त्यांचा काहीच ठिकाणा नाही. मग, हे काय चालले? असे चालेल का? नसेल तर तुम्ही आम्हाला नाही म्हणून सांगा की, उंदीर मारायचे औषध आमच्याकडे नाही. तुम्ही मला उत्तर द्या. आम्ही तुम्हाला औषधासाठी लाखो करोडो रु. द्यायचे. नुसते वाया जाण्यासाठी तर ते आम्हाला चालणार नाही. आम्ही बोलत नाही म्हणून असे चालत नाही. आमच्या वॉर्डमधले लोकसुध्दा टॅक्स भरतात.

**मिलन म्हात्रे :-**

आपले आरोग्याचे ठेके जे तलवारला दिले.

**नयना म्हात्रे :-**

साहेब, तुम्ही अगोदर ड्रायव्हरच्या पगाराचे सांगा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मागील दोन सभेमध्ये चर्चा होवून मा. सभापती साहेबांनी त्याच्यावर जाहिर आदेश दिलेले आहे. त्याचा जो खर्च आहे. तो ठेकेदाराकडून वसूल करावा. म्हणजे त्या ड्रायव्हरचा ठेका जरी दुसरा असला. त्याच्यावर होणारा खर्च हा तलवारच्या बिलातून वजा करायला पाहिजे. हे मी संबंधित यंत्रणेला सांगितलेले आहे आणि त्याची कारवाई होणे अपेक्षित आहे.

**नयना म्हात्रे :-**

साहेब, दुसरा विषय असा आहे की, टॅक्स डीपार्टमेन्टचा विषय वेगळा आहे. आणि आरोग्याचा विषय वेगळा आहे. साहेब काल मी हेमंत पाटील साहेबांना फोन करुन सांगितले की, माझ्या आरोग्याची माणस टॅक्स डीपार्टमेन्टला नेवू नका. मी माझ्या मस्टरला हजेरी लावणार नाही. तरीसुध्दा आज हेमंत पाटील यांनी मुकादमला सांगितले की, ठेक्यामध्ये जो मुकादम आहे त्याला माझ्या टॅक्स डिपार्टमेन्टला पाठवा. हा कुठला कायदा? तुम्हाला माणस जर कमी पडत असेल तर तुम्ही मागवून घ्या. माझ्या आरोग्याची माणसं मी देणार नाही. मला हेमंत पाटील साहेबांनी त्याचे उत्तर द्यावे. म्हणजे आम्ही फोनवर सांगतो आणि त्याचे पालन होत नाही. तर ह्याचा अर्थ काय? तुम्हाला तर आम्ही सांगितले की, आम्हाला आरोग्य डिपार्टमेन्टला माणसं वाढवून द्या. ती तुम्ही देणार नाही. आणि आमच्या कडची माणसं तुम्ही कमी करणार. कांबळे साहेब आधी मला उत्तर द्या की, पंधरा दिवसापासून उंदीरचे औषध माझ्या वॉर्डमध्ये अजूनपर्यंत का आणले नाही?

**राजकुमार कांबळे :-**

सदरचे औषध भाईंदर पूर्वेला आहे. ते आणायला सांगितले होते. पण राहून गेले. तर मी ते औषध पाठवून देतो.

**नयना म्हात्रे :-**

ते औषध आजच्या आज आले पाहिजे.

**मिलन म्हात्रे :-**

आमच्या वॉर्डमध्ये गोडाउन मध्ये सुध्दा गेल्या काही दिवसापासून नाही आले.

**राजकुमार कांबळे :-**

ते औषध आताच आणले. तर, ते पाठवून देउ.

**मिलन म्हात्रे :-**

आताच आले पाहिजे. उंदीर मारायची स्कीम तुमच्याकडे पहिल्यापासून नव्हती का?

**राजकुमार कांबळे :-**

उंदीर मारायची स्कीम आपल्याकडे नाही.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही नवीन कायदे तयार करता का? मुंबई महानगरपालिकेमध्ये त्यांनी बक्षीसे ठेवली. पेपर वाचून तुम्ही जागे व्हा ना. खतगांवकर साहेब, आरोग्याचा ठेका तुम्ही सन २००६ ला तलवारला दिला. २००६ तुम्ही ॲग्रीमेन्ट बनवले. ते ॲग्रीमेन्ट तुम्ही पूर्ण वाचले का? त्या एस. आय. ला ॲग्रीमेन्टच्या कॉपी अजून पोहचल्या नाहीत. तुम्हाला वाटत असेल की, आम्ही करतो ते व्यवस्थित करतो. तुम्हीच हुषार आहात असे समजू नका. तुम्ही तुमच्या लिमिटमध्ये रहा. आता एवढे सगळे चालते. कधी एरियात बघितले का? माझ्या वॉर्डमध्ये तुम्ही कधीच फिरले नाही. माझ्या वॉर्डच्या बाजूला मा. सभापती साहेबांचा वॉर्ड आहे. तुम्हाला कधी ऑफिस सोडून पहायला यावेसे वाटले का? त्या टेंडरचा ठेका द्यायचा होता. मग तुम्ही सभागृहात दहा मिनिट अगोदर बसला होता. आज तुम्हाला बोलवायला लागले. ६० लाख रु. आपण त्याला आपण तीन महिन्यात देणार आहोत. त्याच्या औषधामध्ये अजूनही कुठला फरक नाही. आम्ही परवा नाझरेथमध्ये जावून त्याला दाखवून आलो. माझ्या वॉर्डमध्ये अजुन मच्छर मरत नाही परंतु, तुम्ही कधी फेरी मारली का? तुम्हाला एक फेरीसुध्दा मारावीशी वाटली नाही. ऑफीसमध्ये बसायचे की, प्रॅक्टीकलमध्ये काय काम चालले. तो जे औषध देतो ते बरोबर आहे का? त्याच्या औषधामध्ये वास सुद्धा येत नाही. ते ड्युप्लिकेट औषध आहे. भाईंदरमध्ये लेबल लावून घेत असेल किंवा नाही. हे मला माहित नाही. मच्छर केवढे झाले. नाहीतर तुम्हांला तशी मस्ती असेल तर आम्ही आमच्या आघाडीला सांगतो तुम्हांला घरी बसवायचे ठराव करा. ते आम्हांला करायलाच लागेल. तुमची तशी इच्छा असेल तर आपण ते करु या. हे काय चाललेले आहे. कालची गोष्ट घ्या. स्टेशनच्या इकडे तीन डंम्पर भरुन कचरा काढला. सगळं पाणी साचलेले होते. ना तुमचा ठेकेदार औषध फवारणी करत ना मुकादम करत. कोणीही करत नाही. कमसे कम जिकडे लारवा तयार होतो जर ते तुम्हांला नष्ट करण्यासारखे असेल तर पंम्पाने पाणी वगैरे काढून काहीतरी करु शकता ना. तुम्हांला सरळ करण्याकरिता...

**शरद पाटील :-**

साहेब आम्ही वारंवार बोलतो की, औषध फवारणी होते ज्या वॉर्डामध्ये होते. त्या औषधात दम नाही असे मी त्यांना वारंवार बोललेले आहे. तर तुम्ही औषधे चेक करा ना.

**मिलन म्हात्रे :-**

श्री. शिवमूर्ती नाईक साहेब यांच्यासारखा सक्षम आयुक्त पाहिजे. ते बरोबर घरी बसवतात. त्यांनी घरी बसवल्यानंतर तुम्ही मग धावते होतात.

**नयना म्हात्रे :-**

साहेब आज निवडून येवून आम्हांला सहा महिने झाले तर वॉर्ड ऑफीसर साहेबांची आमच्या वॉर्डमध्ये कधी चक्कर देखील नाही. असे का? वॉर्ड ऑफीसरची ती जबाबदारी नाही. का?

**शानू गोहिल :-**

गेल्या वेळेला आरोग्याचा विषय निघाला होता तेव्हा मी पण सांगितले होते की एस.आय. आम्हांला कधी भेटत पण नाही. कधी विचारत पण नाही. तुम्ही तर येतच नाही.

**नयना म्हात्रे :-**

दोन दोन महिने एस.आय. भेटत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही जे ॲग्रीमेंट आमच्या एस.आय. ला दिलेले आहे. त्याच्या मागचे कारण काय?

**नयना म्हात्रे :-**

गेल्या वेळेला सांगितले की एस.आय. बदलायचे आहेत पण अजून एस.आय. बदलले नाही.

**शरद पाटील :-**

त्या एस.आय. लोकांना विचारले ते सांगतात की गोल्डन नेस्टला नाला खोदायचा आहे. तिथे आम्हांला जायला लागते. तिकडची सर्व जबाबदारी आम्हांला दिलेली आहे. तर वॉर्डाची जबाबदारी प्रभागाची जबाबदारी कोणी घ्यायची? तिथे कोणच बघायला येत नाही. कांबळे साहेब तुम्ही तर कुठच्याच वॉर्डमध्ये येत नाही.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

मा. सभापती साहेब आपण एक विषय चर्चेला आणला होता की संपूर्ण एककाचे एस.आय बदली करायचे आहेत आणि जिथे तीन तीन वर्षापासून टॅक्स डिपार्टमेंट चे क्लर्क बसतात. त्यांचा सुद्धा विषय झाला होता की त्यांची पण बदली करायची आहे. त्यांची आपण अजूनपर्यंत कार्यवाही केली नाही.

**नयना म्हात्रे :-**

मा. सभापती साहेब, सगळ्या कर्मचाऱ्यांची बदली करून घ्या. शिपाईंना गणवेश घालायला लाज वाटते. ह्या वेळेला तुम्ही त्यांना टोप्या द्या.

**मिलन म्हात्रे :-**

२००६ मध्ये जो करारनामा झाला तो अजून एस.आय. ला दिला गेला नाही? त्याला कारण काय आहे? कारण एस.आय. सांगतात की त्यांनी औषध कुठचे मारावे? किती मारावे? कुठल्या कंपनीचे मारावे? ते त्या करारनाम्यामध्ये आहे. आपल्या कडच्या एस.आय. ला जर ते ॲग्रीमेंट पोहचत नसेल तर तो काय कसे करणार? आणि त्याचा हिशोब आम्ही कसा घेणार? तो बोलतो की सर्व करारनामे हेड ऑफीसमध्ये आहे. आणि त्या ठेकेदाराने दिले. तिथे काही कागदपट्टया लावलेल्या आहेत माझ्याकडे त्याची कॉपी आली. पण माझा पहिला प्रश्न हा की तुम्ही एस.आय. ला का दिली? आणि त्या करारनाम्यानुसार काम होते की नाही हे बघायला का उभे केले? त्याचे तुम्ही काही २००६ पासून रिमार्क तयार केले का? सफर आम्ही करतो आम्हांला मच्छर दानी घेवून झोपायला लागते.

**शानू गोहिल :-**

लोक आम्हांला विचारतात.

**मिलन म्हात्रे :-**

जर तुमच्याकडून होत नसेल तर सांगा ना सरळ नोकरीचा राजीनामा देवून टाका. कशाला भांडण पाहिजे. तुम्ही ठरावायचे मा. आयुक्त सुदामराव गायकवाड साहेबांनी तुम्हांला पॉवर्स दिले तुम्हांला वाटले की सगळं आभाळ हात लागायला लागले. घनकचरा व्यवस्थापनाची जिम्मेदारी यांच्याकडे नाही. याची अर्धी जिम्मेदारी शिंदे साहेबांकडे आहे. आता जवळ जवळ शहरातला अर्धा भाग त्यांच्याकडे गेला अर्धा भाग पण होत नाही नागरिकांची सगळे बोलणे आम्हांला ऐकायला लागतात. लहान मुले केवढी आजारी आहेत. पोलिस स्टेशनच्या इकडे चाईल्ड स्पेशालिस्ट आहे. तिकडे जावून बघा रात्री १ वाजेपर्यंत डिस्पेन्सरी चालू असते. कोणाला काहीही पडलेले नाही. साहेब सगळे आरामशिर बसलेले आहेत. ॲग्रीमेंट न देण्यामागचे तुमचे प्रोव्हिजन काय आहे ते सांगा? आज तिकडे ५० ग्रॅम जिकडे आपल्याला ३०० ग्रॅम औषध द्यायचे आहे ना. फॉकिंग मशिन तुमच्याकडे किती महिने झाले बंद आहे. माझ्या माहितीनुसार चार महिने झाले फॉगिंग मशिन बंद आहे. मला माहित आहे. त्याला जेव्हा काल लाथा घातल्या तेव्हा त्यांनी काल ५ मिनिटाकरिता फॅागिंग दाखवायला आला होता. साहेब हे काय चालले? त्या फॉगिंगला मशिन सगळ्या आपल्याच आहेत.

**राजकुमार कांबळे :-**

दहा फॉगिंग मशिन चालू आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

चालू आहेत. पण चार महिने झाले अजून आले नाही. पंप पण चालू आहे ते मारत नाही ना. औषध पण आहे पण ते मारतात कुठे? मच्छर चावतात हे त्रिवार सत्य आहे. त्यांच्या उत्तरावर आपण काय जवाब द्यायचे? मी कुठे, बोलतो की फॉगिंग मशिन बंद आहे म्हणून फॅागिंग मशिनचा चार महिन्यापासून वापर नाही. कोणत्या नगरसेवकांनी तुमच्या कडून घेवून वापरले असेल पण माझ्याकडे वापरले नाही. मशिन चालू असून उपयोग काय आहे? एक फॉगिंग मशिन चालवायचे म्हणजे औषध टाकायचे. तुम्हांला सांगतो. जिकडे ३०० मि.ग्रा. ची प्रोव्हिजन आहे त्या ठेकेदाराचे जे मुकादम आहे त्यांना ५० मि.ग्रा. टाकायला सांगितले आणि बाकीच्या ह्याच्यात फिनायल टाकतात. म्हणजे ते पाणी

सफेद दिसते. आपल्याला वाटते की सफेद पाणी म्हणजे त्याचे औषध झाले. निरनिराळे उदयोग आहेत ह्या कॅम्पसच्या खाली ७.३० वाजता. उभे राहू शकत नाही. खतगांवकर साहेब तुम्ही ह्यांना सांगा की आपण एक तास खाली जावून बघूया. आपण एक तास खाली बसायचे. कोणाला काहीही पडलेले नाही. आम्ही दरवेळेला ओरडत रहायचे. तुमचे “ये रे माझ्या मागल्या” काहीच चाललेले नाही.

**नयना म्हात्रे :-**

मी मच्छर मारायची मशिन आणली होती. तर ती पडली की फुटली. जवळ जवळ माझे ७००-८०० रु. मशिनला गेले.

**तुळशीदास म्हात्रे :-**

सर्व एस.आय. ची मिटींग बोलवून त्याप्रमाणे जो करार झालेला तो त्याचे सर्व पत्र व्यवहार त्यांच्याकडे देवून आणि हे मि.ग्रा. किती टाकायचे? ३०० ग्रा.कि. ५० ग्राम टाकायचे ह्याची सर्व माहिती त्यांना द्या.

**मिलन म्हात्रे :-**

जे फिगर आहे त्यांच्याबद्दल काय आहे? मी पण बोलेन. पण २००७-०८ पर्यंतचे करारनामे का दिले गेले नाही? त्याचे उत्तर द्या. कारण आपण त्याला कंन्टीन्यू मुदतवाढ दिली. त्याची मुदतवाढ बघा. जरासुद्धा खंडीत नाही. सांगेल त्या रक्कमेला तुम्ही लोकांनी नगरसेवकांनी मंजूऱ्या दिलेल्या आहेत आणि २००६ चा करारनामा कोणत्याही एस.आय.कडे नाही. तुमच्या मिरारोडला सुद्धा दिलेले नाही आणि त्या एस.आय. लोकांनी मागितले असूनसुद्धा त्यांना दिलेले नाही.

**एस. ए. खान :-**

करारनामा का दिला नाही? ते बायो कंपनीचे आहे ना बायो कंपनीचे वापरतात की कुठल्या कंपनीचे वापरतात?

**मिलन म्हात्रे :-**

बाहेर वगैरे काहीही नाही. तुम्ही ते करारनामे दिले का नाही त्याचे मला पहिले उत्तर पाहिजे. तुम्हांला अडचण काय होती ते पहिले सांगा? आणि तो करारनामा आजही तुमच्याकडे आहे आणि सचिव साहेबांकडे सुद्धा आहे. तुम्ही दिले का नाही. त्याचे ॲक्ट कसे काय बनवणार? साहेब त्याची कार्यवाही कशी होणार? तो तर बोलतो मला माहित नाही. हा काय मारतो ते बरोबर आहे. आज तुम्ही त्याला बायर इंडियाची औषधे मारायला सांगतात. तो फिनायल मारतो. तो बोलतो बरोबर आहे. खतगांवकर साहेब तुम्ही एखाद्या एस.आय. ला दोषी पकडले की तुझ्या एरियामध्ये डेंग्यू ची दहा माणसं मेली. त्याचे मूळ कुठे येणार? त्याचा बेस येणार आहे. त्याच्याकडे त्यांनी काय कार्यवाही करायची. ह्यांनी त्याला सांगायचे की हे करारनामे झाले. ह्यानुसार तुम्ही त्याच्याकडून काम करुन घ्यायचे आहे. ह्यांनी मूळ करारनामे दिले नाही. म्हणजे ते ही मोकळे हे ही मोकळे करारनामा कपाटामध्ये.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

कांबळे साहेब तुम्ही एस.आय. ला आदेश काढले नाही का? जी औषध कोणत्या प्रमाणात टाकायला पाहिजे.

**राजकूमार कांबळे :-**

करारनामा दिला नाही. पण आदेश दिलेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

करारनामा का दिला नाही. ह्याचे मला आधी उत्तर द्या. आदेश वगैरे मला माहित नाही. आदेश तुम्ही दिवसाला दहा काढा. तुमचे काय एक कागद काढा त्याच्यावर सही करा की, झाले. खाली कोण गेले का? की आदेशाचे इंम्प्लिमेंट बघायला कोण गेले का? मग तुम्ही आदेश...

**नयना म्हात्रे :-**

मा. सभापती साहेब गेल्यावेळेला एस.आय.लोकांची बदली करायची होती. तर त्याचे काय झाले? किती महिने झाले त्या गोष्टीला? बदली का नाही होत? आपले आयुक्त येणारच नाही. असे मला अंदाज झालेला आहे. मिरा भाईंदर शहराला आयुक्त येणारच नाही. तो पर्यंत सगळी कामे तशीच राहणार का?

**मा. सभापती :-**

आयुक्त आहेत ना.

**नयना म्हात्रे :-**

मग, मला त्यांनी उत्तर द्यावे आतापर्यंत एस.आय. ची का बदली झाली नाही?

**मा. सभापती :-**

मा. आयुक्त साहेब, आले नाही. तरी उपायुक्त साहेब आहेत ना.

**नयना म्हात्रे :-**

मग, मला त्यांनी उत्तर द्यावे.

**मिलन म्हात्रे :-**

विषयाचे विषयांतर करु नका. मला पाहिजे ह्याचे उत्तर द्या की, करारनामा न देण्यामागे काय कारण आहे? इन्टेशन काय आहे? त्याचा पहिला इथे तुकडा पाडा. मग बाकीची चर्चा करा. कारण आमच्या इकडे एस.आय.

म्हणतात की, आम्हाला करारनामा मिळालेला नाही. त्यामुळे ह्या ठेकेदाराने काय करायचे ते आम्हाला माहित नाही. अडचण काय होती ते सांगा? त्याचा खुलासा करा.

**राजकुमार कांबळे :-**

आदेश दिले होते.

**मिलन म्हात्रे :-**

ते आदेश काय द्यायचे? त्या ॲक्टमध्ये सगळे आदेश दिलेले आहेत. तुम्ही काय आदेश देणार? ह्याच्यात एस. आय. ने काय करायचे ते क्लिअरकट आहे. तुम्ही काय आदेश देणार? ह्याच्या व्यतिरिक्त काय आदेश देणार आहेत? की, १०० तासामध्ये हजार मारा म्हणून तुम्ही काय उत्तर देता?

**राजकुमार कांबळे :-**

ॲग्रीमेन्टमध्ये जे होते ना की, काय काय वापरायचे त्याचा आदेश दिला होता.

**मिलन म्हात्रे :-**

त्यांना आदेश काय दिले?

**राजकुमार कांबळे :-**

त्यांना हे जे टेंडर दिलेले आहे. त्या अनुषंगाने ही औषधे वापरायची आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

कुठची?

**राजकुमार कांबळे :-**

करारनामामध्ये जे दिले.

**मिलन म्हात्रे :-**

आणि करारनाम्यानुसार औषधे वापरली नाही तर काय करायचे? ते आदेशामध्ये काहीच दिले नसेल. ते सगळं सोयीस्कर पडेल.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

शहरामध्ये डास इतके वाढले आहेत ही वस्तुस्थिती आहे. आणि प्रत्येक सभेमध्ये चर्चा होते. तर तुम्ही स्वतः सर्व एस. आय. ची मा. सभापती साहेबांकडे आमच्या सर्वांची बैठक लावा. त्यांना ते प्रत्यक्षात दाखवा. त्या तलवारला बोलवा. आणि इफेक्टीव्ह काही तरी कॅम्पेन करा ना की, जेणेकरुन पंधरा दिवसामध्ये सदस्यांना फिल व्हायला पाहिजे, नागरीकांना फिल व्हायला पाहिजे की, ह्याच्यावर कंट्रोल झालेले आहे. आपली किती पद आहेत त्याच्यावर आपण चर्चा करतो.

**मिलन म्हात्रे :-**

त्या करारनाम्यामध्ये त्या माणसानी कुठली कुठली मालमत्ता वापरायची नाही. जसे, तिकडचे पंप, प्लास्टीकचे पंप, औजारे, गाडी ........

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

कोणतीही परिस्थिती कंट्रोल केलेली नाही तर, शहरात एक दिवस डेंग्यु होईल, मोठी साथ होईल आणि काहीतरी मोठी आपत्ती होईल.

**मिलन म्हात्रे :-**

भिवंडीमध्ये हत्तीरोग सुरु झाले. मिरारोडमध्ये डेंग्युचा एक पेशन्ट होतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. सभापती साहेब, तुम्ही आता डेंग्युचा विषय काढला. डेंग्यु रोगाने ३१ वर्षाची मुलगी वारली.

**राजकुमार कांबळे :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो की, मा. उपायुक्त खतगांवकर साहेबांच्या दालनामध्ये सभा आयोजित करतो आणि योग्य पातळीवर औषध फवारणी कसे करायचे. त्याचे नियोजन करतो.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही तो करारनामा दिला का नाही? ह्याची अडचण काय होती? हा प्रश्न परत परत बोलतो. तुम्ही विषयाला बदलू देउ नका. तुम्हाला करारनामा न देण्यासाठी अडचण काय होती ते सांगा. कायद्यात तरतुद आहे. त्यांना करारनामे द्यायचे नाही. ह्या ॲक्टमध्ये दिलेले आहे. एस.आय. ने काय करायचे? मला त्याचे उत्तर पाहिजे. तुम्ही आत काय दिवे लावले ते आम्हांला नाही पाहिजे आणि तुमच्याने होत नसेल. माझ्या वॉर्डमध्ये जेवढे तुंबलेले पाणी आहे ते सगळं मा. आयुक्त साहेबांच्या आणि तुमच्या टेबलवर घेवून येईन आणि टाकेन. तुम्हाला माझ्याबद्दल काय करायचे ते करा. आम्ही तुमचे मुकादम नाही. रस्त्यावर उभे रहायचे तुम्ही इकडे ए.सी. मध्ये बॅटींग तुडवत रहायची आणि तुमच्या ऐवजी आम्ही उन्हामध्ये काम करुन घ्यायचे आणि तापायचे. आज स्टेशनला पूर्ण दिवस काम झाले. तुम्हाला दहा वेळा फोन लावलेला महापालिकेने तुम्हाला दिलेला फोन आम्हाला त्याचा काय उपयोग? तुम्हाला ही टिंगळ टवाळी वाटली की काय? आम्ही एक-एक पूर्ण दिवस उभे राहतो आणि तुमचा एस.आय तिकडे नाही. त्यांना फोन करुन बोलवायला लागते. जे.सी.बी. आला अर्धवट काम करतो आणि बोलतो डिझेल संपले असे म्हणून तो चार तासाने येतो. कामगिरीवर गेलेले वाहन तुमच्याकडे डिझेल नाही म्हणून परत कसे काय येते? म्हणजे तुमच्या वाहनांवर तुमचे लक्ष नाही.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे साहेब, तुम्ही जे बोलता ते बरोबर आहे. कांबळेवर ह्याच्यापूढे कार्यवाही केली जाईल. त्यांना मी सांगतो एस.आय. ची मिटींग घेवून त्यांच्यावर सात दिवसात परिणाम नाही झाला. तर, कांबळेवर जी कार्यवाही करायची ती करा. असे मी रुलिंग देतो. जर त्यांनी एस.आय. ची मिटींग घेतली आणि ईस्टचे वेस्ट, आणि वेस्टचे ईस्ट मध्ये जेवढे एस.आय. आहेत त्या सर्व एस.आय. ची बदली करुन फवारणी कशी करायची ते त्यांना आश्वासन द्यायला लावतो.

**मिलन म्हात्रे :-**

कांबळे ने काय करायचे?

**ध्रुवकिशारे पाटील :-**

मा. सभापती साहेब, तुम्ही जे बोलला की, ईस्ट - वेस्ट आणि वेस्ट - ईस्ट हे तुम्ही बरोबर बोलला का?

**नयना म्हात्रे :-**

मा. सभापती साहेब, तुम्ही गेल्यावेळेला रुलिंग दिली होती की, एस.आय. लोकांची बदली करा. तर, आतापर्यंत का नाही झाली?

**ध्रुवकिशारे पाटील :-**

मा. सभापती साहेब, मिरारोडचे जे एस.आय. आहेत त्यांची अजूनपर्यंत बदली झालेली नाही. जर त्यांची बदली केली आणि त्यांना वरुन पॉलिटीकल प्रेंशर आले मग काय करणार?

**मा. सभापती :-**

कांबळेना काढणार.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

दुसरा मुद्दा जो होता तो एस.आय., इतर लिपिक आणि शिपाई यांचा कालावधी झाला. तर त्यांची बदली करावी. त्याबाबत आस्थापनाने सर्व माहिती तयार केलेली आहे आणि येणा-या पंधरा दिवसामध्ये. सर्व लोकांच्या बदल्या केल्या जाणार आहे. मा. आयुक्त साहेबांकडे याबाबत चर्चा सुध्दा केलेली आहे. त्यांचे म्हणणे असे आहे की, परमनन्ट आयुक्त आले तर त्यांच्या सहीने अंतिम काढा. ते जर नाही झाले तर मी निर्णय घेईन. तर, तसा गोषवारा आम्ही तयार करुन त्यांच्यासमोर सादर करतो.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, परवा एवढी दुर्देवाची गोष्ट झाली. आर.डी. शिंदे साहेबांनी डायरेक्ट तलवारशी फोन करुन बोलले. म्हणजे आपल्याकडे कांबळेचा काही पार्टच नाही. कमिशनर साहेबांना डायरेक्ट ठेकेदाराशी बोलायला लागते की, ७ दिवसात तु आम्हाला हे काम करुन दे. योगायोग असा होता की, त्याच्याबरोबर मी होतो आणि मी त्यांच्याशी फोनवर बोललो.

(सन्मा. सदस्य ॲड. एस. ए. खान यांनी प्रकरण क्र. ३९ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**एस. ए. खान :-**

दि. ०६/१२/२००७ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्यांनी सुचविलेल्या दुरुस्तीसह व सुचनांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**शानु गोहिल :-**

ह्या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**प्रकरण क्र. ३९ :-**

दि. ०६/१२/२००७ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. २९ :-**

दि. ०६/१२/२००७ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्यांनी सुचविलेल्या दुरुस्तीसह व सुचनांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- ॲड. एस. ए. खान.** **अनुमोदनः- श्रीम. शानु गोहिल.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**
**ठराव वाचुन कायम करण्यात आला**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा- भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिव यांनी प्रकरण क्र. ४० चे वाचन केले.)

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ४०, मिरा भाईंदर महानगरपालिकेकडे हस्तांतरीत झालेल्या आरक्षित जागा (बगीचे, क्रिडांगण, शाळा) विकसीत करणेकामी दिलेल्या मंजुरीबाबत फेरविचार करणे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. सभापती साहेब, हा जो विषय आणलेला आहे. तो स्थायी समितीमध्ये आणू शकतो का? कुठच्या नियमाने, कशा पद्धतीने त्याच्यावर फेरविचार करता येईल? हा ठराव येथे करता येतो का? ह्याच्यावर आपण काय निर्णय घेणार? ह्या विषयाला पुन्हा मा. महासभेत पाठवल्याची तरतुद आहे का? ह्या विषयावर मुख्य आहेत त्यांनी माहिती द्यावी.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका विकास योजनेतील जे आरक्षण आहे, त्याची अंमलबजावणी विविध माध्यमातून करण्याचा हा भाग आहे. सर्वच आरक्षणाच्या जागेत भुसंपादन करणे शक्य नाही. कारण आपल्याला त्याची खुप मोठी रक्कम अदा करावी लागते. दुसरा भाग असा की, समायोजनाच्या आरक्षणातून आणि टी.डी.आरच्या माध्यमातून आपल्याला काही महापालिकेकडे आरक्षण वर्ग करुन महापालिकेचा खर्च न करता बी.ओ.टी पद्धतीने विकसित करण्याचे धोरण मा. महासभेसमोर आले होते. आणि त्या माध्यमातून प्रकरण क्र. ४० चा जो विषय स्थायी समितीसमोर घेण्यात आलेले आहे. त्यात एकूण ह्यापूर्वी १२ प्रस्तावाचे निर्णय झालेला आहे. सदर १२ प्रस्तावापैकी ४ प्रस्तावाचे ॲग्रीमेंट घेवून वर्क ऑर्डर दिलेले आहे. त्यामध्ये एक प्रस्ताव शिवार गार्डनचा बांधकाम विभागाकडून करण्यात आलेला आहे. उर्वरित ३ प्रस्ताव हे नगररचना विभागाकडून करण्यात आलेले आहे. नगररचना विभागाकडून ती प्रस्ताव झालेले आहेत. त्यापैकी आरक्षण क्र. ९६ क्रिडांगण हे पूर्ण विकसित झालेले आहे. ह्यांना इतर दोन प्रस्तावाची वर्क ऑर्डर दिलेली आहे. पण, तीन अंतिम कामे सुरु झालेली नाही. इतर उर्वरित चार प्रस्तावाच्या ऐवजी जे १२ प्रस्ताव आहेत. त्यातल्या ८ प्रस्तावांना कार्यादेश देण्याचे बाकी आहे. तर ह्या संबंधात जे कामे प्रस्तावित झालेले आहे. तर त्याच्यावर काही ॲग्रीमेंट किंवा त्याच्या परिस्थिती हे सर्व स्थायी समितीने मान्य केलेले आहे. तर त्यात फेररचना करत असताना आपण ठेकेदाराला आदेश दिलेले आहेत. तर त्याच्यामध्ये काय निर्णय घ्यायचा आहे ते सामोपचाराने घ्यावा लागेल. आणि ज्याच्यामध्ये कार्यादेश दिला नाही. त्याच्यावर स्थायी समितीने निर्णय केलेले आहेत. जर, त्याचा कालावधी तीन महिन्यापेक्षा जास्त झाला असेल. स्थायी समिती जे मा. महासभेच्या धोरणाच्या अंतर्गत केलेले प्रस्ताव आहे. त्याच्यावर त्यांना फेरविचार करता येईल.

**तुळशीदास म्हात्रे :-**

एक आरक्षण क्र. ९६ चे झालेले आहे. आणखीन कुठले दोन तीन झालेले आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.):-**

सुरवातीला आपल्याला सांगितल्याप्रमाणे मुख्य बाब अशी आहे की, महापालिकेचा खर्च न होता. जे महापालिकेशी प्रस्तावित आरक्षण आहेत. त्याच्यावर अतिक्रमण न होता ती जागा नागरिकांसाठी वापरण्यात यावी. ह्या दृष्टीकोनातून हा केलेला एक प्रयोग आहे आणि अशा पद्धतीचे कामे इतर महापालिकेमध्ये सुद्धा हाती घेत आहेत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

हा विषय शहराच्या दृष्टीने फार महत्त्वाचा आहे त्यावेळी मा. महासभेमध्ये निर्णय झाला की, अतिक्रमण होतात म्हणून काहीतरी निर्णय घेतला पाहिजे. म्हणून घेतला. त्यानंतर मा. महासभेत जे निर्णय घेतलेले आहे. समिती स्थापन करायची समितीचा अहवाल इतिवृत्तांत कुठेच काहीही नाही. मी येथे आता एक गोष्ट विचारणार आहे. त्याबद्दल संबंधित अधिकारीने आम्हांला सांगायचे आहे आणि पहिली गोष्ट म्हणजे की जे चार आरक्षण दिलेले आहे. त्याच्यामध्ये माहितीच्या अधिकारामध्ये विचारले असताना एक आरक्षण जी निविदा मंजूर झाली होती. पण अद्याप निर्णय झालेला नाही. असा त्याच्यात शेरा दिलेला आहे. म्हणजे निविदा काढली. ज्यांनी निविदा भरली त्याला सेंन्शन झाली, मग शेरा मारला अदयाप निर्णय झालेला नाही. ह्याचा काय अर्थ आहे?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.):-**

त्यांनी त्याचा कार्यादेश दिलेला आहे. कोणत्या बाबतीत होते?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

बहूतेक चौथ्या आरक्षणामध्ये होते. आरक्षण क्र. ३०० चे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.):-**

आरक्षण क्र. १९१ ला एक दिलेले आहे. ह्या टिपणीतील पेज क्र. १ मध्ये नं. १ ला कार्यादेश दिलेले आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

झालेल्या कामाचे नंतर विचारु.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.):-**

पुढच्या पेज क्रमांकावर १,२,३,.... ह्या तिघांचे आदेश दिलेले आहेत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

अद्याप निर्णय नाही. ते कुठले आरक्षण आहे?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा.):-**

आरक्षण क. ११६.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

त्याच्यावर निर्णय काय होते?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा.):-**

स्थायी समिती समोर येण्यासाठी.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

चार चे निर्णय झाले होते. त्याच्यातले एक त्यांनी घेतले नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा.):-**

चौथ्या बाबतीत काय निर्णय झाला होता. आरक्षण क्र. ११६ प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान बाबत अमरदिप शिक्षण संस्था यांनी २५ लाख रु. ची बँक सॉलवन्सी व ३ लाख ३३ हजार पेक्षा जास्त भाडे देत असतील तर त्यांचे निविदेस मंजूरी देण्यात येते. मला वाटते त्याप्रमाणे त्यांनी संमती दिली नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब त्यांनी संमती दिलेली आहे. बँक सॉलवन्सी २५ लाख रु. दिलेली आहे आणि संमती पण दिलेली आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा.):-**

संबंधित यंत्रणेला कार्यालयातून पत्र सुद्धा दिलेले आहे. पण, त्यांच्याकडून अपेक्षित उत्तर नाही. म्हणून त्याच्यावर निर्णय झालेला नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आपल्या पालिकेला पत्र दिलेले आहे. ३ लाख ३३ हजार रु. पेक्षा भाडे देणार आहे आणि २५ लाख रु. ची बँक सॉलवन्सी सबमिट केलेली आहे. असे त्यांनी आपल्या पालिकेला पत्र दिलेले आहे. बहूतेक मा. आयुक्त साहेबांना दिलेले आहे. पत्राबरोबर सॉलवन्सी सर्टिफिकेट पण अॅटेच केलेले होते.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मग निविदा काढली कशी? जर त्याच्याकडून तुम्हांला बँक सॉलवन्सी मिळाली नाही. तर तुम्ही त्याला निविदा कसे धरणार? त्याचाच निर्णय झालेला आहे तर असा झालेला आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा.):-**

स्थायी समिती मध्ये जो निर्णय झालेला आहे. तोच आम्ही पाठवला.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

कुठला?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा.):-**

२५ लाख रु.ची बँक सॉलवन्सी आणि ३ लाख ३३ हजार रु. मासिक भाडे जर त्यांनी दिले. तरच त्याची निविदा मंजूर करा असा ह्याच्यामध्ये उल्लेख आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

माझा जो ठराव आहे. ह्याच्यामध्ये उल्लेख नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा.):-**

शेवटच्या पेजवरचा मुद्दा आहे. त्याच्यावर पुर्तता अजून झालेली नाही. त्या प्रकरणात काय झाले होते की अनु. क्र. २ आहे ना. प्राथमिक शाळेचे मैदान विकसित करणे. मनि भद्र विर चॅरेटेबल ट्रस्टसाठी प्रशासनाने रिकमन्ड केलेले होते. पण स्थायी समितीने अमरदीप शिक्षण संस्था देत असेल तर त्याला ते करावे लागेल असे झालेले आहे म्हणून त्याची अंमलबजावणी होवू शकली नाही. त्याच्यामध्ये तीन संस्था होते बाबुलाल मिसरी लाल वर्धन, मनीभद्र विर चॅरेटेबल ट्रस्ट, अमरदिप शिक्षण संस्था आणि प्रशासनाकडून ठेवले होते मनीभद्र विर चॅरेटेबल ट्रस्टसाठी.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

त्यांनी दिलेले आहे. मग खालची जी निविदा होती त्याला तुम्ही पत्र का दिले नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा.):-**

दिले ना. त्याला पत्र दिले की हे पुर्तता करुन घ्या.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

त्याची पण कमीची होती ना.

**दिलीप घेवारे :-**

साहेब कमीची होती पण मंजूर केलेली ती घेणार ना.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा.):-**

कमीची होती. पण मंजूर करताना हे आता टाकून स्टॅण्डींग कमिटी ने केले ना.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मनीभद्र विर हे करत नाही. मग ह्याची...

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा.):-**

अमरदिपला पत्र दिलेले आहे. पण अमरदिपकडून अपेक्षित सॉलवन्सी आणि भाडयाची ती संमती पाहिजे ना. ती त्यांनी दिलेली नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब तुम्ही एक करोड रु. देताना आमच्याकडे मोठमोठ्या गोष्टी करता. ह्या ठरावामध्ये लिहिलेले आहे. त्याला पत्र पाठवले मग इकडे का उल्लेख केला नाही?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा.):-**

आपण पत्र पाठवलेले आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुमचे इंन्टेनशन चुकीचे आहे. तुम्ही इकडे इन्टेनशनने व्हेरिफिकेशन का केले नाही? तुम्ही लिहिले की त्याला जर हा देत असेल तर आम्ही देतो. दुसऱ्यांने मागणी केली. बाकीचे येथेच आहे. मग तुम्ही अंतर का दिले नाही? त्याची पुर्तता का झाली नाही? तुम्ही व्हेरिफिकेशन का केले नाही? जर त्यांनी आम्हांला दिले नाही तर आम्ही अमरदिपला देवू अमरदिपला आम्ही पत्र पाठवलेले आहे. ह्याच्यात उल्लेख का केलेला नाही.

**दिलीप घेवारे :-**

त्यांनी पत्र पाठवले? ठराव झालेला आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आम्ही जेव्हा माहितीच्या अधिकारात मागितले त्यावेळी तुम्हांला देता येते की नाही? तुम्ही आम्हाला एवढीच कॉपी दिली? त्यानंतर जे पत्र व्यवहार झाले. ह्या विषयावर तुम्ही आम्हांला एकही पत्र दिलेले नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा.):-**

तुमच्या लक्षात मुद्दा आला का? अमरदिपला प्रशासनाने पत्र दिले. ठरावानंतर दिले. अमरदिपकडून अजून रिसपॉन्स आला नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, तुम्ही परत एकदा खात्री करुन घ्या. कारण, कमिशनर साहेबांनी पत्र दिले होते. कदाचित टाउन प्लॅनिंगला पत्र गेले नसेल.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

म्हणजे अमरदिपचे पत्र तुमच्याकडे नाही ना.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा.):-**

त्यांनी बँक सॉलवन्सी संबंधित पत्र द्यायला पाहिजे. नुसते पत्र देवून कसे होईल.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुमच्याकडे काही नाही ना. तुम्ही लिहिले की प्रशासनाने पुर्तता केली नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा.):-**

हो. त्यांनी पुर्तता केली नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आपण जर मा. महासभेचा ठराव वाचला, तर मा. महासभेच्या ठरावामध्ये. दोन वेळा संशोधन केलेले आहे. आणि शेवटी सहाय्यक रचनाकार, गटनेता, मा. आयुक्त, मा. उपमहापौर, मा. महापौर, विरोधी पक्ष नेता ह्यांची कमिटी स्थापन करुन निर्णय करायचे. त्यानंतर तुमची बैठक दि. २७/२/०७ ला झाली. त्यामध्ये ही बैठक रद्द झाली होती. त्यानंतर ती बैठक कधी झाली त्याचा कुठे उल्लेख नाही. त्याची इतिवृत्तांताची कॉपी मागितली होती. त्या गटनेतेच्या मिटींगमध्ये कोण कोण गटनेते होते, विरोधी पक्ष नेते कोण कोण होते. ह्याच्यात काहीही नाही. दि. २७/२/०७ ला ही सभा होते. दि. २६/४/२००७ रोजी बैठक झाली तर त्यात नियमावली सुचनासह मंजूरी दिली. त्या दि. २६/४/०७ च्या इतिवृत्तांताची कॉपी आम्हांला मिळाली नाही. मी स्वतः मागणी केली असताना आम्हांला मिळाली नाही. आज सुद्धा इतिवृत्तांत त्याचे द्यायला पाहिजे होते. आजच्या ह्या बैठकीमध्ये काय नियमावली आहे. हे विचार करण्यासाठी आलेले आहे. दि. २६/४/०७ ला जी बैठक झाली त्या बैठकीमध्ये हे ठरलेले आहे. गटनेते, विरोधी पक्षनेते सर्व उपस्थित होते. त्यात काय नियमावली झाली. आज स्थायी समितीच्या चार बैठका झाल्यानंतर ह्याच्यापुढे निर्णय होणार. आजची टिपणी देताना आम्हांला दिलेली नाही. ती नियमावली माहितीच्या अधिकारामध्ये मागितली असताना सुद्धा आम्हांला ती माहिती दिलेली नाही. साहेब, तुम्ही आता जे निविदा मंजूरीबाबत दिलेले आहे. ह्याच्यामध्ये दि. २६/४/०७ ला बैठक झालेली आहे. दि. ९/५/०७ ला मा. आयुक्त साहेबांनी त्याला मान्यता दिली आणि निविदा निघते दि. १२/२/०७ म्हणजे आयुक्त साहेबांचे दिलेले आदेश आधी की निविदा आधी. जर मी कुठे चुकत असेल तर येथे मला सांगा. सदर करण्यात आलेली निविदा सुचना देण्याबाबत मा. आयुक्त साहेबांनी दि. ९/५/०७ ला आदेश दिले होते. त्या अनुषंगाने दि. १२/२/०७ ला दैनिक पत्र...

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा.):-**

साहेब येथे दि. १२/५/०७ आहे.

**शरद पाटील :-**

ह्याच्यात दि. १२/२/०७ दिले.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.):-**

प्रिंटींग मिस्टेक होवू शकते ना. दि. १२/५/०७ आहे. तुम्ही मुद्दा मांडा ना.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब पाठीमागे दि. १२/५/०७ दिलेले आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.):-**

आपल्याला जी शंका आहे ती शंका सांगायला पाहिजे. पण तुम्ही अर्धवट मांडता.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ही शंका मोठी होती. दि. ९/५/०७ ला आदेश देतात आणि दि. १२/२/०७ ला निविदा कशी निघणार?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.):-**

एवढाच आक्षेप आहे ना. साहेब, तुम्ही तुमचे मुद्दे मांडा ना. तुम्हांला दुरुस्तीचे नंतर सांगतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब तुम्ही दुरुस्ती काय सांगणार? आपले एवढे मोठे शिकलेले अधिकारी आहेत. तुम्ही फक्त आम्हांला सांगता. जे चार चार, पाच पाच डिपार्टमेंटची माणसे त्यांनी सुधारायला नको ही गोष्ट प्रत्येकवेळी आम्हांला बोलता की तुम्ही बोला. तर हे एवढी द्यायला नको.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.):-**

हा विषय येथे धोरणात्मक निर्णयासाठी घेतलेला आहे. चुक हा वेगळा विषय आहे. येथे अशी चर्चा होणे हा विषय घेण्याचे कारण की ह्या झालेल्या प्रस्तावामध्ये महापालिकेला अजून काही सुधारणा करण्यासाठी स्थायी समितीमध्ये हा विषय घेतला असेल. ह्याबाबत चर्चा होणे अपेक्षित आहे. आपल्याला कोणत्या मुद्दयावर चुकीचा निर्णय झाला असेल तर त्याची चर्चा होणे अपेक्षित आहे. एखाद्या वेळेला दिनांकामध्ये म्हणजे अमुक तारखेला मान्यता दिली. अमुक तारखेला निविदा काढली. तर त्या प्रिंट मध्ये चुक असू शकते. हे मान्य नाही पण ते कृत्य जर बोगस झाले तर ते मांडायला पाहिजे. पण एखाद्या वेळेला प्रिंटींग मिस्टेक राहून गेली. तर ती दुरुस्ती करणे राहून गेले असेल पण बेसिक मुद्दे मांडा ना.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुमची बाजू जर चुकी झाली तर तुम्ही तुमची बाजू बरोबर मांडता साहेब आमचे काय म्हणणे आहे की, मी मला ही पत्रिका तीन वेळा दिलेली आहे. एवढे नगरसेवक आहेत त्यांचा एवढया वेळात लक्षात आले का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.):-**

हा विषय धोरणात्मक प्रस्तावासाठी घेतलेला आहे.

**शरद पाटील :-**

साहेब विषय बरोबर आहे. पण ही निविदा आता वाचली आणि ही प्रिटींग मिस्टेक नसेल असेल तर ह्याला जबाबदार कोण? तुम्ही आम्हांला ते सांगा. तुम्ही असे कसे सांगता.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आता मी सांगतो निविदा आता काढली का? आम्हांला निविदा दिलेल्या नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

त्यांच्याकडे रेकॉर्ड असेल ना. साहेब तुमच्याकडे टेंडर नोटीस असेल ना. ती वाचून दाखवा ना. खतगांवकर साहेब ॲक्च्युअली हा विषय तुम्ही घ्यायलाच पाहिजे नव्हता. कारण मा. महासभेच्या नियमानुसार कार्यवाही झालेली आहे. पुन्हा मागच्या स्टॅण्डींग ला सुद्धा हा विषय झाला होता.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.):-**

साहेब मला सुद्धा तोच मुद्दा मांडायचा आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मग ठराव आणला पाहिजे होता.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.):-**

ह्या विषयाला मा. महासभेने मान्यता दिल्यानंतर सर्व मा. महापौर, मा. उपमहापौर ह्यांची बैठक घेवून सायमलटेनिस प्रशासन निविदा काढली असेल किंवा नंतर निविदा काढली असेल. ती डेट आपण नंतर कर्न्फम करु. पण मा. महासभेने धोरणात्मक निर्णय घेतल्यानंतर त्याला एक वर्किंग कोड ग्रुप केला होता. त्याच्या डायरेक्शन मध्ये ही निविदा स्थायी समितीकडे मंजूरीसाठी पाठवायची होती. आणि त्याप्रमाणे प्रशासनाने कार्यवाही केलेली आहे. त्या १२ प्रस्तावापैकी ४ प्रस्तावाला वर्क ऑर्डर दिलेली आहे. एक धोरण मी आपल्यासमोर मांडलेले आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब तुम्ही हा विषय आणलाच पाहिजे नव्हता.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.):-**

मुद्दा आला नाही पाहिजे.

**मिलन म्हात्रे :-**

मा. उपायुक्त साहेब त्यांनी तुम्हांला सांगितले की तुम्हांला मुद्दे मांडता येत नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.):-**

विषय मांडता येत नाही असे मी तुम्हांला बोललो नाही.

**मिलन म्हात्रे :-**

ह्या विषयावर जे कोणी जबाबदार अधिकारी आहे. त्यांनी पहिला ह्या विषयावर स्वतःचे मत प्रदर्शन करावे. हा विषय इकडे आणायचा की नाही. ह्या ठरावामध्ये जे काही पोस्टमार्टम आहेत ते सगळ्या शेवटला मी करेन. पण, टाउन प्लॅनिंग चे अधिकारी आहेत, विधी अधिकारी आहेत, बांधकाम चे अधिकारी आहेत, पाणी पुरवठा आहे, प्रभाग समितीचे सर्व अधिकारी आहेत किंवा ह्या डिपार्टमेंटशी संबंधित जे जे अधिकारी आहेत. त्यांनी त्यांचे पहिला म्हणणे मांडू दे. नंतर मी शेवटला बोलतो. आम्ही हा विषय असाच आणलेला नाही. यस, नो काय आहे ते त्यांनी क्लेरिफिकेशन करावे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मगच चर्चा होवू शकते.

**मिलन म्हात्रे :-**

नियम काय आहे ते मी तुम्हांला दाखवतो. ह्यामध्ये मी माझे पत्र दिले. दि. १४/१/०८ विधी अधिकारी जवळ जवळ ९ पानांचा निबंध लिहून दिलेला आहे. ह्याच्यात काय आहे ते मी आपल्याला नंतर सांगेन. पण त्या त्या डिपार्टमेंट चे अधिकारी आहेत. मेहरबानी करुन हा विषय मा. महासभेत चर्चेला गेला. मा. महासभेने काय केले ते मला जरा सांगा. मा. महासभेने फक्त कमिटी अपॉईंट करायची त्या कमिटीने कोणाला काम करायचे माहित नाही इथपर्यंत मा. महासभेचा रोल संपला. हा विषय आता मा. महासभेपुढे नाही. जो ठराव तत्कालिन स्थायी समितीने चुकीचा हेतू पुरस्कारपणे केला आणि कोणाला तरी व्यवस्थित रित्या प्रोटेक्ट करुन हे सगळं दिले गेले. त्याबद्दलचा ठराव आम्ही आणलेला आहे. आणि त्याला काही संक्रुप कारणे आहेत. तुमच्या डिपार्टमेंट एक्सप्लेनेशन गपचूप होवू द्या. मग आम्ही गप्प बसतो. तुम्ही क्लेरिफिकेशन करत नाही मग मी माझे मुद्दे सगळ्यात शेवटला मांडणार आहे. मग ठराव येणार. तुमचे डिपार्टमेंट वाईस कोण कोण आहे? ते तुम्ही ह्याचे खंडन करा ना. शेवटला आमचे होईल. मग ठराव येईल.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

दि. २६/४/०७ रोजी बैठक झाल्यानंतर त्याचे इतिवृत्तांत आज दिले पाहिजे. त्याच्यावर काय निर्णय झाले? त्याच्यात अटिशर्ती काय आहे? आम्ही हा विषय फेरविचारासाठी कशाला आणलेला आहे? त्यामध्ये कुठे आहे? घेण्यामध्ये, देण्यामध्ये, करारनामामध्ये कुठे आहे? तुम्ही काय दिले? कमिटीने काय ठरवले? त्यामध्ये कोण होते? मा. महापौर, मा. उपमहापौर होते की कोण होते? कसे काम होते? नंतर निविदा मागितल्या. कशा पद्धतीने निविदा मागायच्या ते त्याच्यामध्ये उल्लेख आहे का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.):-**

तुम्ही फेरविचारासाठी प्रशासनाकडून आणले का?

**मिलन म्हात्रे :-**

प्रशासनाकडून आणणारच नाही. प्रशासन कसे आणणार? प्रशासनाची एवढी मोठी चुक आहे. तर ते कसे काय आणणार ज्या लोकांनी हे ॲग्रीमेंट बनवलेले आहे ते कसे काय हा विषय आणणार? हा आम्ही आणलेला विषय आहे मी सांगतो ना.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. उपायुक्त साहेब (बालाजी खतगांवकर) म्हणून मी तुम्हांला विचारले की, हा विषय इकडे आणलेला आहे. तर हा विषय येथे कोणी आणला? हा विषय स्थायी समितीमध्ये येवू शकते का? ह्याच्यावर फेर विचार होवू शकते का? आणि विचार झाल्यानंतर जे निर्णय होणार त्याच्यावर अंमलबजावणी होवू शकते का? हा प्रश्न मी तुम्हांला विचारला हा विषय सुरु होण्यापूर्वी विचारले होते. की हा विषय कोणी आणला? ह्या विषयावर चर्चा झाल्यानंतर निर्णय होतात का? निर्णय झाल्यानंतर ते निर्णय मान्य आहे का?

**नगरसचिव :-**

कुठच्याही ठरावात फेरबदल करायचे असेल. ज्या समितीने जसे स्थायी समिती केले असेल तर महिन्यानंतर फेरबदल करण्यासाठी आणू शकतात आणि विचार करु शकतात.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

जर एखाद्याने काम केले. आणि त्यांनी हॅन्ड ओव्हर केले. तरीसुद्धा तुम्ही हा विषय परत आणायचा विचार केला. तोच विषय परत आला ना. एखाद्याला तुम्ही वर्क ऑर्डर दिलेली आहे आणि वर्क ऑर्डर दिल्यानंतर त्याने काय पूर्ण केले. आणि काम पूर्ण केल्यानंतर त्यांनी ती जागा हॅन्ड ओव्हर केली. हे ह्याच्यामध्ये दिलेले आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.):-**

मी सुरुवातीला तोच खुलासा केला.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब त्याच्यामध्ये अजून कॅंडीडेट आहे. जे टेंडर दिलेले आहे...

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.):-**

ते त्याच्यात रिव्हाईस करायचे असेल तर त्या पार्टीला बोलवून त्याचे म्हणणे ऐकायला लागेल. इथे वर्क ऑर्डर दिलेले आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ह्याच्यामध्ये अजून घोळ आहे ना. दि. २६/४/०७ ला मिटींग झालेले आहे. त्याच्या इतिवृत्तांताची कॉपी मिळाल्यानंतरच पुढचा पाउल घेणार आहे. दि. २६/४/०७ चे इतिवृत्तांत गटनेते, स्थायी समिती सभापती, मा. महापौर, मा. उपमहापौर यांनी निर्णय काय दिलेले आहे. आपण कमिटी स्थापन केलेली आहे. आपण त्यांना टेंडर मागवायला सांगितलेले आणि ते टेंडर मागवताना पण काय काय अटीशर्ती आहेत. ते आम्हांला पण माहित आहे. त्याच्यावर पाठपुरावा केला पाहिजे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.):-**

त्या इतिवृत्तांताची कॉपी आपल्याला दिली जाईल. ते ओपन डॉक्युमेंट आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आता द्या ना. ही निविदा मागवली ती चुकीची मागितले. त्याच्यावर आम्हांला निर्णय करता येईल ना. तुम्ही बोलले आम्ही टेंडर दिला. आता कसे करणार? कसे करणार म्हणजे तुमची चुकी ही शहराने भोगायचे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.):-**

हा निर्णय मा. महासभेमध्ये एकदा धोरणात्मक झाल्यानंतर त्याच्यासाठी कोड कमिटी झालेली. सायमनटेनियस त्याची बैठक झालेली आहे. आणि प्रशासनामध्ये डी.सी. रुलची तरतुद आहे की, आरक्षणे कशा पद्धतीने विकसित करायचे. हा एक भाग आहे. टी.डी.आर. आणि समायोजन आरक्षणातून बी.ओ.टी. पद्धतीने आरक्षण विकसित करता येतात. आणि मा. महासभेसमोर तशी धोरणात्मक मान्यता घेतलेली होती. आणि त्याच्यासाठी जी कमिटी केली होती. पण पहिली बैठक झाली नाही. पण दुसरी बैठक आपण जी म्हणता की दि. २६/४/०७ ला झाली. ती बैठक झालेली आहे. त्याची प्रोसिडींग आहे. त्याची कॉपी आम्ही सर्वांना देवू. आणि त्या माध्यमातून जी कार्यवाही प्रशासनाने केली. पेपरला नोटिफिकेशन देवून काही दरपत्रक आलेले होते. त्या दरपत्रकाची छाननी करुन किफायतशीर जे दरपत्रक आहेत. दरपत्रक म्हणण्यापेक्षा निविदा म्हणतो. त्या वेळेच्या निविदा स्थायी समिती समोर सादर केलेल्या होत्या आणि स्थायी समितीने त्यामध्ये धोरणात्मक निर्णय घेतलेले होते. त्यापैकी १२ प्रस्तावापैकी ४ प्रस्तावाला कार्यादेश दिलेले आहे. काही प्रस्ताव कार्यान्वित झालेले आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

टेंडर कोणी काढले?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.):-**

एक टेंडर नगररचना विभागाने काढलेले आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

त्यांना टेंडर काढायचा अधिकार आहे?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.):-**

मा. आयुक्त साहेबांनी मान्यता दिली तर आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब तुम्हांला हेच सांगतो की तुम्ही आम्हांला प्रत्येक गोष्ट लपवलेली आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.):-**

आता हयाच्यात टेंडर काढले हे त्यात लपवण्यात काय आहे?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

नगररचनाला मान्यता दिली तर त्यांना द्या ना. नगररचनेला टेंडर काढण्याचा अधिकार आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.):-**

मा. आयुक्त साहेब हे कोणत्याही विभागाला कामकाज सोपवू शकतात.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आम्हांला त्या आदेशाची कॉपी पण द्या.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.):-**

त्यापैकी तीन कामे नगररचनाने केलेले आहे आणि एक काम हे बांधकाम विभागाने केलेले आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. आयुक्त साहेबांनी नगररचना विभागाला टेंडर काढण्यासाठी आदेश दिले. त्यांची कॉपी आम्हांला देवू टाका.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा.):-**

प्रश्नोत्तरे होण्यापेक्षा म्हात्रे साहेब जसे बोलले. त्या फेरविचाराच्या प्रस्तावाच्या अनुशंगाने काय काय मुद्दे आहे ते एका एका सदस्याने मांडावेत एक एक मुद्दा आणि एक एक अन्सर आपल्याला देतील तुमचे मुद्दे जितके आहेत तितके मुद्दे मांडा. आम्ही तुम्हांला त्याची कार्यान्वित देवू. त्याच्यात तुम्हांला काही मुद्दे सॅटीसफॅकशन नाही झाले तर धोरणात्मक निर्णय होवू द्या. एक मुद्दा मांडायचा आणि एक उत्तर द्या असे नको. तुम्ही तुमचे सर्व मुद्दे मांडा आम्ही तुम्हांला सर्व उत्तरे देवू. आपली चर्चा सवाल जवाब न होता. आपण आपले मुद्दे मांडा.....

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुम्ही हे जे चार प्रस्ताव दिलेले आहे ना. त्याच्यामध्ये फेरविचार करण्यासाठी कोणत्या सदस्याने आणला असेल. किंवा मा. सभापती साहेबांनी आणला असेल. ह्याच्यामध्ये हेतू तोच आहे. कारण आता टिपणी देताना सुद्धा सर्व क्लेरिफिकेशन केले नाही. तुम्ही आता सांगतात. नगररचनाने टेंडर काढले. त्यांना आदेश दिले होते. असा कुठे उल्लेख आहे म्हणून आम्ही आता बोललो ना इतिवृत्तांताची कॉपी हे टेंडर कोणी काढले? टेंडर काढण्याचा त्यांना अधिकार आहे का? अधिकार नसेल तर त्यांना टेंडर काढण्याचा अधिकार कोणाला दिलेले आहे? त्याची प्रत आम्हांला पाहिजे. त्या ज्या अटीशर्ती ठरवलेल्या आहेत. त्या अटीशर्तीमध्ये त्यांनी प्लॅन सादर केले पाहिजे. आपण ज्याला निविदा दिलेली आहे. त्यांनी प्लॅन दिले पाहिजे. ज्या प्लॅन चे मॉडीफिकेशन करुन त्याच्यामध्ये आर्थिक तरतुद आहे. त्याच्यामध्ये फेरफार करुन नंतर तो नगररचनेच्या संबंधित ठेकेदार. निविदा धारकला देणार आहे. असे केले का? त्याच्याकडे प्लॅन आले होते का? ते कुठल्या तारखेला आले. की ह्या ह्या तारखेला हे काम सुरु झाले. त्यांचे प्लॅन आले. महापालिकेच्या नगररचनाने काय काय मोडीफिकेशन केलेले आहे? नसेल केले तर नाही आणि जर केले असेल तर आम्हांला मोडीफिकेशन ची कॉपी द्यावी. एकतर हा विषय आहे. त्यांनी टेंडर घेतलेले आहे तर त्यांनी एका वर्षामध्ये ते काम पूर्ण केले पाहिजे. अजून सात महिने झाले त्यांना कोणत्या गोष्टीचा कार्यादेशच दिला गेला नाही. तर ते काम कसे पूर्ण करणार. आम्हांला ह्याला खुलासा द्याना. हे पाच विषय तर तुम्ही कोणाला तरी देवून टाका.

**मिलन म्हात्रे :-**

माझी सुचना अशी आहे की, जे करारनामे झालेले आहे. मा. महासभेबद्दल आमचे काही म्हणणे नाही. मा. महासभेचा ठराव चुकीचा आहे असे मी कधीही बोललेलो नाही. आणि बोलणार ही नाही. मी तुम्हांला लेखी दिले. ह्याच्यात मा. महासभेच्या ठरावाला एलिगेशन वगैरे काहीही नाही. पण, स्थायी समितीचा जो शेवटचा ठराव झाला. त्याबद्दल आमचे ऑब्जेक्शन आहे. त्यामध्ये दि. १८/७/०७ ला जो ॲग्रीमेंट केले. दोन सेप्रेट ॲग्रीमेंट केलेले आहे. आणि एक दि. २१/७/०७ ला केलेले आहे. हे दोन करारनामे वादग्रस्त करारनाम्याबद्दल महापालिकेच्या संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी खुलासा त्यांनी त्यांचे करावे. मग मी माझे बोलतो. मुद्देसूद होवून जावू द्या.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा.) :-**

दोन ॲग्रीमेंट बनेले. तर त्यांनी काय म्हणायचे.

**मिलन म्हात्रे :-**

त्यांनी म्हणावे ना आता दि. १८/७/०७ चे हे ॲग्रीमेंट आहे. त्याच्याबद्दल त्यांनी त्यांची बाजू मांडावी की हे ॲग्रीमेंट कशाप्रकारे योग्य आहे. नंतर हे ॲग्रीमेंट. त्यांना नगररचनेने पहिला खुलासा करावा. नंतर विधी अधिकारी, पाणी पुरवठा असे एक एक चर्चा होवून जावू दे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

त्याच्यात ऑब्जेक्शन काय आहे? ती चर्चा जर आली तर आपल्याला सुद्धा चर्चा करता येते.

**मिलन म्हात्रे :-**

ऑब्जेक्शन म्हणजे आमचे सिक्वेन्टचे पत्ते आम्ही अगोदर कशाला देवू?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

सिक्वेन्सचे पत्याचा विषय नाही. हा विषय निर्णयाचा आहे.

**मिलन म्हात्रे :-**

अधिकार आहे. त्यांनी ॲग्रीमेंट केलेले आहेत. त्यांच्या डिपार्टमेंटने केले. तुम्ही त्यांना आता उत्तर दिले ना की, सगळे अधिकार मा. आयुक्त साहेबांनी त्यांना दिलेले आहे. मग त्यांनी काय वापरले ते सांगावे ना. मग, आम्ही काहीतरी बोलू.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

म्हणजे त्या अग्रीमेंट बद्दल त्यांचे निवेदन द्यायचे.

**मिलन म्हात्रे :-**

त्यांनी निवेदन करावे ना. विधी अधिकारीने करावे. मग शेवटला आम्ही बोलू. मी ह्या ॲग्रीमेंटच्या बाहेर जावून एक ही शब्द बोलणार नाही. एकही वक्तव्य करणार नाही. जर, केले तर मा. सभापती साहेबांनी ह्या कामकाजातून काढून टाकावे. हे मी स्वतः बोलतो. त्यांनी त्याचे क्लेरिफिकेशन करावे. मग आम्ही शेवटला बोलू. आम्ही पुर्ण तयारी केलेली आहे. हायकोर्टाचे, सुप्रिमकोर्टाचे सायटेजेस वगैरे आम्ही आणून ठेवलेले आहे. त्यांनी काही चिंता करू नये आणि ह्याच्यावर आम्हाला पुढे काय कराचे तेही आम्ही करणार. नुसते स्थायी समितीने मा. महासभेने थांबणार नाही. त्यांनी त्याचे क्लेरिफिकेशन द्यावे.

**सई वडके (विधी अधिकारी) :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने तुम्हाला ह्या ॲग्रीमेंट ची माहिती देवू इच्छिते. ह्याच्यामध्ये जे आपण दोन ॲग्रीमेंट केलेले आहे. ते प्रायमरी स्कुल आणि प्ले ग्राउन्डच्या संदर्भात दोन ॲग्रीमेंट करण्यात आले. दि. २४/०७/२००७ चे जे आहे ते दिपक चॅरिटेबल ट्रस्ट ह्यांच्या सोबत ॲग्रीमेंट करण्यात आलेले आहे. आणि ह्या संदर्भात टेंडर फॉर्म वेगळे देण्यात आले होते. आणि त्याच्या अटीशर्ती नुसार त्यांचे फॉर्म मागवण्यात आले होते आणि टेंडर फॉर्म च्या सोबतच त्याचे ड्राफ्ट ॲग्रीमेंट होते. ते दि. २०/०२/२००७ ला देण्यात आले होते. आणि त्या अनुशंगानेही ॲग्रीमेंट करण्यात आलेले आहे. एक्झीक्युट करून रजिस्टर करून साहेबांची सही घेवून दिलेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

महापालिकेतर्फे विटनेस कोण आहे? आणि ते ॲक्झीक्युट कोणी केले?

**सई वडके (विधी अधिकारी) :-**

तत्कालीन कमिश्नर साहेब होते त्यांनी त्या दोन्ही ॲग्रीमेंटवर सही केली होती. आणि त्यांचे दिपक चॅरेटेबल ट्रस्ट आहे ते ऑथोराईस्ड सिग्नेटरी त्यांची सही आहे. आणि विटनेस म्हणून त्याच्याही विटनेस ची सही आहे.

**मिलन म्हात्रे :-**

आपल्या वतीने विटनेस कोण आहे?

**सई वडके (विधी अधिकारी) :-**

तीन विटनेसेस आहे. एक दिनेश शहा, जगदिश पारेख आणि मी स्वतः

**मिलन म्हात्रे :-**

म्हणजे महापालिकेच्या वतीने आपण आहात. ओनरशिपचे बद्दल आपले म्हणणे काय आहे? ओनरशिपचे कागद अटीशर्ती फायनॅनशिअल त्यांची...

**सई वडके (विधी अधिकारी) :-**

साहेब, आपण त्याच्यामध्ये सात बारा उतारा जोडलेला आहे. त्याच्यामध्ये सात बारा उतारा मिरा भाईंदर महानगरपालिकेशी झालेला नाही.

**मिलन म्हात्रे :-**

सी.आर.झेड. चे काही नियम, निकाल त्याच्यानंतर तुमच्या यु.एल.सी. च्या ऑर्डर्स वगैरे सगळ्या व्यवस्थित आहे.

**सई वडके (विधी अधिकारी) :-**

ह्यांच्याबद्दल तुम्हाला घेवारे साहेब माहिती देतील.

**मिलन म्हात्रे :-**

विधी म्हणजे सगळ आले. तुम्ही हे डॉक्युमेंट विटनेस म्हणुन जावुन ॲक्जीक्युट करुन आले हे बरोबर आहे.

**सई वडके (विधी अधिकारी) :-**

साहेब, विटनेस ऑफ ॲक्झीक्युशन ॲग्रीमेंट.

**मिलन म्हात्रे :-**

असु द्या ना. तुम्ही विटनेस म्हणुन रस्त्यावर उभे आहात घेवुन गेले शिक्के मारले सही, घेतली झाले नुसते पोलिस पंचनामा करतात तशातला भाग नाही तुम्ही हे पुर्ण वाचले का?

**सई वडके (विधी अधिकारी) :-**

साहेब, मीच तयार केलेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही केलेले आहे ना. त्या पुढचे ॲग्रीमेंट मागचे एकदम व्यवस्थित आहे. काहीच प्रॉब्लेम नाही. तुमच्या दृष्टीकोनातुन हे अगदी व्यवस्थित आहे.

**सई वडके (विधी अधिकारी) :-**

हो साहेब.

**मिलन म्हात्रे :-**

पुढचे बोला.

**सई वडके (विधी अधिकारी) :-**

सर, एक रिझल्वेशन १९९६ चे प्ले ग्रार्डन साठी आहे. त्याच्या संदर्भात सी.बी.जी ॲक्झीक्युटर रजिस्टर पार्टनर शिप फॉर्म मध्ये आहे.सी.बी.जी ॲक्झीक्युटर आणि मिरा भाईंदर म्युनिसीपल कॉर्पोरेशन ह्यांच्यासोबत हा करारनामा करण्यात आणलेला आहे. प्ले ग्रॉउंड डेव्हलप करुन. मल्टीपीलेक्शन ॲण्ड मेंटन करण्या संदर्भात दि. ३१/०७/२००७ ला ॲक्झीक्युर करुन रजिस्टर करण्यात आलेला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मा. आयुक्त साहेबांनीच हे सुध्दा केले ना.

**सई वडके (विधी अधिकारी) :-**

मा. आयुक्त साहेबांची सही आहे.

**मिलन म्हात्रे :-**

विटनेस कोण कोण आहे?

**सई वडके (विधी अधिकारी) :-**

त्याच्यामध्ये दोन व्हिटनेसच दिसतात. त्यांनी सह्या केलेल्या आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

आपल्या महापालिकेच्या वतीने व्हिटनेस कोण आहे का? तुम्ही स्वतः आहे का?

**सई वडके (विधी अधिकारी) :-**

मी स्वतः व्हिटनेस नाही.

**मिलन म्हात्रे :-**

आपण नाही. नसल्या बाबतीत काय कारण?

**सई वडके (विधी अधिकारी) :-**

साहेब मी, त्यावेळेस कोर्टात गेली होती.

**मिलन म्हात्रे :-**

दुसरा दिवशी करायला पाहिजे होता.

**सई वडके (विधी अधिकारी) :-**

साहेब, रजिस्टर त्यादिवशी झाले.

**मिलन म्हात्रे :-**

एका ॲग्रीमेंट मध्ये विधी अधिकारी व्हिटनेस म्हणुन तुम्ही राहता. दुसऱ्या ॲग्रीमेंट मध्ये तुम्ही व्हिटनेस म्हणुन राहतच नाही. परत, हॉस्पीटलच्या ह्याच्यात तुम्ही फोटो वैगेरे सगळ लावलेले आहे. आणखीन त्या विभागाचे ज्युनिअर इंजिनियर घेतले आपल्या हॉस्पीटल करारनामा नोंदवला गेला ना. म्हणजे हॉस्पीटलच्या करारनाम्या मध्ये एक नियमावली एक नियम एक निकष बाकीची आपली महापालिका करते इथे काही नाही. तुम्ही ह्याच्यात व्हिटनेस म्हणुन नाही. ॲग्रीमेंट मध्ये सही कुठे आहे?

**सई वडके (विधी अधिकारी) :-**

माझी सही नाही.

**मिलन म्हात्रे :-**

निट बघा. मग, मला सांगा.

**सई वडके (विधी अधिकारी) :-**

माझी सही नाही.

**मिलन म्हात्रे :-**

नक्की

**सई वडके (विधी अधिकारी) :-**

हो साहेब.

**मिलन म्हात्रे :-**

महापालिकेच्या वतीने दुसरे कोण व्हिटनेस म्हणुन आहे का? कोणी क्लार्क सिनियर क्लार्क, बी.एम.सी वैगरे व्हिटनेस, शिपाई वगैरे मा. आयुक्त साहेबांनी केला का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मा. आयुक्त सहोबांनी व्हिटनेस म्हणुन सही केले ना.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्हाला व्हिटनेस सांगतो. त्या दुसऱ्या अग्रीमेंट मध्ये सुध्दा मा. आयुक्त साहेबांनी व्हिटनेस म्हणुन सही केली.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

ठिक आहे. मा. आयुक्त साहेब असतील म्हणुन सही केली.

**मिलन म्हात्रे :-**

मला सांगा ना नसेल तर नाही सांगा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

नाही म्हणुन सांगितले ना.

**मिलन म्हात्रे :-**

त्या स्वतः नाही म्हणुन ते सांगतात.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

एवढच विचारायचे आहे.

**मिलन म्हात्रे :-**

हो एवढच विचारतो.

**सई वडके (विधी अधिकारी) :-**

दोन सही आहे ना.

**मिलन म्हात्रे :-**

महापालिकेच्या वतीने आपला कोणीही अधिकारी कर्मचारी नाही. बाकी ह्याच्यात लावलेले डॉक्युमेंट अटीशर्ती वैगरे ह्या सगळ्या तुम्ही वाचल्या हे सर्व झाले बरोबर आहे.

**सई वडके (विधी अधिकारी) :-**

हो साहेब.

**मिलन म्हात्रे :-**

तुमच्या पध्दतीने सर्व बरोबर आहे. लिगल ॲडव्हाईज म्हणुन तुम्हाला सगळ योग्य वाटते.

**सई वडके (विधी अधिकारी) :-**

हो साहेब.

**मिलन म्हात्रे :-**

आणखिन काही बोलायचे नाही.

**सई वडके (विधी अधिकारी) :-**

नाही.

**दिलीप घेवारे :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो. मिरा भाईंदर शहराची विकास योजना ही १४ मे १९९७ रोजी मंजुर झालेली आहे. आणि त्याच्यातला उरलेला भाग हा २००० साली मंजुर झालेला आहे. ब-याच सदस्यांची मागणी आहे. आणि आपले कर्तव्य आहे. की, विकास योजनेची अंमलबजावणी लवकरात लवकर आणि परिणाम कारक करणे आणि त्या सुविधा शहरातील नागरिकांना, रहिवाश्यांना मिळुन देणे. मी आल्यानंतर बघितले जे काही ४० आरक्षण सरकारी जमिनीची काही खाजगी जमिनीची काही आणि समावेशक आरक्षण धोरणात्मक दोन्ही झाली होती. आणि त्याच्यात आमची गती आवश्यक होती. सगळ्या संदस्यांचे ही म्हणणे हेते. मा. महासभेत पण बरीच चर्चा व्हायची की, ह्याच्यात काही परिणामकारक कामे होत नाही. संबंधित अधिकारी काम करत नाही. ह्या दृष्टीकोनातुन पुर्वी जो आपला टी.डी.आर. चा नियम होता त्या नियमाने आपल्याला पाच पध्दतीने आरक्षणाचे भु - संपादन करता येते. एक एफ.एस.आय देवुन नंतर डी.आर म्हणजे डेव्हलपमेंट डायरेक्शन देवुन टी.डी.आर देवुन कम्पलशन लॅण्ड ॲक्वीझेशन आणि प्रायव्हेट ह्याच्यात आपण लॅण्ड ॲक्वीझेशन काही प्रस्ताव टाकले होते. ते १९९८-९९ साली टाकले होते. त्यात काहीही प्रगती होत नव्हती प्रत्येक वेळे जे मुद्दे जिल्हाअधिकारी कार्यालयाकडुन निघायचे इव्हन त्यांच्या ज्या २७ सरकारी जागा आहे ती सुध्दा मागणी केली होती. त्यातल्या ७-८ जागा आपल्या ताब्यात घेतलेल्या आहे. उरलेल्या १० जागा अजुनही मिळत नाही. आपण त्यासाठी प्रयत्न करतो. ब-याच लेखी ही होतात मा. महापौर किंवा या राजकीय स्तरावरील लोक प्रयत्न करतात. आणि माहिती अधिकारातुन म्हात्रे साहेब वैगरे सगळे लोक प्रयत्न करतात. त्यांनतर हे आरक्षण ज्या-ज्या वेळेला आले. त्यावेळेला ५० टक्के पेक्षा जास्त जागा ताब्यात आल्या. त्या डेव्हलप करण्यासाठी आपण मा. महासभेमध्ये ठराव आणला होता. ह्या खाजगी तत्वावर, खाजगी धोरणे सगळ्या देशांनी स्विकारलेला आहे. एअर पोर्ट पासुन ते इथपर्यंत ह्याच्यामध्ये आपली एक संकल्पना अशी होते की, ह्याच्यात आपल्या पालिकेला खर्च करायला जे करोडो रु. लागणार आहे. ते वाचतील कारण आज आपल्याकडे पैशांची कमतरता आहे. सर्व निधीची कमतरता आहे. ते आपल्या सगळ्यांना माहितच आहे. दुसरी गोष्ट ३४ जागेवर अतिक्रमण झालेले आहे. तर, आपण जागा ताब्यात घेतो पालिकेच्या किंवा ज्या सरकारी ज्या असतात. सगळ्या मुंबईत शोकांतीका सगळ्या देशात शोकांतीका आहे म्हणुन त्याच्यामध्ये आपण असे ठरवले होते त्या जागा ताब्यात आल्या आणि त्या खाजगी डेव्हलर्परला दिल्या तर, कमित कमी ते मेन्टंन तरी करतील. आणि डेव्हलप करुन ती सुविधा त्या रहिवाशीयांना नागरिकांना लवकरात लवकर मिळेल. कारण, आज अकरा वर्षे आपल्या डी.पी ला झालेले आहेत. जरी २० वर्षाचा कालावधी असला तरी दहा वर्ष झाल्यानंतर एक २७ ची नोटीस देता येते. दि. १४/०६/२००७ च्या मा. महासभेमध्ये डिटेलमध्ये चर्चा झाली त्याच्यात सर्वांनी भाग घेतला होता आणि आमच्या समोर चार मुख्य असे होते की, जागा डेव्हलप लवकर व्हाव्या. नागरकिंना आणि जनतेला सुविधा मिळावी प्ले ग्रॉर्डन असो शाळा असो. नंबर दोन त्यासाठी पालिकेचा काही खर्च होवु नये. आणि तिसरी गोष्ट म्हणजे जे मुंबईत धोरण केले आणि ते धोरण नंतर बंद केले. मुंबईचे असे होते की, आपल्या मा. महासभेचा ठराव झाला होता. त्यानुसार एक होते की, संबधीत जागा मालक एखादा डेव्हलपर किंवा एखादा ट्रस्ट आपण त्याला डायरेक्ट देवु शकत होतो. पण तसे न करता आपण मा. महापौरांच्या अध्यक्षतेखाली ७ - ८ लोकांची एक कमिटी नेमली त्या कमिटीने असा ठराव केला की, ह्या जागा लिज वर द्यावा. आता ठरावात त्यांनी असे मांडले एक-एक, दोन-दोन मुद्दे नाही. धोरणाप्रमाणे मा. महासभेचे किंवा कुठल्याही कमिटीचे एक धोरण ठरवलेले असते. त्याची अंमलबजावणी प्रशासन करत असते. छोट्या-छोट्या, किरकोळ मुद्यांमध्ये त्यांचे असे ठरले की, लिजवर द्यावे. ह्या ठरावामध्ये शिवार गार्डन जो विषय बांधकाम विभागाने हॅण्डल केला होता. त्याला मा. महासभेन मंजुरी दिली होती. तेव्हा समिती नव्हती तरी सुध्दा डायरेक्ट टेंडर काढुन त्याचे ॲग्रीमेंट रजिस्टर करुन ते प्रायव्हेट ट्रस्टला चालवण्यासाठी दिलेले आहे. त्याच्यामध्ये आज ४५ लाख रु. वार्षिक भाडे येते आणि हे जे ३ आरक्षण स्थायी समितीमध्ये मंजुर झाले होते. ९४ लाख रु. वार्षिक भाडे आहे. आणि प्लस १५ कोटी रु. डेव्हलपमेंट खर्च होणार नाही.

तर, आज ९४ लाख रु. भाडे चार आरक्षणाचे येत आहे. असे जर आपले ५० आरक्षण दिले तर आपल्याला साधारणतः १० करोड रु. वार्षिक भाडे येईल ती ऑलरेडी डेव्हलप होईल. आपल्या पालिकेचे ५-५० कोटी रु. वाचतील. आणि आपल्याला ते अतिक्रमण होवु देणार नाही. ही फार मोठी संकल्पना आणि दिशा होती. आता, त्याच्यामध्ये जसे काही मुद्दे निघाले की, ॲग्रीमेंटमध्ये काही क्लॉज चूकलेले आहे किंवा काही जागा बरोबर डेव्हलप झालेली नाही. आपण सन्मा. सदस्य आहात. आपली स्थायी समिती शहराची भवितव्य घडवत असते. आपण मुद्दे सजेश करा. आणि त्याप्रमाणे करु. धोरण ठिक नसेल मा. महासभेने मंजुर केलेले आहे. आपण निर्णय घ्या आणि मा. महासभेने रद्द करा तर मी ह्याच्यामध्ये पुर्णपणं प्रमाणिक पणे आणि पारदर्शकपणे प्रयत्न केलेला आहे हे मी आपल्या सगळ्यांना सांगु इच्छितो.

**मिलन म्हात्रे :-**

ॲग्रीमेंट मध्ये जबबादार कोण आहे? ॲग्रीमेंटची जबबादारी कोण घेणार? मला विधी अधिकाऱ्यांचे लेखी आलेले आहे की, ह्याच्यामध्ये त्यांची जबाबदारी काहीच नाही. ते राईटिंगमध्ये आहे. विकासाचा विषय फार मोठा आहे. त्याच्यावर आपण भरपूर बोलू शकतो. प्रश्न तो नाही. पण ह्या ॲग्रीमेंट चा जबाबदार कोण?

**दिलीप घेवारे :-**

हे धोरण राज्य शासनाने स्विकारलेले आहे. बी.ओ.टी. किंवा बी.ओ.ओ.टी. पद्धतीने द्या. कारण पालिकेचा कुठलाही पैसा महाराष्ट्रामध्ये नाही. नगरपालिका असो किंवा महानगरपालिका असो आणि हे धोरण विकसित करा. कारण लोकांना ॲनीमेट करण्याचे कर्तव्य आहे. आज ११ वर्षे झाले. समजा, आज प्ले ग्राउंड डेव्हल्प झाले. काही असेल काही नाही ते आपण दुरुस्त करु. परंतु, आपण सकाळी ६ वा. गेलो तरी १०० लोक मिळतात. आज तिथे एखादी इमारत झाली असती किंवा झोपडे झाले असते. तर आपण काय करु शकलो असतो. आणि ह्याच्यात ॲग्रीमेंट चा जो मुद्दा आहे. आतले जे रेग्यूलर कंन्सलटंट आहे. गिरीश प्रधान जे टेंडर बांधकाम विभागासाठी बनवतात. टेंडर फॉर्म बनवतात. त्यांनी हे टेंडर फॉर्म भरलेले आहे. आणि ते आपल्याकडे अधिकृत आहे. टेंडर फॉर्म भरल्यानंतर कमिटीची मान्यता घेवून मा. आयुक्त साहेबांची मान्यता घेवून दोन पेपर आहेत. जो पर्यंत प्रसिद्धी विभाग आहे. तो पर्यंत ते पेपर त्यांनी दिलेले आहे. आम्ही दिलेले नाही. आणि ते आल्यानंतर टेंडर त्याचे चे शिवार गार्डन चे ॲग्रीमेंट झाले होते. त्याच धर्तीवर त्याचा मुद्दा निघाला नाही कारण ते हायकोर्टाने तिकडून आणलेला आहे. तो मुद्दा निघाल्यानंतर आम्ही ते ॲग्रीमेंट विधी विभागाला पाठवले होते. त्यांनी ते व्हेरिफाय केलेले आहे आणि व्हेरीफाय करुन मा. आयुक्त महोदय यांची सही आहे. त्याच्यामध्ये कुठले विभाग, आणि कसे जबाबदार राहिल?

**मिलन म्हात्रे :-**

टेंडर कुठले?

**दिलीप घेवारे :-**

शिवार गार्डन आणि बाकीचे टेंडर सुद्धा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.):-**

तिन्ही.

**दिलीप घेवारे :-**

हो तिन्ही.

**मिलन म्हात्रे :-**

आपण उगाचच शहराची हिस्ट्री सांगू नका. तुमची हिस्ट्री आम्हांला ऐकायची सुद्धा नाही. कम टू द पॉईंट. त्या शिवार गार्डनला काय चालले ते मी माझ्या भाषणात नंतर सांगतो. बी.ओ.टी. दिले म्हणजे सगळे चकाचक झाले अशातले नाही. आपण बी.ओ.टी वर सुलभ शौचालय दिले होते. महापालिकेने सगळे काढले तुम्ही ते का बोलत नाही. बी.ओ.टी. लोकांचे दहा दहा लाख रु. घेतलेले ते त्यांचे फुकट गले आणि आज नागरिक परत रस्त्यावर ती संडास करतात ते निराळं राज्य शासनाचे हागणदारी योजना पण आहे ते का बोलत नाही. तुम्ही बी.ओ.टी तत्वावर दिले होते ना. मेहरबानी करुन तुम्ही ॲग्रीमेंट वरती बोला. बाकी काही बोलू नका. तो विषय सेप्रेट आहे. त्याच्यावर आपण परत एकदा बोलू या. दि. १८ चे जे ॲग्रीमेंट आहे ना. तर आम्ही कुठे बोलतो तुम्ही केलेले नाही. १८ चे ॲग्रीमेंट लिमिटेड घ्या. नंबर १८ चे ॲग्रीमेंट तुमच्या दृष्टीकोनातून व्यवस्थित आहे का? असेल तर यस आणि नसेल तर नो सांगा.

**दिलीप घेवारे :-**

दि. १८ चे जे ॲग्रीमेंट आहे आणि आपले जे सल्लागार आहेत. गिरीष प्रधान त्यांनी तयार केले होते. ते आम्ही विधी विभागाकडे पाठवले होते आणि मा. महापौर समितीमध्ये काही निकष जे ठरवलेले होते. त्या ॲग्रीमेंटच्या कंडीशन्स होत्या. त्या ॲग्रीमेंटमध्ये आपण टाकलेल्या होत्या. त्यानुसार आम्ही विधी विभागाला सुद्धा टाकलेले. टेक्निकली आम्ही ॲग्रीमेंट बघू शकत नाही. टेक्निकली डिसेली पॉईंट बघू शकत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

आर्किटेक तर तुमच्याकडे देणार ना की तुम्ही त्यांच्याकडे जाता.

**दिलीप घेवारे :-**

आम्ही त्यांच्याकडे जातो.

**मिलन म्हात्रे :-**

म्हणजे तुम्ही असे म म बोलला आणि ते देवून टाकले.

**दिलीप घेवारे :-**

असे सांगा. आम्ही त्यांना पत्र लावून दिलेले आहे आणि त्याच्या नंतर त्यांनी...

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.):-**

त्या समितीमध्ये धोरणात्मक चर्चा झाली.

**मिलन म्हात्रे :-**

कमिटी कमिटी बोलू नका. त्या कमिटीचे ह्याच्यात काहीच दिले नाही. तुम्ही कमिटी कमिटी कशाला करता? कुठली कमिटी आहे? कमिटीचा रिपोर्ट ह्या ॲग्रीमेंट ला लावला का? तुम्ही परत कमिटीचे नाव घेवू नका.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

खतगांवकर साहेब तुम्ही परत परत..... मग तुम्ही ॲग्रीमेंट देताना सर्व गोष्टी का दिल्या नाही.

**मिलन म्हात्रे :-**

त्या ॲग्रीमेंटमध्ये कमिटीचा रिपोर्ट ॲलेक्चर केले का? तुम्ही सगळं कमिटी कमिटी बोलता पण एकही कागद ह्याच्यावर लावलेला नाही. त्या अधिकाऱ्याला बोलू द्या. मी तुम्हांला काय बोललो की त्यांचे त्यांना मांडू द्या. मग मी बोलतो मला काय बोलायचे आहे ते. ही कॉपी आम्हांला मिळाल्यानंतर ही कॉपी आम्हा सदस्यांना कोणाला दिलेली नाही. ह्या सदस्यांना शहराचा विकास करायचा आहे ना. मग ती कॉपी का दिली नाही. माहितीचा अधिकार मागितल्यावर कशी कोरी ठणठणीत कॉपी मिळेल. त्याचे सत्यप्रत पण नाही. त्याचे आम्ही दोन रु. पैसे भरतो. तुम्ही कमिटी काय घेवून बसलात आणि स्टॅण्डींग स्टॅण्डींग घेवून बसलात. स्टॅण्डींग च्या ठरावावर पण नंतर पंचनामा होतो. त्यांना त्यांचे क्लिअर करु द्या. साहेब तुम्ही एवढेच सांगा. डॉक्युमेंटस् वगैरे हे सगळं लावले हे तुमच्या हिशोबाने बरोबर आहे आणि आर्किटेकने जे पाठवले ते तुम्ही विधी अधिकाऱ्यांकडे पाठवले. विधी अधिकाऱ्यांकडून यस करुन ते कमिशनर साहेबांकडे गेले. कमिशनर साहेब लगेच उठले आणि ते पटकन गेले आणि ते सगळं करुन टाकले. हे बरोबर आहे ना.

**दिलीप घेवारे :-**

हो बरोबर आहे.

**मिलन म्हात्रे :-**

ह्याच्या व्यतिरिक्त काही नाही. ठिक आहे. पुढे काही पाणी विभागाने काही कनेक्शन्स वगैरे दिले की नाही. माझ्याकडे एका एका विभागाची पत्रे आहेत. म्हणून मला तुमच्या स्टॅण्डींग वरती क्लेरिफिकेशन पाहिजे. मला त्याचे सगळे रेकॉर्ड करायचे आहे. पाणी पुरवठा विभागातर्फे त्या विभागाला त्या मॉलला किंवा कशालाही कनेक्शन आहे का?

**शिवाजी बारकुंड :-**

अद्याप पर्यंत कनेक्शन दिलेले नाही.

**मिलन म्हात्रे :-**

महापालिकेचे अधिकृत कनेक्शन नाही. त्याच्यानंतर टॅंकरर्स वगैरे काही. पिण्याच्या पाण्याचे वगैरे.

**शिवाजी बारकुंड :-**

नाही.

**मिलन म्हात्रे :-**

टॅक्स डिपार्टमेंट काय बोलते?

**मा. सभापती :-**

टॅक्स लावला का?

**अजित पाटील :-**

त्या ओपन जागा आहेत ना.

**मिलन म्हात्रे :-**

त्याचा बेनिफिट मॉल नी घेतलेला आहे. त्याचा टी.डी.आर. एफ.एस.आय. मॉलला वापरला.

**अजित पाटील :-**

हो बरोबर आहे. परंतु जे रिझर्व्हेशन ९६ नंबरचा आहे. त्याचा टॅक्सचा प्रश्नच येत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

९६ चे मी म्हणत नाही. मी काय बोललो की त्याचा वापर केलेला आहे. तुम्ही ते ॲग्रीमेंट नीट वाचले का?

**अजित पाटील :-**

आमच्याकडे अजून ते ॲग्रीमेंट आलेले नाही.

**मिलन म्हात्रे :-**

ह्याचा अर्थ असा की, तुम्हालाही त्यांनी ॲग्रीमेंट पाठवले नाही. कारण त्यांनी सगळ्याचा वापर करुन तिकडे एफ.एस.आय. वापरला आहे.

**अजित पाटील :-**

९६ सर्व्हे नं. चा मोकळ्या जागेचा टॅक्स आपण घेत नाही ना.

**मिलन म्हात्रे :-**

मोकळ्या जागेचा नाही.

**अजित पाटील :-**

मग,

**मिलन म्हात्रे :-**

मॉलला टॅक्स लावलेला आहे.

**अजित पाटील :-**

मॉलला टॅक्स लावलेला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

तुमचे उत्तर आलेले आहे की, मॉलला टॅक्स लागलेले नाही.

**अजित पाटील :-**

तुमचे जेव्हा पत्र व्यवहार आला नव्हता.

**मिलन म्हात्रे :-**

त्याच्यानंतर त्याला जागे केले. म्हणजे माझे पत्र व्यवहार झाल्यानंतर टॅक्सेशन झाले. कमर्शियल रेटने झाले ना. आता आणखिन कोणाला काही क्लेरिफिकेशन द्यायचे असेल तर द्या.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.):-**

ही चर्चा दि. १८/७/०७ च्या ॲग्रीमेंट वर चालू आहे ना.

**मिलन म्हात्रे :-**

नाही. ते दोन्ही बोलले ना. त्यांना बोलू द्याना. मी विचारतो की तुम्हांला आणखीन ह्याच्यावर काही बोलायचे आहे का? दि. १८/७/०७ चे क्लिअर झाले. त्यांनी सांगितले मला एवढेच बोलायचे आहे. त्याच्यापुढे हे ॲग्रीमेंट.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.):-**

सन्मा. सदस्यांना माझी विनंती आहे की, हा जो प्रस्ताव मा. सभापती साहेबांनी घेतलेला आहे आणि ह्या पूर्वी स्थायी समितीने ह्याच्यावर अगोदर धोरणात्मक निर्णय घेतलेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

स्थायी समितीने घेतलेले निर्णय बरोबर नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.):-**

मग तेच मांडा ना. स्थायी समितीने घेतलेले कोणते मुद्दे बरोबर नाही ते मांडा.

**मिलन म्हात्रे :-**

त्या अधिकाऱ्यांना बोलू द्या ना. तुम्ही कशाला हस्तक्षेप करता?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.):-**

मला एकच म्हणायचे आहे की, हा विषय फेर प्रस्तावासाठी आलेला आहे. त्या प्रस्तावावर सदस्यांना सर्व मुद्दे व्यवस्थित मांडावे.

**मिलन म्हात्रे :-**

हा फेर प्रस्ताव का? त्याचे आम्हांला विश्लेषण अधिकाऱ्यांनी द्यावे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़े.):-**

त्या प्रस्तावामध्ये मांडा ना. ते ॲग्रीमेंट चुकीचे आहे. त्याच्यामध्ये ॲडीशन व्हायला पाहिजे. कामकाजाची पद्धत कशी असते.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब तुम्ही आम्हांला कामकाजाची पद्धती सांगायच्या नाही. तुम्ही इंटरफेयर करायचे नाही. जबाबदार अधिकारी आहे त्यांनी क्लेरिफिकेशन द्यावे. हा करारनामा बरोबर आहे की नाही.

**मा. सभापती :-**

तुम्ही तुमचे मुद्दे मांडा ना. नंतर ते उत्तर देतील ना.

**मिलन म्हात्रे :-**

कोणाला? कशाला? काय गरज आहे? त्या अधिकाऱ्यांनी सगळं रजिस्टर करुन केलेले आहे. त्यांचे क्लेरिफिकेशन घ्यायची गरज पण नाही.

**मा. सभापती :-**

अधिकारी म्हणतात की, आम्ही बरोबर केलेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

ते रेकॉर्डवर येवू द्या ना. तुम्हांला हे सांगतो की, ह्या डिपार्टमेंट चे एकही अधिकारी ह्याची जबाबदारी घ्यायला तयार नाही. आत्ता टाउन प्लॅनर बोलतात की आर्किटेक ने हे प्रपोजल बनवले. त्यांनी ते बघितले आणि त्यांच्याकडे

दिले. आणि त्यांचे पत्र आहे की, मी जिम्मेदार नाही. कमिशनर साहेबांनी सही केले ते जिम्मेदार आहेत. कमिशनर साहेब रिटायर्ड झाले.

**मा. सभापती :-**

घेवारे साहेब, आता बोलले ना की, त्यांनी सर्व बरोबर केलेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

हे खाजगी बोलतात. एवढया वेळात त्यांचे क्लेरिफिकेशन झाले असेल. त्यांनी उठावे आणि मनुभाईच्या ॲग्रीमेंट बद्दल बोलावे.

**मा. सभापती :-**

ते बोलले ना की आम्ही जे केले ते बरोबर केलेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही ऐका. ते तुमच्या बाजूला बसलेले आहेत. त्यांनी दि. १८/७/०७ च्या ॲग्रीमेंट बद्दल बोललेले आहे. पुढचे दि. ३१/७/०७ चे ॲग्रीमेंट आहे त्याच्याबद्दल बोलू द्या.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. सभापती साहेब एक गोष्ट सांगा. जेव्हा हा विषय फेरविचारासाठी आला. त्यामध्ये झालेल्या कमिटीचा अहवाल, त्या कमिटीने घेतलेले निर्णय, कशा पद्धतीने द्यायचे ते आम्हांला का दिले नाही? आजच्या मिटींगमध्ये का दिले नाही? बाकीच्या मिटींगमध्ये सुद्धा दिले नाही. आता का दिले नाही. चार पानाचे टेंडर नोटीस देवून आम्हांला मोकळे केले. तुम्ही टिपणी का दिली नाही? एवढा वेळ विचारायला गेला नसता ना. मा. महासभा ने निर्णय दिया उनका दि. २६/४/०७ को मिटींग हूआ तो उन्होंने इधर टिपणी क्यों नही दिया? त्यावेळी आमचे पण गटनेता होते. गटनेताला मिटींगचे सर्क्यूलर गेले का नाही? त्याची सही झाली असेल तर आम्ही बघू ना.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा.):-**

माझे सुद्धा तेच म्हणणे होते. फेरप्रस्ताव करायचा काही हरकत नाही. सचिवांनी सुद्धा मान्य केलेले आहे. ह्याच्यामध्ये निर्णय झालेले आहे. ॲग्रीमेंट झालेले आहे. काही इम्लीमेंट झालेले आहे काही इंम्लीमेंट झाले नाहीत. त्याबाबतीत काही फेर निर्णय असतील तर त्याची चर्चा व्हायला पाहिजे. एक एक मुद्दा आणि एक एक आन्सर असे नसते. सभागृहात पद्धत अशी असते की, एखाद्याने आपले सर्व कामकाज मांडायला पाहिजे. आणि त्यांनी मांडले की आम्ही हे काम केलेले आहे. अशा पद्धतीने केलेले आहे आणि ह्याच्यात काय चुक आहे. आपल्याला फेरप्रस्ताव काय करायचे किंवा फेरप्रस्ताव करायला रिसपॉन्सीबिल्टी करायची असते. तुम्ही मांडा ना.

**मिलन म्हात्रे :-**

आम्ही मांडले ना. एकाही अधिकाऱ्यांनी उत्तर दिले नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा.):-**

तुम्ही हे केले का? ते झाले का? इथे कोर्ट का कामकाज नाही ना.

**मिलन म्हात्रे :-**

ते कामकाज सुद्धा आहे. तुम्ही टेंडर मंजूर करायला ही सभा बोलावता. कोर्ट कामकाज नाही म्हणजे...

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुम्ही त्यावेळेला का दिले नाही. त्यावेळेला आमचे गटनेता सुद्धा होते.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा.):-**

सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल साहेब तुम्हांला हे सांगितले की हा फेर प्रस्ताव मा. सभापती साहेबांनी एखाद्या सदस्याच्या प्रस्तावावर आणलेला आहे. प्रशासनाने हा प्रस्ताव आणलेला नाही. आता येथूनच चर्चा होईल. आणि जे तुम्ही मागाल ते देता येईल ना. हा प्रस्ताव प्रशासनाने आणलेला नाही.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब त्यांना बोलू द्या. ते डिपार्टमेंट चे आहे ते.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा.):-**

तेच बोलतात पण आज त्यांनी हे दिले नाही. ते दिले नाही...

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब आम्ही मागितलेले आहे. तुम्हांला पत्र दाखवतो.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा.):-**

आता येथे ज्या चर्चा होतील त्याचे कामकाज होईल ना. त्यांनी फेरप्रस्तावात आणले असते तर त्यांनी ते सर्व आणले असते.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मागून घ्या ना. त्यांना तर माहित आहे. फेरप्रस्ताव हे चार विषय आधी गेले.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब हिच गोष्ट घडून गेलेली आहे. आम्हांला आता ह्याच्यावर कार्यवाही करायची आहे. त्याच्याकरिता डिपार्टमेंट चे अधिकारी हजर आहे. त्यांची काय जबाबदारी ते आम्हांला त्यांना सांगू द्या ना. तुम्ही परत एकदा विषय काढला.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा.):-**

त्यांनी मांडली ना.

**मिलन म्हात्रे :-**

दि. ३१/७/०७ चे काय झाले?

**एस. ए. खान :-**

त्याचे कागदपत्रे काय असतील ते द्या ना.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

हे चुकीचे आहे. आम्हांला सिद्ध करायला हे कागदपत्रे पाहिजे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा.):-**

बी.ओ.टी.च्या प्रस्तावामध्ये प्रस्तावाला लिमिट नसते. त्यावेळेस बी.ओ.टी. च्या प्रस्तावामध्ये जे धोरण निश्चित होते आणि त्याची जी कार्यवाही होते ना. इंम्लिमेंट झाल्यानंतर प्रत्येकाला वाटते की, ह्याच्यात अजून असे व्हायला पाहिजे. महाराष्ट्रात जिथे जिथे बी.ओ.टी. चे प्रस्ताव झाले. त्याच्यावर पी.एल.आय. झालेले आहे. प्रस्ताव ज्या वेळेस येतात त्या वेळेस चर्चा करायची नाही. ते त्या वेळेस रद्द करायला पाहिजे होते. त्याच्यात जुने इन्कम यायला पाहिजे होते.

**मिलन म्हात्रे :-**

हा इन्कमचा प्रश्न नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा.):-**

कामकाजामध्ये मा. आयुक्तांनी निर्णय घेतल्यावर सर्व यंत्रणा रिस्पॉन्सीबल असते.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ज्या सभेमध्ये निर्णय झाला त्याचे इतिवृत्त नाही.

**मिलन म्हात्रे :-**

विधी अधिकाऱ्यांना दिले तेव्हा तुम्हांला विचारले का? असू द्या. त्याची ऑर्डर पण काढून आणले. कुठे काय करायचे आणि कुठे काय वापरायचे. त्याची पण आमची तयारी आहे. उगीच हा विषय आणलेला नाही. त्याचे ऑर्डर आहे ना. जिथे बघायच्या आहे तिथे बघायच्या इथे दाखवणार नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा. ) :-**

ऑर्डर दाखवा ना.

**मिलन म्हात्रे :-**

इथे ऑर्डर दाखवणार नाही. हे ठिकाण नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा. ) :-**

ह्याच्यावर पण चर्चा व्हायला पाहिजे ना.

**मिलन म्हात्रे :-**

ते इकडे कशाला दाखवू.

**सई वडके (विधी अधिकारी) :-**

साहेब मगाशी सांगितले की दि. ३१/७/०७ चे ॲग्रीमेंट हे ॲक्झीक्यूट करण्यात आले.

**मिलन म्हात्रे :-**

त्याच्यामध्ये आपले गर्व्हमेंटचे व्हिटनेस.

**सई वडके(विधी अधिकारी) :-**

साहेबांनी सांगितले की कोणाच्या सह्या नाही. फक्त तत्कालिन आयुक्त साहेबांची सही आहे.

**मिलन म्हात्रे :-**

सर्व्हे क्रॉस बरोबर आहे काही प्रॉब्लेम नाही. घेवारे साहेबांचे काय म्हणणे आहे. साहेब हे दोन्ही ॲग्रीमेंट एक दि. १८/७/०७ चे आणि दुसरे दि. ३१/७/०७ चे आहे. ह्यामध्ये जे अंतर्भूत ठराव आहे. मा. महासभेच्या ठरावामध्ये जी कमिटी नेमले त्या कमिटीचे जे काही फाईंडींगस आहे. ते ह्या ॲग्रीमेंट मध्ये असायला हवे होते. कारण हे ॲग्रीमेंट त्याच्यावर ग्राउंड करते. त्याचा बेस तो आहे. ज्या ठरावातर्फे स्थायी समिती दिलेली आहे. ह्या ठरावामध्ये त्यांनी वरतीच उल्लेख केलेला आहे की ह्या कमिटीत त्यांचा समावेश आहे. त्यानुसार समितीची दि. २६/६/०७ ह्या ठरावाच्या अगोदर आणि मा. महासभेच्या ठरावाच्या अगोदर त्या कमिटीची प्रोसिडींग द्यायला पाहिजे होती. कारण, तेव्हा कोण होते कोण नव्हते. त्यांनी नेमके काय केले. आता, कमिटीने सांगितले की द्यायचे नाही. परंतु, रेफरन्स घेतलेला आहे की हे दिलेले नाही आणि हा जो ठराव आहे. ह्या ठरावानुसार जी काही क्रिडांगण बी.ओ.टी. ला दिले आणि फार चांगले चालले अशातला भाग नाही. बऱ्याचशा ठिकाणी बी.ओ.टी. चे प्रकरण फेल पण गेलेले आहे. सांगायचा

दृष्टीकोन असा आहे की, हे दोन्ही करारनामे जे बनवले. ठरावामध्ये करारनामे कसे करायचे हे कुठल्याही ठरावात नाही. मा. महासभेने पण असे दिलेले नाही की, असा ठराव करा किंवा स्थायी समितीने सुद्धा सांगितलेले नाही पण ह्या ह्या संस्थेचे ठराव करा असे त्यांनी सांगितले. आणि त्यांनी फक्त मंजूरी दिले ह्याच्यात पेपर नोटीस दिलेली नाही. मूळ मालकाचे सर्च रिपोर्ट ज्या माणसाकडून आपण जमिन घेतो. ती नेमकी जमिन त्याची आहे का? ते बघायला सर्च रिपोर्ट असतो. ले आउट प्लॅन असतो की, आपल्याला एवढी एवढी जागा देतो. त्या ले आउट प्लॅन चा सुद्धा ह्याच्यामध्ये उल्लेख नाही. ही संस्था ही आरक्षण डेव्हलप करायला घेते. ह्याच महापालिकेचा एक नियम तुम्हांला सांगतो. तो पण नगररचनेने केलेला आहे. त्याचा इफेक्ट इकडे कुठे दिसत नाही. तो म्हणजे एक छोटा अंध - अपंग, कोणीतरी असा असतो की, त्याचे पी.सी.ओ. चे स्टॉल आहे किंवा एक बूथ आहे. आर.ए.सरिता चे स्टेट गर्व्हमेंटचे नियमानुसार बसण्याचे त्याला बुथ आहे. त्याला आपल्याला १५ वर्षाचे वास्तव्याचे सर्टीफिकेट लावावे लागते. तर आपले परवाना डिपार्टमेंट थोडासा विचार करते. पूर्ण विचार करत नाही. आज ह्या दोन संस्था ज्या काही आहेत. आपण ह्या ॲग्रीमेंटमध्ये म्हणतो की ह्या रजिस्टर आहेत. ह्याचा एकही पुरावा ह्या दोन्ही ॲग्रीमेंट मध्ये कोणीही जोडलेला नाही. फक्त रजिस्टर नंबर दिलेला आहे. ते सुद्धा परिपूर्ण आहे असे मला तरी प्रायमाफिसी वाटत नाही. कारण संस्था जर व्यवस्थित असेल. शाळा चालवणारी म्हणा. क्रिडांगण करणारी म्हणा तर त्या संस्थेचे जे बॅक ग्राउंड असते ते त्यांनतर त्याचे रजिट्रेशन त्यांच्या मिनिटस् त्यांनी घटना हे सगळं मागवले जाते. त्याचा ह्याच्यामध्ये कुठेही उल्लेख नाही. संक्षिप्त असा डिटेल कुठेच उल्लेख नाही. ह्या संपूर्ण ॲग्रीमेंटमध्ये फक्त १०० रु. दिवस म्हणजे आज ९० फूट रोडला भाडयाने दुकान घ्यायला गेला तर, जवळ जवळ त्याचे डिपॉझिट दिड लाख रु. आहे आणि २५ हजार रु. भाडे आहे. आज आपण एवढा मोठा प्लॉट दिला. त्या प्लॉट चे रेडी रेकनर नुसार रेट काय आहे? ते सुद्धा ॲग्रीमेंटमध्ये दिलेले नाही. स्टेट गर्व्हमेंट चा अधिकृत दर तीन महिन्यांनी सहा महिन्यांनी रेडी रेकनर नुसार जो रेट होतो तो ह्या ॲग्रीमेंट मध्ये त्यावेळेला दिला पाहिजे होता की आम्ही दि. १८/७/०७ ला हे रजिस्टर करायला चाललो. हा रेडी रेकनर चा रेट आहे. मा. आयुक्त साहेबांना सांगितले की रेडी रेकनरचा रेट आहे १०,०००/- रु., आणि इकडे दिले ५०००/- रु. किंवा १५०००/- रु. ते पण असू शकते. गर्व्हमेंटच्या नामानुसार आपण जसे जिल्हा परिक्षकची जागा ताब्यात घेतली त्यावेळेला रेडी रेकनर नुसार रेट काढला गेला. त्याची अमाउंट घेतली गेली. त्यानंतर ते रजिस्टर केले गेले. ते तुमचेच ॲग्रीमेंट आहे. त्या ॲग्रीमेंट मध्ये रेडी रेकनर वापरला गेला. ह्या दोन्ही मालमत्ता तुमच्या स्वतःच्या असून कुठल्याही प्रकारे रेडी रेकनर चा रेट कुठेही विचारात घेतला नाही. ही अमाउंट कोणी ठरवली? स्टॅण्डींग पुढे जी वस्तू आली किंवा तुम्ही ह्या टेंडरमध्ये जे अमाउंट प्रोजेक्ट केले की १० लाख रु. ही रक्कम ठरवणारी सक्षम व्यक्ती कोण? आणि तिला कोणी अधिकार दिले? हे ॲग्रीमेंट मा. आयुक्त साहेबांनी जेव्हा रजिस्टर केले तर तुमच्या एम.आर.टी.पी. ॲक्ट मध्ये तरतुद आहे का? मा. आयुक्त साहेबांना अधिकारच नाही. आणि बी.पी.एम.सी. ॲक्ट मध्ये सुद्धा तरतुद आहे. मा. महासभेने जसे मा. आयुक्तांना नियुक्त केले पाहिजे. जसे टेंम्बा हॉस्टिपटलच्या केसमध्ये महापालिकेने किंवा मा. महासभेने मा. आयुक्त साहेबांना जे पॉवर्स दिले. एक ठराव माझ्या लक्षात राहिलेला आहे. तशा प्रकारचा ठराव की हे दोन्ही ॲग्रीमेंट मा. आयुक्त साहेबांनी रजिस्टर ऑफिसला जावून रजिस्टर करायचे पॉवर्स आम्ही मा. आयुक्त साहेबांना देत आहोत. अशाप्रकारचा ठराव ह्याच्यात नाही आणि तो ठराव नसताना नियमबाह्य जावून मा. आयुक्त साहेब सही करुन निघून गेले. पहिली गोष्ट निवडणुकीच्या वेळी आचार संहितेच्या कालावधीत कुठलेही मोठे मोठे धोरणात्मक निर्णय घेवू नये असे निवडणुक मा. आयुक्त साहेबांचे नॉन्स आहेत. माझ्याकडे त्याच्या कॉपी आहेत. राज्य सरकारचा असा एक जी.आर. आहे. डी.एम.ए. ऑफीसचा की तुम्ही प्ले ग्राउंड ही बी.ओ.टी. तत्वावर दिली नाही पाहिजे. आणि हायकोर्ट चे पण असे जजमेंट आहे की तिकडे फक्त दोनच कार्यक्रम होतात. एकतर “झेंडावंदन आणि परेड व सलामी” चा कार्यक्रम होतो. त्याच्या व्यतिरिक्त कुठलेही कर्मशियल करु नये. असे असताना आपल्या ह्या ॲग्रीमेंट मध्ये् केवळ ३० दिवसाच्या नोटिसने १०टक्के पेक्षा जास्त जागा आहे. ती त्या विकासकाला त्या आरक्षणामध्ये क्लेट हाउस अशी दुकाने चालवण्याकरिता अन्यत्र ते कर्मशिअल ॲक्टिव्हीटी तो करु शकतो. फक्त मा. आयुक्त साहेबांनी ३० दिवसांची नोटीस द्यावी आणि त्याचे दुकान चालू आज मूळ आरक्षण जे आहे ते सुद्धा ६ हजार मिटर वार नाही. काल आम्ही जावून बसलो होतो. ७५ X ७५ मि. चा एल टाईप मोजला त्याचे आपण ताब्यात किती घेतले? आपल्याकडे ताबा पावती आहे का? ह्याच्यामध्ये त्या जागेची ताबा पावती सुद्धा नाही. ज्याचे आपण रजिस्ट्रेशन केले. तुमची ताबापावती पहिला बनली पाहिजे ना. की ही ॲग्रीमेंट देतो म्हणजे १०० रु. व्हॅल्यूएशन स्टॅम्प च्या ॲक्टच्यानुसार पाच दहा हजार रु. चे जे स्टॅम्प लागेल ते ते लावून तुमची ताबापावती एक सेप्रेट बनली पाहिजे. की ही जागा आम्ही ताब्यात देतो. त्याच्याबदली तुम्ही हा टी.डी.आर. दिला. ह्या संपूर्ण ह्याच्यामध्ये दि. ३१/७/०७ ला जे ॲग्रीमेंट केले. त्याचा पुरेपूर त्या विकासाने फायदा करुन घेतला. दिड महिना झाला मॉल चालू झाले. त्याचा टॅक्स अजूनपर्यंत भरला नव्हता. माझे पत्र गेल्या नंतर त्यांचे क्लेरिफिकेशन आले. पाण्याचे कनेक्शन नाही. रात्री पाणी उपसून समोरच्या बिल्डिंगला टॅंकरच्या टॅंकर वाहीले होते. तर ते पाणी येते कुठून? जमिनीतून खार पाणी येते आम्ही इकडचे शेतकरी आहोत. ३ फुटावर खार पाणी लागते. आज आपल्याकडे ह्या ॲग्रीमेंटनुसार त्या आरक्षणाचा विकसित करण्याचा प्लॅन किंवा प्रपोजल म्हणा. त्याच्या आर्किटेक्ट ने विथ इन सिक्स मंथ पर्यंत पटकन दिले पाहिजे. अजूनपर्यंत ते दाखल झाले त्याच्यानंतर त्याचे तुम्हांला बेनिफिट द्यायचे आहे. जे टी.डी.आर., एफ.एस.आय. तुम्हांला तुमच्या कडून काढायचे आहे ते तुमच्या खिशातून काढा. बी.ओ.टी. च्या नावावरती ते तुम्ही त्याला नंतर द्यायचे आहे. तुम्ही ते संपूर्णपणे अगोदर देवून मोकळे

झाला. त्याचे सगळे प्लॅन पास झाले. तुम्ही त्याला कंम्प्लीशन सर्टिफिकेट दिले. काय असेल ते त्याला तुम्ही सगळी व्ही.आय.पी. ट्रीटमेंट दिली. त्याचे सगळं पूर्ण झाले. त्या बी.ओ.टी. च्या वर आरक्षण कधी तुमच्याकडून घेतले. त्याचा अजून तुमच्याकडून प्रस्ताव सादर झालेला नाही. तुमचे ॲग्रीमेंट आहे त्याच्यामध्ये क्लॅशेश काय आहे. आता तुम्ही कसल्या चुका सुधरवणार कोण सुधरवणार? आर्मि ट्रेंडर म्हणजे कोण? आज ह्या ॲग्रीमेंट मध्ये डिस्ट्रिक्ट कोर्ट, सुप्रिम कोर्ट, हायकोर्टमध्ये जायला तुम्हांला मुभा ठेवलेली नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो. ) :-**

जाता येते.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही बोलता. त्या ॲग्रीमेंटमध्ये नाही. जाता येते ते मला ही माहित आहे. आम्ही गेलो. आता पुढे पण जावू. पण ह्याच्यात सगळे हात पाय दाबून घेतले. तुम्ही कुठल्या याद्या दाखवल्या आमच्या कमिटीला तुम्ही गटनेता लिहिले ना. तर तुम्ही आम्हांला ॲग्रीमेंट पाठवले की तुमच्या निकालानुसार हे दिवे लावले. ह्याचा उजेड हा पडला आज ती जी कमिटी आहे ना ती कमिटीसुद्धा ह्याच्या गोत्यामध्ये येईल आणि मग तुम्ही बोलाल. की त्यांनी बनवले. कारण त्यांच्याकडे गेले तर त्यांनी सांगितले की विधी अधिकाऱ्यांनी बनवले. विधी अधिकारींनी लेखी पत्र दिले की ते मा. आयुक्त साहेबांचे अधिकार आहेत. माझे अधिकार नाही. आज ह्या दोन्ही ॲग्रीमेंटमध्ये फार काही मोठे आर्किटेक्ट ने किंवा विधी अधिकारीने केले अशातला भाग नाही फक्त पहिला पिक्चर इकडे उमटवला. नावे बदलले. बिल्डर लोक कसे करतात तसे झालेले आहे. आज हे जे पहिले ॲग्रीमेंट आहे. दि. १८/७/०७ चे त्याच्यात तुम्ही मगाशी किती घोळ घातला. म्हणून मी बोललो की मी सगळ्या शेवटला बोलेल, तर तुमच्या अधिकाऱ्यांनी कुठेही क्लेरिफिकेशन दिलेले नाही. अजुन ते ॲग्रीमेंट वाचलेले नाही. शेवटच पान नंबर असेल तर तुम्ही ॲग्रीमेंट मागवून घ्या. ह्या ॲग्रीमेंट चा पार्ट आहे. दिपक चॅरिटेबल ट्रस्ट रेग्युलेशन दिले. त्यांनी तुम्हाला ठराव पास करून दिला. के.सी. मेहता आणि चेअरमन के.सी. मेहता हे चेअरमन आहेत. ह्याचे ट्रस्टी कोण आहे ते बघा. मीसेस के.सी. मेहता म्हणजे त्याची मिसेस असणार आणि डी.सी. मेहता म्हणजे ही घरातली ट्रस्ट. ह्या घरातल्या ट्रस्टचे रजिस्ट्रेशन नं. कुठे दिले नाही. त्याचे कुठेही सर्टिफिकेट लावलेले नाही. ट्रस्ट कुठची तर बडोद्याची. डेव्हलप कुठे करणार तर भाईंदरला तुमची ती संस्था स्थानिक आहे की नाही. आता बडोद्याचा ह्या संस्थेनी काम केले? संस्था अस्थित्वात आहे की नाही ते पण नाही. फक्त बडोद्याचे गुजरात गर्व्हरमेंट पण काही नाही. मी उद्या माझ्या मुलाला घेवून येतो. मला पण एखादा भुखंड देवून टाका. हा तोच प्रकार झाला. साहेब, ह्याच्यामध्ये बघा त्यांनी वरती दिले डी.सी.टी. फरदर टू दिस मिरा भाईंदर म्युनसिपल कॉरपोरेशन इश्यु ऑर वर्क ऑर्डर डेटेड २०/०६/२००७ त्यांचेच पत्र आहे आणि त्या ॲग्रीमेंटला परत पार्ट आहे. दि. २०/०६/२००७ ला आपण एक वर्क ऑर्डर इश्यु केली असे त्याचे म्हणणे आहे आणि कमिशनर साहेबांनी व्यवस्थित जावून ह्या पत्राची नोंदणी केलेली आहे. आणि तुमचे ॲग्रीमेंट कधी झाले ते वाचा. दि. १८/०७/२००७ आणि दि. २०/०६/२००७ ला तुमची वर्क ऑर्डर इश्युड झाली. म्हणजे तुम्ही तिकडे जागा विधीवत केली. आपल्या इकडे टेंबा हॉस्पीटलचे काम अजुन झालेले नाही आणि बाकीचे आरक्षण डेव्हलप करायला एवढी घाई झाले की, इकडे तुम्ही रजिस्ट्रेशनच्या एक महिना अगोदर तुम्ही त्याला वर्क ऑर्डर इश्युड करून टाकली, आता अधिकारी बोलतात मी नाही केले. त्या आर्किटेक्टने केले. आज इकडे एक फॅमिली तुमचा पुर्ण प्लॉट हडप करतो. त्याचे कसले नॉन्स नाही त्याची पात्रता काय आहे? पाच पंचविस लाख रू. मी पण उद्या डिपॉजिट करतो. बँक श्युअरटी द्यायला काय लागते. तुमची वर्क ऑर्डर एक महिना आधी इश्युड कशी झाली. ह्याचा खुलासा कोण अधिकारी करतो का? ही वर्क ऑर्डर एक महिना आधी कोणी काढली? हा अधिकारी कोण? मा. आयुक्त साहेबांच्या सहीने काढली? ते अधिकार मा. आयुक्त साहेबांना होते का? ह्याच्यामध्ये बरोबर एक महिना अगोदर म्हणजे दि. १८/०७/०७ ला ॲग्रीमेंट काढले आणि दि. १८/०६/०७ ला डेव्हलप करण्याकरिता वर्क ऑर्डर काढले. हे त्यांचेच पत्र आहे. ही संस्थाच कबूल करते. संपूर्ण पणे हे ॲग्रीमेंटच आहे. ह्याच्यामध्ये लिगल्स करणे फक्त १०० रू. पॅनेल्टी चार्जेस लागते. हे चार्ज कोणी ठरवले? सभागृहाने ठरवले? आता आमच्याकडून तुम्ही ऑक्ट्रॉयचे रेट, हाउस टॅक्सचे रेट, पाणी पट्टीचे रेट, पेनेल्टी, दंड त्या सगळ्याची तुम्ही आपल्या सभागृहाकडून मान्यता घेता. हे सगळ झाल्यानंतर स्थायी समिती पुढे आणतो. त्यांच्या अगोदर ह्याचे रेट काय असावे? तुमच्याकडे ठरले असेल तर ठरावानुसार लावलेला आहे. १००० रू., १० लाख रू., २० लाख रू., २५ लाख रू., जे काही असेल ती अमाउन्ट आम्हाला ह्या सक्षम ॲथॉरिटी ने नक्की करून दिली. आणि त्याचे आम्ही प्रोजेक्ट करतो. आपला आज एवढा मोठा प्लॉट, तुमची शाळा हे लोक बांधणार. त्याच्यात त्यांनी असे ही दिलेले आहे की, मा. आयुक्त साहेबांच्या दहा दिवसाच्या नोटीस नंतर ह्याच्याकडून दोन लाख रू. घेतलेले आहे. दहा दिवसाच्या नोटीसनंतर ह्या प्ले ग्राउंडमध्ये तो सर्व कर्मशियल ॲक्टीव्हीटीज करू शकतो. तुम्ही जे म्हणाला पी.आय.एल. फाईल झाल्या. तुमचे म्हणणे अगदी १०० टक्के खर आहे. तुम्हाला माहिती करिता सांगतो. आपल्या हॉस्पीटलची जेव्हा केस चालू होती. तेव्हा समोरच्या ओवल मैदानाची केस चालू होती आणि व्हेल सर्कल ला ते ग्राउन्ड राज्य सरकार आणि बृहन्मुंबई महानगरपालिकेने एकत्रित रित्या ते दिले होते. स्वतः हायकोर्ट चे जज तिकडे जावून त्यांनी टेलिफोन सुद्धा उखडून फेकलेले आहे. त्यांनी ते सगळे टेलिफोन काढायला लावले. टेलिफोन, वॉशबेसिन, नो अदरवाईस कर्मशियल ॲक्टीवीटी स्टँड सुद्धा त्यांचे काढलेले त्या ह्याच्यात त्यांच्या स्वतःचा फोटो आला होता आणि त्या सहारा टि.वी. ला स्वतः जजेसने स्वतः जावून त्या प्ले ग्राउन्डची स्वतः व्यक्तीशः पाहणी केली होती. हे सुद्धा आलेले आणि हे मी बघितले होते. आज प्ले् ग्राउंड म्हणजे कुठल्याही प्रकारे, कुठल्याही कर्मशिअल ॲक्टीव्हिटी मध्ये द्यायचा तुम्हांला

अधिकार नाही. एक डी.एम.ए. ऑफीसचा जी.आर. आहे. ते तुम्हांला नंतर दाखवेन. आमचा ठराव आम्ही पास करतो. तुम्ही कार्यवाही काय करता. त्याची तुम्हांला महिना भराची लिबर्टी द्यावी लागते. त्यानंतर मला हे सगळं मटेरिअल घेवून मला जे योग्य करायचे ते मी करीन. त्या डी.एम.ए. ऑफीसच्या जी.आर.मध्ये क्लिअर कट लिहिलेले आहे की प्ले ग्राउंड मध्ये कुठल्याही प्रकारे, कुठलेही कर्मशिअल ॲक्टिव्हीटी किंवा परमनन्ट स्ट्रक्चर नसावे. त्या मनुभाईच्या ॲग्रीमेंट मध्ये वॉचमेनच्या चौकी पासून सगळे गोडावून, पाण्याची टाकी वगैरे सगळं टाकले आणि तो जे पाणी घेणार त्याची लायबरिटी, बिल कोण भरणार? त्याची अमाउंट किती असावी? हे काहीच टाकलेले नाही. म्हणजे उद्या त्यांनी पाणी घ्यायचे म्हणजे वाटेल तेवढे वापरायचे ते ग्राउंड ला दिले असे दाखवायचे. आणि त्यांचे बिल तुम्हांला आकारायचे नाही. तुम्ही ते बिल आकारु शकत नाही. असे ह्याच्यामध्ये सगळं दिले. म्हणजे तुम्ही काही काही करायचे नाही. हे ह्याच्यात दिलेले आहे आम्ही सर्व पॉईंट टू पॉईंट वाचलेले आहे. त्याचा त्यांनी खुलासा केला पाहिजे. १००रु. जो आम्ही रेट लावलेला आहे. त्याचा मालक अमुक अमुक आहे. त्यांनी आम्हांला सांगितलेले आहे की, त्यांनी आम्हांला आदेश दिले की आता १०० रु. रेट लावा. बाकीच्या अन्य अग्रीमेंटमध्ये ५०००/- रु. १००००/- रु. पॅनेल्टी लावले म्हणून लोक पटापट कामे करतात. आपले त्या ब्रिज चे घोंगडे भिजत पडले. असे जे काही ठराव केले आपल्या माहितीतल्या लोकांना टेंडर दिली. आपण आपले त्या बिलवर ४ करोड रु. खर्च झाला आहे आणि त्यात इनक्वायरी कमिशन्स बसतात ना. त्यात वकिलांची पॅनल वगैरे अपॉईंट केलेले आहे. सगळे कामकाज सगळे मनुष्यबळ वगैरे हे सगळं आहे. मी बोलणार तर तो एका मिनिटाचा खर्च पकडणार. आज आपण येथे सगळे बसलो ना त्यांचा पगार एका मिनिटावर चालू असतो. स्थायी समिती भरली त्याला खर्च येतो. जसे ॲसेम्बली अधिवेशनाच्या एका सेकंदाचा ८० लाख रु. सगळ्यांचा खर्च होतो. सगळे, गाडया वगैरे सगळं पकडून सांगायचा दृष्टीकोन असा आहे की कोणाचा आर्थिक विकास झाला किंवा काय झाले ते महत्त्वाचे नाही. आज आपण ह्या ॲग्रीमेंटमध्ये काय काय दिलेले आहे. ते कोणी वाचले का? मी तुम्हांला १५ दिवस अगोदर पत्र दिलेले आहे. तर त्याच्यात मुद्दे वाईस काहीच नाही की हे १० लाख रु. कोणी ठरवले. तुम्ही टेंडर काढले् आणि तुम्हांला हा माईक १० लाख रु. मध्ये विकायचा आहे. तुम्ही त्याचे व्हॅल्यूएशन केले का? पहिली गोष्ट अशी की, तुमचे व्हॅल्यूएशन नाही. ॲग्रीमेंटमध्ये ठरल्यानुसार आज जी जागा तिकडे मोकळी आहे. तुम्ही ह्याच्यात स्केच लावले का? की ६ हजार मि. जागा अशी त्रिकोणी आहे, चौकोनी आहे. कुठल्या तरी झेरॉक्स चे प्लॅन लावून आम्हांला दिलो आहे. पण तुमचा इंजिनियर गेला का? आज माझ्या वॉर्डामध्ये एका फ्लॅटचे क्षेत्रफळ चुकीचे ठरले. तुम्ही लगेच इंजिनियर पाठवता. तो ड्राईंग काढतो. मेजरमेंट देतो सही शिक्का मारुन टॅक्स डिपार्टमेंट ला देतो. मग तुम्ही आकारणी करता. आज हे व्हॅल्यूएशन झाले. तुमचे सी.टी. इंजिनियर कधी गेले का? तुमचे ज्युनिअर इंजिनियर गेले का? तुमच्याकडून तुम्ही नक्की केले का की हे किती मोजमाप आहे? ते सहा हजार मी. सांगतात आणि हे ७ हजार मी. आहे. १ हजार त्यांना जास्त द्या. हे ७ हजार मी. सांगतात आणि ते ४ हजार मी. आहे. दोन हजार कमी आहे तर ६ हजार करुन घ्या. हे तुम्ही कुठल्या आधाराने ठरवले. ह्याचा एक ही पेपर ह्या ॲग्रीमेंटमध्ये लावलेला नाही. ऑथेंटिकली ह्याला म्हणतात की, ह्या ड्राईंग नुसार आम्ही ह्या निर्णयास आलो की आम्ही ६हजार स्क्वे.फुट जागा ताब्यात मिळणार आहे. आज त्या संपूर्ण प्ले ग्राउंड च्या बाजूला ही लोकाभिमुख असते. तुम्ही हे लोकांकरिता केले ना. म्हणजे लोकांना चांगले व्हावे. लहान मुले खेळावी. ह्यांचे आरोग्य सुदृढ व्हावे. आज तो जो विकासक आहे. त्यांनी तिकडे काही जाहिराती केल्या. त्याला आपण कमर्शियल ॲक्टीव्हीटी म्हणावे. ह्याची त्यांनी तुमची परमिशन घेतली का? आज त्यांनी एक होल्डिग्ज लावले उद्या दहा होल्डिंग्ज लावले मध्ये एक चांगला मोठा टॉवर ठोकून देईल. कुठले टॉवर. मोबाईलचे टॉवर वगैरे असतात ना ते. कारण त्याची तरतुद ह्याच्यामध्ये आहे. ३० दिवसाची मा. आयुक्त साहेबांना नोटीस देवून कमर्शियल ॲक्टीव्हीटी त्या करु शकतात. एकदा सुरुवात झाली की, जर तर सुरु होतो. महापालिकेची आपण पहिला होल्डिंग्ज दिलेले आहे. ह्याच्यात अनेक वाद झाले. मी स्थायी समितीचा सदस्य असताना सुरुवात आहे. हे मी बघतो. सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल, शरद पाटील साहेब हे माझ्या बरोबर त्यावेळेला होते. सांगायचा दृष्टीकोन असा आहे की, त्या ॲग्रीमेंट नुसार ज्या कार्यवाही झाल्या पाहिजे होत्या त्या कार्यवाही झालेल्या नाहीत. त्याचा मोबादला मात्र सगळा झाला. आर्किटेक ने त्या बिल्डिंग चे टॉवर चे सगळे प्लॅन टाकून झाले. ते पूर्ण झाले. परिक्षण पण झाले. धंदा सुरु झाला अजून तुमचे ग्राउंड झालेले नाही. आणि ते होणार पण नाही. कारण १०० रु. दिवसांचे सांगितले. १०० रु. दिवस लेट फी आपण आकारतो. वर्षाचे किती होतात ते काढा ना. एका महिन्याचे ३१०० रु. होतात. १२X३=३६ म्हणजे ३६ हजार रु. काय वाईट आहे. ३६ हजार रु. मध्ये त्याला तिकडे बाकीचे सगळे मिळाले. त्याच्यामानाने १० लाख रु. काहीच नाही. आर.एस.आय. वगैरे सगळा झाला. मिळाला तो युटीलाईज केला त्याला कोणीही अडवल नाही. गिव्ह ॲण्ड टेक पॉलिसी असते. आम्ही तुम्हांला प्ले ग्राउंड देतो. तुम्ही आमच्याकडून एफ.एस.आय. घ्या. ह्याच्या बदल्यात तुम्ही आम्हांला जी सेवा देत आहात ती सेवा तुम्ही त्यावेळेला दिली पाहिजे. त्याला काही टर्म्स कंडीशन वगैरे आहेत की नाही? त्या कोणी बघितलेला नाही. आजही त्याचे तिथे काय चालले तिकडे जावून बघायची. कोणाला गरज नाही. त्या जागेवर महानगरपालिकेतर्फे ही जागा संबंधित माणसाला आपण विकसित करण्याकरिता दिले. ३० वर्षाकरिता किंवा किती वर्षाकरिता तो भाग निराळे आहे. पण महापालिकेचे ह्यात कुठे अवलेशच नाही. म्हणजे पहिले काय असते ते मालक तुम्ही आज आमच्या इकडचे सुलभ शौचालय बी.ओ.टी. तत्वावर केले. त्याची मालकी महापालिकेकडे आहे. आणि तुम्ही जे फक्त ३० वर्षाकरिता लिज ने दिले. ७/१२ उतारा वरती जेव्हा लिज चे नाव दिले. ते इतर हक्कात लागते. मालकाचे नाव ७/१२ उतारावरचे कधीही

उतरत नाही. तुमचे ७/१२ उतारावरचे कधीही उतरत नाही. तुमचे ७/१२ उतारावरचे नाव बदलणार नाही. जो कोणी आहे त्याचे इतर हक्कात लागणार आहे. मूळ कायद्याचे नाव बाजूला लागते किंवा खाली लागते. टाईप ऑफ स्ट्रक्चर ७/१२ वर खाली लागतो. इकडे कुठे क्रिडांगण असेल तर क्रिडांगण लागेल. त्याकरिता त्या जागेवरती आजच्या तारखेला मूळ मालक कोण आहे? ह्याची महापालिकेला किंवा उद्यान विभागाला कुठे काहीही पडलेले नाही. क्रिडांगण हे आपल्या उद्यान विभागामध्ये आहे. त्याचेही आपण कामकाज सांभाळता. हे करारनामे झाल्यानंतर जे काही चुकीचे, वाईट बरोबर असतील ते निघेलच पण त्याचे त्या डिपार्टमेंटला करारनामे अजून दिलेले नाही, टॅक्स डिपार्टमेंटला दिलेले नाही, पाणी विभागाला ही दिलेले नाही, वन विभागाला दिलेले नाही. काहीच नाही. व कोणालाही दिलेले नाही आज ह्याच्यामध्ये आजूबाजूने रोड काढलेले आहे. त्या रोडची जागा सुद्धा ह्याच्यातुन कट केलेली आहे. काल आम्ही जावून टेप ने माप घेतले आहे. ७५ मी. असे आहे. आणि ७५ मी. तसे आहे. म्हणजे त्याचा चौरस ७५ X ७५ चा आहे. आता तुम्ही आता तुम्ही त्याचा हिशोब लावा. ६ हजार मी. म्हणजे दिड एकर झाले. ती जागा दिड एकर परफेक्ट तुमच्या प्ले ग्राउंडला यूज होते. तर त्यांनी काही दिले का? आणि हे आपल्या अधिकाऱ्यांनी जावून देखिल बघितलेले नाही. त्याचे कुठलेही ह्या बाबतचे पत्र नाही. तुम्ही आज वाचवून वाचवून किती वाचवणार? मा. महासभेचा ठराव काय बघतो. कमिटी बनवा मग तुम्ही कमिटी बनविली. आज ह्या ठिकाणी सरळ सरळ ह्या पत्रामध्ये विधी अधिकारीने सांगितले की हायकोर्ट, सुप्रिम कोर्ट किंवा डिस्ट्रीक्ट कोर्टात जरी जायचे असेल आणि आम्ही तुम्हांला हे केले तरी आरबिट्रेटर नेमणार म्हणजे आरबिस्ट्रटर कोण? परत नगररचनाकार? ह्या चुका नगररचनाकारांनी केल्या आणि ज्या चुका विधी अधिकाऱ्यांनी केल्या. त्यांचेच पुढे प्रकरण जाणार. आरबिस्टेटर म्हणजे कोण मंत्रालयातून उद्या कोणतरी मॅनेज करुन पाठवतील. निकाल काय असेल तो देवून टाका. म्हणजे तुम्हांला हे क्लॉज पाहिजेच नाही. आपल्या महापालिकेच्या पॅनलवर एकूण किती वकिल आहेत? माझ्या माहितीनुसार तीन ते चार वकिल आहे. चांगले आहे. मान्यता प्राप्त आहेत. ते ठाण्याला असतात. त्यांच्याकडून तुमच्या आर्किटेकने दिलेला ड्राफ हा कनफर्म केला का? आपटे साहेब आहेत, कुलकर्णी साहेब आहेत. आणखीन कल्याणकडून एक मॅडम येतात. खालती आणखीन एक दोन वकिल असतील कारण नंतर किती नियुक्त्या केल्या ते मला माहित नाही. पण ह्या पॅनल वरच्या असलेल्या हायकोर्टच्या मोठया वकिलांकडे तुमचा हा ड्राफ ॲप्रोअल घेतला का? ॲडव्होकेट चे अप्रोल आहेत का? तुम्ही एवढा मोठा व्यवहार करता शहराचे फार चांगले होणार आहे. आणि पुढच्या ३० वर्षाकरिता आपण ही प्रॉपर्टी देणार आहे. तुम्ही ३० वर्षाकरिता जो पॉईंट टाकलेला आहे. साहेब कायदे आता दिवसेंदिवस बदलतात. आज आपण ज्याठिकाणी बसलो तिकडे तलाव होता. नगरपरिषद असताना सुद्धा मोठा तलाव होता. नंतरही बिल्डिंग झाली. जर उद्या त्याचे प्रयोजन बदलले. आपल्याला वाटले की इथे हॉस्पिटल असावे. येथे महापालिकेची मोठी बिल्डिंग असावी तर त्याची आवश्यकता आहे आणि पुढच्या भविष्यात आपल्याला पुढे कुठेतरी ७ हजार मी. पेक्षा १२ हजार मी. डेव्हलप करावेसे वाटले आणि ती जागा तुम्हांला जर घ्यावीशी वाटली. तर तो ३० वर्षानंतरचा तुमचे काय त्याची पण प्रोव्हीजन ह्याच्यात केलेली नाही. ह्याच्यामध्ये जर तुमचे काही झाले. वापरले गेले नाही. २५ रु. च्या ऐवजी १००० रु. घ्यायला लागला. दहिसर ला घोसाळकर साहेबांच्या रिझर्व्हेशनचे पे गार्डन आहे. त्याचे वाद हायकोर्टात कितीतरी गाजतो आहे. महापालिकेचे तत्कालिन मा. महापौर साहेबच कोर्टात अपिल म्हणून गेले होते. तिथे सभासदाची फी किती घ्यावी. तर २५ हजार रु., २५ हजार रु. घेता. उद्या ते बोलतील आमचे इकडे पण हायफाय लोक आहेत. ५० लाख रु.च्या फ्लॅटमध्ये राहतात. तर आम्हांला २५ हजार, ५० हजार रु. देतील ना. पण तुम्ही त्याचे काहीतरी लिमिटेशन केले का? ह्याचे बायलॉज बनवले का? ह्याचे बायलॉज कुठेही बनवलेले नाही. बी.ओ.टी. च्या आरक्षणाबद्दल बायलॉज प्रशासनाने अजून बनवलेले नाहीत आणि ठाणे महापालिकेत तर २५ वर्षे झाली. तिकडे ही नाही. म्हणजे आपले पण नाही. ज्या गोष्टीचा बायलॉज नाही. त्याचे रेट तुम्ही कसे ठरवले. मा. महासभेत हे रेट आलेलेच नाही की त्यांच्याकडून पर डे पेनल्टी किती घ्यावी त्यांच्या कडून डिपॉझिट किती घ्यावा? प्रती वार प्रती चौरस भाईंदर वेस्ट, ईस्ट मिरारोड. आज रजिस्ट्रेशन ऑफिसला त्या त्या विभागातून ते ते रेट ठरवलेले आहे. त्यानुसार ते फी घेतात. पण आपण काहीच ठरवलेले नाही. एकाकडून तुम्ही १० लाख रु. घेता तो तर तुमची शाळा वगैरे बनवून देणार. म्हणजे त्याला स्ट्रक्चर चा खर्च आहे. ते परत पुढे व्यवस्थित मेंटेन करायचे आहे. त्या माणसाकडून तुमचे २१ लाख रु. येतात आणि ते फक्त प्ले ग्राउंड देवून त्याचा एफ.एस.आय., टी.डी.आर, वगैरे वापरून त्याच्या बेनिफिट घेवून १० लाख रु.मध्ये पटतोय. हे काही जे आर्थिक नुकसान झाले. ह्याची जबाबदारी कोणाची? ह्याची जबाबदारी कोणी अधिकारी घ्यायला तयार नाही. त्यांच्या भाषणामध्ये कुठे बोलले की आम्ही ह्याला जबाबदार आहे. म्हणून थोडसं जरा चेंज करुन त्यांच्याकडून क्लेरिफिकेशन घेतले. आता सगळं घुमून फिरून सगळा काटा गिरीश प्रधानकडे वळतो. आता तुमचे आयुक्त तर गेले. मा. आयुक्त साहेबांना मी भेटलो. तेव्हा त्यांच्यासमोर मी ही गोष्ट काढली. मा. आयुक्त साहेब माझे काही घेणे देणे नाही. मला विधी अधिकारीने सही करुन दिले. आणि मी रजिस्ट्रेशन करुन टाकले. म्हणजे तुमची ही जी संगीत खुर्ची चाललेली आहे ना. त्यात खो खो चालतो. आणि उठल्यावर दुसरा खो देतो. तो प्रकार हा चाललेला आहे. पण आज आमच्या आर.टी.ए. च्या ह्याच्याने मला दृष्टीपथात आल्यानंतर हा जाणून बुजून मी प्रस्ताव आणलेला आहे. ह्याच्यात दोन ॲग्रीमेंट झालेले आहे. ह्या ठरावानुसार आणि दोन ॲग्रीमेंट बाकी आहेत. उद्या ते लोक येतील आणि त्या ठरावानुसार दोन्ही ॲग्रीमेंट घेवून टाकतील. आणि ही जशी ॲग्रीमेंट आहे. तशी परत आणखीन दोघांची बनतील. म्हणून हा पुर्नविलोकन म्हणा, रद्द करण्याकरिता म्हणा म्हणून मी हा ठराव मुद्दाम येथे आणलेला आहे. आज हे मुद्दे मी

इकडे मांडले. त्याच्या वरती ह्या अगोदर सुद्धा आम्हांला अधिकाऱ्यांनी ठोस सांगितलेले नाही की ही १० लाख रु. रक्कम आम्ही सक्षम अधिकाऱ्याकडून त्यांनी निकाल दिल्याप्रमाणे लावले. साहेब आज आमच्या टॅक्सवरती २ रु. वाढवायचे असले. स्लम ला जर टॅक्स लावायचा आहे. तुमच्या टाउन प्लॅनिंगच्या ठाण्याच्या ऑफिसमधून परवानगी घेतल्याशिवाय आम्ही काही करत नाही. ५० पैसे जरी वाढवायचे असेल तरी आपल्याला त्यांचे रेकमडेशन लागते. तेव्हा आपण वाढवतो. आम्ही इकडे ठराव केला २ रु. चा त्यांनी सांगितले की तुम्हांला ५० पैशांचा अधिकार आहे. किंवा त्यांनी सांगितले ५ रु. करा. तर त्यांनी दिलेल्या निर्णयावर आम्हांला बंधनकारक आहे. आज सांगायचा दृष्टीकोन हे ॲग्रीमेंट पूर्णपणे वाचले आपण व्यवस्थित जर बघितले. तर हे कुठेही टिकणार नाही. त्याकरिता सदर स्थायी समितीचा जो ठराव आहे. तो दि. १५/६/०७ चा आहे. तो सर्वप्रथम आम्हांला तो ठराव रद्द करायचा आहे. कारण तुम्ही उद्या ह्याच्यात परत काही मॉडीफिकेशन केले तर ती संस्था कोर्टात जाणार की तो ठराव तुमचा पक्का आहे. त्या ठरावानुसार आम्ही ॲग्रीमेंट बनवलेले आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो. ) :-**

प्रशासनाकडून सुरुवातीला ह्याचा खुलासा करुन घेतला होता. एकूण ११+१ असे बी.ओ.टी. चे प्रस्ताव...

**मिलन म्हात्रे :-**

गफलत करु नका. ॲग्रीमेंटचे फक्त ह्या ठरावामध्ये चार ॲग्रीमेंट दाखवलेले आहे. म्हणजे एखादे काहीतरी चांगले झाले म्हणून चार चोऱ्या लपल्या गेल्या ते आम्हांला करायचे नाही. एक स्पष्ट सांगतो.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो. ) :-**

मला सुद्धा तेच स्पष्ट करायचे आहे.

**मिलन म्हात्रे :-**

चार ॲग्रीमेंट जे झाले त्याच्याबद्दल मी फक्त बोलतो.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो. ) :-**

फेर प्रस्तावाचा हा विषय प्रशासनाकडून एकूण १२ प्रस्तावावर निर्णय झालेला आहे. त्याचे फक्त मधल्या चार प्रस्तावावर ॲग्रीमेंट आहे.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब १२ प्रस्ताव ह्या ठरावात नाही. आणि ह्या ॲग्रीमेंट मध्ये तर मा. महासभेचा ठराव नाही. ह्या ॲग्रीमेंटमध्ये स्थायी समितीचा ठराव नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो. ) :-**

फक्त ह्या प्रस्तावाबद्दलचा हा विषय आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मी ठरावच बोलतो. माझ्या ॲग्रीमेंटमध्ये काय आहे की, दि. १५/६/०७ रोजी जो ठराव पास झाला. मी फक्त स्थायी समितीच्या ठरावाबद्दल बोलतो. मी मा. महासभेचे सुद्धा बोलत नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो. ) :-**

त्याचे तीनच प्रस्ताव आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मी कशाला तीन आणि चार प्रस्ताव बोलू. कारण आम्हांला ठराव रद्द करायचा आहे ना. तुम्हांला त्याचे कारण सांगतो कारण, त्या ठरावामध्ये जे काही रिफ्लेक्ट होते. ते सुद्धा चुकीचे होते. तुमच्या आर.टी.ए. मध्ये जर पत्र दिले तर अधिकारी लगेच पत्र देत नाही. भलतच काहीतरी लिहून देतात. माझ्या हातात जे पेपर आले. त्यानुसार मी बोलतो. जे ठराव झाले त्याच्याबद्दल बोलतो. फक्त ठराव क्र. १५/६/०७ बद्दल माझे बोलणे चालू आहे. आणि माझे ऑब्जेक्शन पण आहे. माझे जे पूर्वीचे उत्तर आहे. ज्याचे तुम्हांला सुद्धा पत्र मिळालेले आहे. त्याच्यात सुद्धा तेच आहे. म्हणजे जसे अधिकाऱ्यांनी मगाशी भाषणात सांगितले की, ११ बी.ओ.टी. वर दिले. आम्हांला शहराचा विकास हवे. तो चांगला पाहिजे. कारण आम्ही ३० वर्षाकरिता कायम देणार आहोत. मी तुम्हांला आज उदा. दिली. आज तुम्ही शिवार गार्डन जे म्हणता ना. तिकडची परिस्थिती अशी आहे की....

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो. ) :-**

साहेब तुम्ही तुमचे मत मांडा ना.

**मिलन म्हात्रे :-**

तिकडे लॅण्ड ॲक्विशन ची कार्यवाही चालू आहे. मातीचा भराव चालू आहे. मा. आयुक्त साहेबांकडे मला गटनेता म्हणून मिटींगला बोलवले होते. त्याचवेळेला मी त्यांना सांगितले होते. त्या मिटींगला घेवारे साहेब होते, बारकुंड साहेब होते. सर्व अधिकारी बसलेले होते आणि सिटी इंजिनियर पण होते. त्यांना सांगितले की सगळी जागा ताब्यात घेतल्याशिवाय काम सुरु करु नका. तरी त्यांनी काम सुरु केले. आज काय झाले मध्ये चार प्लॉट आहे, चार खाचर तिकडे आहे त्याचे लिटीगेशन कोर्टात पडले. पाच तिकडे आहे, दोन तिकडे आहे. आणि तुमचे काम चालू आहे. आज तुम्ही जे त्यांना ले आउट नुसार त्याच्यात काम दिली. ते किती वर्षात पूर्ण होणार? तुमची जी केस लिटीगेशनची जी चालू आहे ना. ती अजून वाईंड अप झालेली नाही. म्हणजे ते सगळं पेंडिंग असताना तुम्ही ते दिले. पण काय होते

विकासाचा बाबतीत आम्ही जर काही बोललो तर लगेच बोलतात की हे विकासाच्या आडवे आले. पण आज ते सुद्धा काय करुन तुम्हांला विकास करता येणार नाही. कारण, एखादी बिल्डिंग ले आऊट मध्ये आहे. ती अर्धी एका प्लॉटमध्ये आहे आणि अर्धी एका प्लॉटमध्ये आहे आणि ज्या प्लॉटमध्ये जर लिटीगेशन असेल तर तुमची अर्धी बिल्डिंगच होणार. उद्या टेनिस स्लोप बांधला तर तो अर्धा माझ्या जागेत आहेत आणि अर्धा त्यांच्या जागेत आहे. मी कोर्टात गेलेलो आहे. तुम्ही ते स्ट्रक्चर अर्धवट ठेवणार का? तर नाही. हे त्या तिकडे झाले. आणि आम्हांला परत परत तिकडे चटके लागले. परत चटके लागू नये म्हणून मी हा विषय आणलेला आहे. तो जो आपला ठराव आहे. दि. १५/६/०७ मध्ये संपूर्ण जी काही कार्यपद्धती आहे त्यांनी दिलेले सर्व आहे. अधिकाऱ्यांनी वापरलेल्या पॉवर्स आपले आर्किटेक फक्त पॅनल वरचे आर्किटेक आहेत. त्यांनी ॲग्रीमेंट करायचे नाही. त्यांनी फक्त आपले नकाशे तयार करायचे आहे. नाहीतर त्यांचेही ॲग्रीमेंट आम्हांला मागवावे लागेल. हे आर्किटेक ॲग्रीमेंट कधीपासून बनवायला लागले. आर्किटेक ॲग्रीमेंट बनवतो हे मला आजपर्यंत माहित नव्हते. कारण माझ्यामागे मी वकिलांकडून लिगल ॲग्रीमेंट बनवून घेतले आणि माझ्या इमारती बांधल्या त्या प्लॅन मी आर्किटेक कडून बनवून घेतले.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे साहेब तुम्हांला काही सुचना करायची असेल तर सुचना करा.

**मिलन म्हात्रे :-**

मी ठराव वाचायला घेतो.

**मा. सभापती :-**

वाचा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सन्मा. उपायुक्त खतगांवकर साहेब ते ठराव मांडतात. मी मगाशी जे प्रश्न विचारले होते.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो. ) :-**

तुमचे जे चार मुद्दे होते. सन्मा. सदस्यांनी जे काही मुद्दे मांडलेले आहे की ती मालकी कोणाची असावी? कोणाची राहते ३० वर्षानंतर राईटस काय राहणार? हे काही पाच सहा मुद्दे ह्याच्यामध्ये आलेले आहे. तुम्ही त्याच्याबद्दल प्रस्ताव मांडा याच्यामध्ये काही दुमत नाही. पण, प्रशासनाकडून सुरुवातीला काही मुद्दयांचा खुलासा झाला नसेल आणि तुम्ही जे मुद्दे मांडलेले आहे. त्याच्यावर ज्या बाबी आहेत. ते काही दोन गोष्टी आम्ही क्लिअर करु ना.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ह्या ॲग्रीमेंट मध्ये आणखीन एक सुचना ॲड करा. ॲग्रीमेंटमध्ये ३० नंबरचा कॉलम आणि ३१ नंबरचा कॉलम आहे. त्याच्यावर जरा खुलासा करा. त्यामध्ये कंम्प्लीटेशन झाल्यानंतर त्यांनी आपल्या खात्याकडून सर्टिफिकेट घ्यायचे आणि त्याला नंतर पब्लिकसाठी वापरायची त्याबद्दलचा...

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो. ) :-**

त्यांनी आपल्याकडून परवानगी घेवून ते वापरत आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

त्यांनी लोकांकडून काय वसूल करावे.

**दिलीप घेवारे :-**

आतापर्यंत आपण दोन आरक्षणावर चर्चा केली. त्याच्यामध्ये आपण टेंडर फॉर्म पहिले तयार केले होते. आणि टेंडर फॉर्म तयार केल्यानंतर त्याच्याकडून किती बँक गॅरेंटी पाहिजे. मिनिमम किती भाडे आले पाहिजे. ते रेडी रेकनर चा रेट आपण गृहित धरुन त्याच्यानुसार आपण ते भाडे निश्चित केले होते की हा मिनिमम रेट यायला पाहिजे. आणि त्यानुसार टेंडर फॉर्म पेपर ॲड दिल्यानंतर ते टेंडर फॉर्मची कोरी कॉपी घेवून गेले. त्यामध्ये सगळ्या कंडिशन्स होत्या की त्यांनी काय काय करायला पाहिजे. तरी आपले १०० रु. प्रतिदिन दंड आहे किंवा ५००रु. प्रति दिन दंड आहे. तो आपण त्याच्यामध्ये नमुद केला होता. ज्यानंतर ही जागा असेल...

**मिलन म्हात्रे :-**

आमचे ऑब्जेक्शन असे आहे की तुम्ही हे जे रेडी रेकनर बोलता ना. त्याच्यात इथे काही उल्लेख नाही ना. ह्या तारखेचा रेडी रेकनर असा असा आहे. आणि त्याचा रेट मुल्यांकन केलेले आहे. मुद्दा तोच आहे. तुम्ही पडद्यामध्ये काय केले. ऑन द रेकॉर्ड, ऑफ द रेकॉर्ड काय केले. ते आम्ही बोलत नाही. फक्त एवढाच आहे. जर आपण रेडी रेकनर बघितला. तर त्याच्यात उल्लेख पाहिजे की ह्या तारखेचा रेडी रेकनर आम्ही बघितला त्याचा रेट असा असा आहे. त्यानुसार हे ठरले.

**दिलीप घेवारे :-**

ज्या आरक्षणाकरिता आपण मिनिमम दोन लाख रु. तीन लाख रु. असे दर निश्चित केले होते की इतके यायला पाहिजे. आता ह्याच्यानंतर आपण ओपन टेंडरींग केले. ओपन टेंडरींगमध्ये जे हायस्ट टेंडर निघाले. ज्या ज्या साठी आणि हे साईड ९६ नंबर जे आहे. त्याच्यासाठी १० लाख रु. हायस्ट बिल होते. साईट नं. मध्ये १९१ आहे. ती स्कूल आहे. त्याचे हायस्ट बिडींग २१ लाख रु. चे होते. त्यानुसार हायेस्ट जे आहे. ते स्टॅण्डींग कमिटी च्या मंजूरीने आपण त्यांना दिलेला आहे. पण किती किती बिडींगचे कोणा-कोणाचे रेट आले त्या ठरावामध्ये दिलेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही आता हायेस्ट बिडींग चे बोलता ना. मग तुम्ही दिले कोणाला ते बघा? पहिलेच आहे. मेमर्स सालासर बिल्डर अॅण्ड डेव्हलपर त्यांनी काय केले की, त्यांनी रेट सादरच केलेले नाही. पण त्याला बिडींगमध्ये दाखवलेले आहे.

**दिलीप घेवारे :-**

टेंडर ओपन केल्यानंतर आपण दाखवलेले आहे. ब्लँक रेट होता.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही ते काउंट च केले पाहिजे नव्हते. तीनच दाखवले पाहिजे. लांबड कशाला लावायची. साहेब मी जर काही कागदपत्रे टेंडर फॉर्म नुसार भरलेले नाही. तर तुम्ही ते सगळे रेकॉर्डला दाखवणार. काय गरज आहे? तुमच्या नियमाच्या अटीशर्ती काय बोलतात. तुमची बँक गॅरेंटी वगैरे जे काही असेल अनामत रक्कम भरल्यानंतर टेंडर फॉर्म देतात. त्यानंतर जी काही कागदपत्रे लागणार आहे. ती असतील तरच तुम्ही विचारात घेणार ना. म्हणजे तो टेंडरला पार्टीसिपेंट करु शकतो ना. ह्याच्यात तर क्लिअर दिलेले आहे की सदर कागदपत्रे सादर केलेले नाही. दर सादर केलेले नाही. म्हणजे त्याला फुकट द्यायचे. मग तुम्ही त्याला तुमच्या ह्याच्यात इनवॉल कशाला करता? तो फुकट रेसमध्ये आला ना. हे बघा ह्या इकडे टेंडर पहिले दिले गेले. ऑक्ट्राय साठी असेच घोलानी नावाचा माणूस मुद्दामून मा. आयुक्त साहेबांच्या आर्शिवादाने उतरवला गेला आणि ते टेंडर चार पाच करोड रु. कमीमध्ये फुकले गेले. पहिल्या वर्षीचे तेव्हा मी त्याच्यामध्ये हायकोर्टामध्ये गेलो. काय वाटेल ते करतील. त्याच्यातसुद्धा घोलानी नावाची कुठली तरी पार्टी होती. त्यांनी काही दिले नव्हते. दोन करोड रु. तुमचे बँक गॅरेंटी द्यायची होती. त्यांनी काहीही दिले नाही. आणि तुम्ही सरळ तुमच्या कॉटॅस्टीव्ह म्हणून लिस्ट मध्ये टाकले. वगळण वगैरे काय? आता तुमच्याकडे १० आले ना. तुमचे सक्षम तेवढं काढून बाकीचे सगळे साईडला काढणार. उद्या बोलालं १०० दिले. १०० ची पूर्ण लिस्ट लागेल.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ह्याच्यामध्ये आणखीन एक गोष्ट आहे.

**दिलीप घेवारे :-**

एका वर्षाचे भाडे एकानेच भरलेले आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो. ) :-**

आधी जागेवरचा निकाल झालेला आहे.

**दिलीप घेवारे :-**

हो झालेला आहे. प्ले ग्राउंड डेव्हलप झालेला आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो. ) :-**

त्यांना त्या जागेचा टी.डी.आर. दिलेला आहे.

**दिलीप घेवारे :-**

जागेचे असे आहे की, जागेचा टी.डी.आर. पहिल्यांदाच देवून त्या जागा आपण ताब्यात घेतल्या होत्या. महापालिकेचे ७/१२ उतारावर नाव लावल्यानंतर आपण डेव्हलप कोणाकडून करायचे. आपण करायचे की त्यांना द्यायचे. हा मुद्दा झाल्यानंतर त्यांना दिलेले आहे. आणि त्यावेळेला आपण त्यांना परमिशन दिली. त्यावेळेला सगळे सर्च रिपोर्ट वगैरे करुन तपासून ते प्लॉट मंजूर करुन दिलेले आहे त्याच्या प्लॅनमध्ये ते प्ले ग्राउंड दाखवलेले आहे. ते ६ हजार चौ.मी. जागेवर बरोबर आहे आणि तो प्लॅन त्याच्यात आपण जोडलेला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, तुम्ही मला हे सांगा की, माझे पत्र तुमच्याकडे कधी आले? तुमच्या डिपार्टमेंट कडून मला अर्ध्या ओळीचे उत्तर देखील नाही. तुम्हांला पत्र किती तारखेला दिले ते बघा ना. दि. १४/१/०८ ला पत्र दिलेले आहे.

**दिलीप घेवारे :-**

माहिती अधिकारात दिलेले की पत्र दिले.

**मिलन म्हात्रे :-**

पत्र दिले. दि. १४/१/०८ ला पत्र दिलेले आहे. सगळ्यांना पत्र दिलेले आहे. पण कुठल्याही डिपार्टमेंट चे उत्तर अजूनपर्यंत त्याच्यावर आलेले नाही. कुठल्याही डिपार्टमेंटला महत्त्वाचे वाटलेले नाही. आत्ता तुम्ही एवढे बोलता ना. ऑफ दी रेकॉर्ड काहीच नाही. हे त्या अॅग्रीमेंटमध्ये पण रेकॉर्डवर घेतलेले नाही आणि आताचे पण रेकॉर्ड वर घेतलेले नाही. तुम्ही फाईल आणून ठेवायला पाहिजे होती. हा आमचा रेडी रेकनर हे आमचे कमिटीचे रिपोर्ट आजच्या स्टॅण्डींगला विषय फक्त एकच आहे. २५ विषय नाही. तुम्हांला माहित आहे की, ह्याच्यामध्ये आपल्याला काहीतरी द्यायचे आहे. काहीतरी द्यावे लागणार कागदपत्रे पुट-अप करायला लागणार. माझ्याकडे आहे ना मी तुम्हांला देतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ह्याच्यामध्ये १० लाख रु. ह्यांनी दाखवलेले आहे. सिमरनचे तीन ८५ लाख रु.चे ओपन टेंडर दाखवलेले आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो. ) :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे साहेब तुम्ही बी.ओ.टी. मध्ये बेसिक प्रिन्सिपल आहे त्याच्यावर बोलला. खूप चांगले बोलला ते खाजगी करणाच्या माध्यमातून आपण जे विकास कामे हाती घेतो. त्याचा उद्देश असा असतो. खाजगी करणाच्या कामातला ज्या इन्फ्रास्ट्रक्चर तयार होतो. त्याची मालकी ही त्या संस्थेची असते. महापालिकेची असते किंवा

शासनाचा प्रोजेक्ट असेल तर शासनाची मालकी असते. त्याची मालकी बदलायला नाही पाहिजे. आणि मालकी ही बदलली जातच नाही. ॲग्रीमेंट नुसार सुद्धा त्याला खाजगी करणातून विकास करण्यासाठी आपण त्याला ऑथोराईज मागवतो. आपले होणारे इन्फ्रास्ट्रक्चर त्याच्या नावाने करत नाही. त्याचे मुख्य कारण असे आहे की, त्याला जे इंन्वेस्ट करण्यासाठी महापालिकेचा पैसा लागतो. ते पहिले त्यांनी ते काढायला पाहिजे होते. की अमुक शाळा आणि मैदान करण्यासाठी इतका खर्च होतो. मग ते पैसे आपण तिथे टाकून आणि ती फॅसिलिटी दिलेली असते. पण त्यापेक्षा ती फॅसिलीटी आपल्याला लोकांना द्यायची आहे. त्यांनी महानगरपालिकेचा पैसा टाकायला नाही पाहिजे. ती फॅसिलीटी दुसऱ्याच्या माध्यमातून करायची आहे. पण त्याच्यासाठी महानगरपालिकेचा पैसे सेविंग करुन इतरांचे पैसे वापरुन एक तालेबंद तयार करुन त्या जागेचे रेडी रेकनर नुसार व्हॅल्यू त्याचा इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलप करण्याची व्हॅल्यू म्हणजे त्या प्रोजेक्टची एकूण कॉस्ट झाली. समजा, ती एकूण कॉस्ट टाकून जी वस्तू तयार होते. त्याचे मासिक भाडे काय आले असते. हे ताळेबंद हा निविदा काढण्याच्या पूर्वी मला वाटते त्या विभागाने लिखित केला असेल. ती थोडया वेळासाठी ह्याठिकाणी ही शाळा आणि हे ग्राउंड डेव्हलप करायचे आहे. तर त्यासाठी रेडी रेकनर नुसार त्या जागेची व्हॅल्यू व्हायला पाहिजे. ती वास्तु डेव्हलप करण्यासाठी लागणाऱ्या खर्चाची किंमत ही झाली एकूण किंमत कोणताही विकासक काय करतो. माझे किती पैसे इन्वेस्ट होतात आणि ३० वर्षाच्या काळामध्ये महापालिकेला मला किती द्यावे लागतात आणि त्याच्यातून मला किती मोबदला मिळतो. कारण मोबदला मिळाला नाही. तर कोणता विकासक तिथे पैसे टाकेल. कोणत्याही प्रकरणामध्ये विकासकाला दोन पैसे नाही मिळाले. तर त्या कशाला इन्वेस्ट करेल. तर तशा पद्धतीने त्या प्रोजेक्ट चे कॉस्ट काढायला पाहिजे. हे रेडी रेकनर नुसार जागेची व्हॅल्यू आणि दुसरा म्हणजे विकासाची सुची जे असतो त्याला आपण बांधकामाचे डी.एस.आर. म्हणतो. त्याच्यानुसार त्याच्यावर होणाऱ्या कामची इस्टीमेंट अशाप्रमाणे त्या प्रोजेक्ट चे दिलेले आहे. समजा, तो प्रोजेक्ट डेव्हलप करायला दोन कोटी रु. लागतात. मग दोन कोटी रु. एखादा विकासक इन्वेस्ट करतो. ३० वर्षासाठी तर त्याची मालकी राहणार नाही. त्याचा दोन कोटी रु. चा इंटरेस्ट त्या सर्व बाजू जात असताना त्याला त्याच्यातून मिळणारे बेनिफिट ह्याच्या आधारे ही निविदा केली जाते. आता हे करत असताना प्रशासनाने ह्या बाबी विचारात घेवून प्रती वार्षिक एखाद्या प्रोजेक्ट ला किती लाख रु. भाडे अपेक्षित झालेले आहे.

**दिलीप घेवारे :-**

दोन लाख रु. भाडे आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़ो. ) :-**

फक्त दोन लाख रु. ते भाडे ते भाडे आलेले आहे. आणि त्यांनी ते इन्वेस्ट करावे असे अपेक्षित आहे. तर, ह्याच्याप्रमाणे त्या प्रस्तावाच्या अपेक्षित आपल्याला म्हणायचे होते की, जास्तीची किंमत यायला पाहिजे होती. असे आपले म्हणणे आहे ना.

**मिलन म्हात्रे :-**

इथे प्रकार फार भयंकर आहे. हे रिझर्व्हेशन ९५-९७-९६......

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सा़ो. ) :-**

ही आपल्या मालकीची झाली.

**मिलन म्हात्रे :-**

ते रिझर्व्हेशन तुमच्या मालकीची झाली. पण ते रिझर्व्हेशन बदलली गेली. त्याच्यावर आर झोन केले. तुमचे १० एकर रिझर्व्हेशन होते असे समजा. त्याच्यातली अडीच एकर रिझर्व्हेशन राहिले. बाकीचे ७५ आपण आर. झोनमध्ये फुकवून टाकले. मंत्रालयाच्या आर्शिवादाने. आज आमच्या इकडच्या लहान मुलांना जे पूर्वी १० एकर रिझर्व्हेशन मिळायचे होते. ते आता फक्त अडीच एकर रिझर्व्हेशन मिळते. हा आमचा लॉस आहे. उगाच विकासाच्या गप्पा कोणी करु नये. ही धडघडीत आहे. समोर सिट आहे. हा एवढा सगळा. प्लॉट फुकवून टाकला आणि आता तुमचे एवढे राहिलेले आहे. मी काल मोजून आलो. ७५ मी. X ७५ मी. चा तिकडे स्क्वेअर आहे. तुम्हाला हे मी सांगतो. तुमच्या ह्याच्यात दिलेले नाही. मी तुम्हाला सांगतो. आज आम्ही एवढी जागा त्या माणसाला फुकून टाकली. आणि एवढासा तुकडा ठेवला. तो चाराने पण होत नाही. हा सगळ्यात मोठा लॉस होतो. हे कोणी का बोलत नाही? त्याठिकाणी तुमची जागा ही गीव्ह ॲन्ड टेक पॉलिसी असली पाहिजे. त्या त्या वेळेचे कोण तात्कालीन कमिशनर असतील किंवा मंत्रालयातले बसलेले कोण असतील. आज हे करत असताना कुठेतरी नोटीस काढायची. त्या पब्लीक नोटीस खाली कुठेतरी चिकटवायची. कुठल्यातरी भंपक पेपरला जाहिरात देवून टाकायची की, जेणेकरुन उल्हासनगर, कल्याण-डोंबिवली वगैरे ठिकाणातून निघत असेल. पब्लीश झाले. सभागृहाला सदस्यांना ह्याची नोटीस येतात. माझी लॉजलिटी आहे. पण नोटीस आल्यानंतर तुमच्यावरती मी हरकत घेतली पाहिजे होती. माझ्या वॉर्डमधला एखादे प्ले ग्राउंड कमी होत असेल, त्या तिकडच्या मतदारांना प्रॉब्लम होत असेल, मुलांना खेळायला जागा राहत नसेल तर, मी त्याचे ऑब्जेक्शन घेतले पाहिजे. आधी नागरीक या नात्याने नंतर नगरसेवक ह्या नात्याने. पण, सभागृहामधल्या कुठल्या तरी सदस्याला तुम्ही इन्टीमेशन देता का? हे आरक्षण आम्ही चेंज करतो. आणि तिकडे देतो. सभागृहामध्ये डायरेक्ट आणले होते. तेव्हा आम्ही विरोध केलेला आहे. आज ह्याची परिस्थिती काय आहे? वास्तव कोणी समजत नाही. हे आरक्षण एवढे होते आणि आमच्या मुलांना एवढेच मिळणार आहे. एवढ्याचा विकास करणार आणि एवढ फुकले. १००

टक्के फुकले आणि २५ टक्के विकास करणार. अधिकारी कोणी हे बोलत नाही. तुम्ही हा डेव्हलपमेन्ट प्लान बनवू नका. त्यावेळेच्या १०-२० वर्षा अगोदरचा जो काही भविष्यातला विचार करुन तुम्ही डेव्हलपमेनट प्लान बनवला. तर माझ्याकडे तीन प्लान आहेत. शहरामध्ये आजच्या तारखेला १९९७ साली त्यांनी जी तारीख सांगितली ती प्लान मंजुर झाला त्याची दिनांक सांगितली. त्यावेळेला तर १०० टक्के आरक्षण होते. १०० टक्के म्हणजे १०० एकर तर आजच्या तारखेला १० एकर राहिलेले आहे. हे अक्षरशः दाखवणारे प्लान कॉम्प्युटरवरती प्रॉग्राम वगैरे बसवून ते मी करुन घेतले. तुम्हाला वाटल्यास उद्या दाखवीन. ह्या शहराची परिस्थिती एवढी गंभीर आहे की, जे मंत्रालयामध्ये अधिकारी बसले. तरी कोकण भवनला या शहराचे काही पडलेले नाही. आणि आपल्या इकडचे पण. आज आरक्षण ज्यावेळेला कमी होते. आज हे आरक्षण एवढ्या आर. झोनच्या पाठीमागे दोन-तीन आरक्षण ठेवले आणि बरीचशी तुमच्या आरक्षणामध्ये बिल्डींग उभी आहेत. रस्त्यामध्ये बिल्डींग उभ्या आहेत.

**मा. सभापती :-**

ह्याच्यावर कोणाला चर्चा करायची आहे का?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आरक्षणामध्ये लोक बिल्डींग बांधतात. आणि ती आरक्षण अतिक्रमण होवून कोणी बिल्डींग बांधु नये म्हणून ती आरक्षण ताब्यात घेतली आणि एक चांगला पायंडा पाडला आणि आपला एक पैसा खर्च न होता बी.ओ.टी. बेसेसवरती की, ॲग्रीमेन्टमध्ये काही त्रुटी राहिल्या असतील. डिप प्रोसेस लॉ मध्ये काही मिस्टेक राहिल्या असतील. तर ती सुधाराव्या आणि आपण थोडंस ॲग्रीमेन्ट चेंज करुन घेवू या. जर त्याच्यामध्ये शासनाचे जी.आर. असतील तर आपण जी.आर. ह्याच्यामध्ये घेवून ॲक्टीव्हेशन कसे काय केले पाहीजे तो विचार केला पाहिजे. जर आपण ठरावच कॅन्सल केला आणि तो जर कोर्टामध्ये गेला. परत आपला हा वेळ वाया जाईल आणि परत मग लिटीकेशन होईल. पुन्हा आपल्याला जे भाडे होते ते भाडे पण येणार नाही. मग परत अतिक्रमण होईल. मग, ह्या सगळ्या बाबींचा तुम्ही सदस्यांनी विचार केला तर बरं होईल.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सन्मा. नगरसेवकांची कल्पना चांगली होती. आम्हीपण हे ऐकूनच ठराव दिला होता. पण, त्याच्यामागे जे केले गेले होते ते खोटं केले गेले होते. जे. झालेले आहे .......

**मिलन म्हात्रे :-**

त्यांनी चोऱ्यामाऱ्या केल्या. त्या प्ले ग्राउंडच्या बाजुला त्यांनी कंपाउंड टाकले. प्रायव्हेट लिमिटेड करुन टाकले. उलट त्यांनी अतिक्रमण केले. मी परत परत बोलतो. ७४ मी. x ७४ मी. चा प्लॉट आहे. तुमच्याकडे ६ हजार मी. असले पाहिजे. त्याला कोर्टात जायचे असेल तर जावू द्या. आम्ही तिकडे येवून इंटरफिकेशन करु. घाबरायचे काही कारण नाही. ७५ मी. x ७५ मी. चे कोणी अधिकारी पण बोलत नाही की आम्ही जावून मोजले.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

ह्यामध्ये काही प्रोसेडिंग वगैरे झाली आहे त्याची कॉपी त्यांना द्या.

**मिलन म्हात्रे :-**

अधिकाऱ्यांनी तिकडे क्लेरीफिकेशन केले का? की म्हात्रे साहेब तुम्ही खोटे बोलता. तिकडे ६ हजार मीटरच आहे. हे कोण करते? काल आम्ही जावून मेजरमेन्ट केले. ७४ मी. x ७४ मी. किंवा त्यांचे तुम्ही दिले का? तुम्ही त्याचे ॲफीडेव्हीट घेतले का? साहेब, ज्यावेळेला तुम्ही कुठलीही जागा ताब्यात घेता. त्यावेळेला तुम्ही घेतली का? की त्याचे ५००/- रु. च्या किंवा १०००/- रु. च्या स्टॅम्प पेपरवर की, हे ६ हजार मी. मी मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या ह्या करारनाम्यानुसार देतो.

**दिलीप घेवारे :-**

त्याचा आपण एवढेच मंजुर केलेला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

आमची तर इच्छा आहे की, तो कोर्टात जावे. सुभाषचंद्र बोस मैदान तुम्ही लावले ना. केले ना. साहेब तुमचे अब्जो करोडो रु. गेले नाही. आज तिथे गरीबांची लोक जावून फुकट खेळतात. आज बी.ओ.टी. मध्ये तुम्हाला १०-२० रु. फी शिवाय एन्ट्री नाही. आम्ही तर सरळ सरळ बी.ओ.टी. च्या विरोधात आहोत. बी.ओ.टी. ची काही गरज नाही. बी.ओ.टी. कशासाठी पाहिजे. पूर्वी आम्ही १ रु. मध्ये पिक्चर बघत होतो. आणि आज ह्या मॉलमुळे आणि घ्या सगळ्या संस्कृतीमध्ये इथली टॉकीज बंद झाली आणि १०००/- रु. खर्च करायला लागतात.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मैदानासाठी विरोध आहे.

**मिलन म्हात्रे :-**

कुठल्याही बाबतीत. तुम्हाला मी सांगतो ना. तुम्हाला मी बोललो ना की, सुलभ शौचालय, बी.ओ.टी. वर दिले. आज आपण दिवे लावले. सगळे रस्त्यावर आलो. त्याची तुम्हाला चिंता पडली नाही. त्या सगळ्या संस्था लाखो रुपयाच्या कर्जामध्ये आहे. तुम्ही बी.ओ.टी. च्या कसल्या गोष्टी करता. त्यावेळेला पण अधिकाऱ्यांनी सभागृहामध्ये चांगली भाषणे केली होती.

**दिलीप घेवारे :-**

साहेब, मोजणी केलेली आहे. ६ हजार चौ.मी. बरोबर आहे.

**मिलन म्हात्रे :-**

तुमचा नकाशा कुठे आहे?

**दिलीप घेवारे :-**

त्याचे लेआउट मंजुर झालेले आहे. ले आउट मध्ये प्ले गार्डन झाले.

**मिलन म्हात्रे :-**

असे भरपुर ले आउट आहे की, तुमच्या बिल्डींगचा प्लान एक आहे. आणि प्रत्यक्ष बांधकाम तिसरेच आहे. माझ्या वॉर्डमध्ये आहे.

**दिलीप घेवारे :-**

साहेब, मी खात्रीने सांगतो की, ह्याच्यामध्ये ६ हजार चौ.मी. जागा आहे.

**मिलन म्हात्रे :-**

आपण जावून तिथे मोजणी करु या ना. आपण मोजणी करु या. आम्ही टेप लावला. तुम्ही येथे बोलता. मी कुठे नाही बोलत.

**एस. ए. खान :-**

त्यांनी चुकीची मोजणी केली.

**मिलन म्हात्रे :-**

त्यांनी बाजूला मोकळी जागा सोडली. त्याच्यापुढे मोठे मोठे रस्ते बांधले. त्यांनी तुम्हाला जागा दिली. ६ हजार चौ.मी. बरोबर आहे. मी कुठे नाही बोलतो. त्याच्यानंतर त्यांनी तीन ठिकाणी जसे शॉपींगला, मॉलला रस्ते .......

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

त्यांचे असे म्हणणे आहे की, जागेतून त्यांनी रस्ते केले.

**मिलन म्हात्रे :-**

त्याच्यावर महापालिकेच्या त्या टॉकीजच्या रस्त्याने प्ले ग्राउंड जातात.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

साहेब, तुम्ही मांडलेला मुद्दा आलेला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

दोन्ही कडे, तिन्ही कडे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

दोन तास चर्चा झाली.

**शानु गोहिल :-**

साहब, बच्चे के खेलने के लिए प्ले ग्राउंड दे रहे है क्या?

**दिलीप घेवारे :-**

उसको आप सुचना करेंगे तो दे देंगे।

**मिलन म्हात्रे :-**

उन्होने अभीतक प्लान ही नही डाला है। उनका अभीतक आर्कीटेक प्रोजेक्ट ही नही आया है। तिकडे कोणीही जात नाही. तिकडे सिक्युरिटी आहेत. त्यांनी मलासुध्दा चेक केलेले. आतमध्ये सिक्युरिटी चेकींग केल्याशिवाय कोणाला सोडत नाही आणि ह्याचे तिकीट पण बघतात.

**एस. ए. खान :-**

साहेब, हॅन्डीकॅपच्या शाळेसाठी काहीतरी करायचे आहे. कारण मिरा भाईंदर शहरामध्ये एकसुध्दा हॅन्डीकॅप लोकांसाठी शाळा नाही. मिरारोडमध्ये एक जागा आहे. के.सी. मेहता जवळ ९६ दिलेले आहे. त्याच्यामध्ये हॅन्डीकॅप लोकांसाठी शाळा करण्यासाठी सांगा. नागरीकांना त्याचा फायदा होईल.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

म्हणजे ही शाळा आहे ती हॅन्डीकॅप लोकांसाठी असावी असा तुमचा सुजाव आहे.

**एस. ए. खान :-**

त्याचे ॲकोमेन्डेशन रिझर्वेशन किती आहे?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

सन्मा. सदस्य ध्रुवकिशोर पाटील साहेबांनी काही मॉडीफिकेशन सांगितले. त्याच्यापैकी हा एक मुद्दा आहे की, ती शाळा आहे ती एक वेगळी शाळा असावी. सन्मा. सदस्य खान साहेबांचे असे म्हणणे आहे की, ती हॅन्डीकॅप साठी ती शाळा असावी. त्याच्यात शाळेचा भाग असावा.

(सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे यांनी प्रकरण क्र. ४० च्या ठरावाचे वाचन केले.)

तद्कालीन स्थायी समिती प्रकरण क्र. ६७ ठराव क्र. ६०अ द्वारे दि. १५/०६/२००७ रोजी निविदा मंजुरीच्या ठरावास मंजुरी देण्यात आली आहे.

१) या ठरावात मंजुर करण्यात आलेल्या निविदा या बेकायदेशीर असून तसेच त्यात **महानगरपालिकेच्या हितास तिलांजली देण्यात आलेली आहे.** सबब सदरहू ठराव क्र. ६०अ, दि. १५/०६/२००७ हा या कारणास्तव रद्द बातल करावा.
२) ह्या संपूर्ण प्रक्रीयेमध्ये ज्या **अधिकारी, पदाधिकारी व संबंधितांनी भाग घेउन या बेकायदेशीर कृत्यास खतपाणी घातलेले आहे.** व महानगरपालिकेचे हित जपलेले नाही. त्यांची **खातेनिहाय चौकशी करुन त्यानंतर त्यांच्यावर योग्य ती कायदेशीर कारवाई करावी.**
३) वरील ठरावाच्या अनुषंगाने महापालिके बरोबर केलेले लिज करार **दि. १८/०७/२००७ म्हणजेच महानगरपालिका व दिपक चॅरीटेबल ट्रस्ट तसेच दि. ३१/०७/२००७ महानगरपालिका व मे. श्रीजी एक्झिबिटर्स हे दोन्ही करारनामे रद्दबातल करावे.** कारण दि. १८/०७/२००७ रोजी महानगरपालिके बरोबर मे. दिपक चारीटेबल ट्रस्ट या संस्थेने करार केला असून दस्त हजर केल्याचा दि. २४/०७/२००७ असा आहे. सदर करार नोंदणीकृत केलेला आहे. परंतु, **सदर करार नोंदणीकृत होण्याअगोदर म्हणजेच दि. २७/०६/२००७ रोजीच्या या संस्थेच्या पत्रामध्ये नमुद केल्याप्रमाणे सदर संस्थेस महानगरपालिकेने दि. २०/०६/२००७ रोजी म्हणजेच एक महिन्या अगोदर या संस्थेला कार्यादेश बहाल केलेला आहे.** सदर संस्थेचा पूर्वानुभव तसेच संस्थेची कार्यपध्दती नियमावली तसेच सदर संस्था वरील काम करण्यास पात्र आहे. किंवा कसे इत्यादी बाबी दर्शविणारे कोणतेही कागदपत्र या करारनाम्यामध्ये अंर्तभूत करण्यात आलेली नाहीत. सर्वात महत्वाची बाब म्हणजे त्या संस्थेचे **फक्त तीन ट्रस्टी** असून तिघांनी एकास सदर करार पूर्ण करण्यास अनुमती दिलेली आहे. या करारनाम्यातील परिच्छेद क्रमांक २३ नुसार **कोणत्याही इतर कार्यक्रमासाठी आयुक्तांची पूर्व परवानगी घेउन आरक्षित जागेचा वापर आरक्षित कारणा व्यतिरिक्त करण्याची तरतुद केलेली आहे. परंतु, तशा प्रकारचे कायदेशीर अधिकार आयुक्तांना नाहीत.** परिच्छेद क्रमांक ४३ हा संदिग्ध आहे. परिच्छेद क्रमांक ४० हा भारतीय राज्य घटनेच्या विरुध्द आहे.

**करारनामा दि. ३१/०७/२००७** रोजी नोंदणीकृत करण्यात आलेला दुसरा करारनामा हा **महानगरपालिका व मे. श्रीजी एक्झिबिटर्स** यांच्यामध्ये केलेला आहे. म्हणजेच **आरक्षण क्र. ९६ मधील सर्व्हे क्र. 678/2pt, 677/3B, 678/1, 677/4, 677/3A, 677/6, 574/3, 574/2, 678/3, 677/7D, 677/7A तलाठी सजा भाईंदर, जिल्हा ठाणे येथील 6000 चौ.किमी.** या जागेवरील असलेल्या मुळ आरक्षणाचा वापर बदलत असून तो **एम.आर.टी.पी कायद्याचे उल्लंघन करणारा असल्याने तो बेकायदेशिर ठरत आहे.** तसेच सदर आरक्षण बदलताना विकासकांनी मुळ आरक्षण बदलून त्याच्या इतर व्यवसायीक **सिनेमा हॉल व मॉल या करिता त्याचा एफ.एसआय., टी.डी.आर. हा अगोदरच मिळविलेला आहे.** करारनाम्या नुसार ठरविल्याप्रमाणे त्यांच्या **वास्तुविशारदाने (आर्किटेक्ट) आरक्षण विकसित करावयाचे नकाशे सर्वप्रथम महानगरपालिकेकडे सादर करून त्यानंतर इतर मोबदले घ्यावयाचे होते. परंतु, तसे झाल्याचे आढळून येत नाही.** त्या कारणास्तव या संस्थेशी, या आरक्षणावर केलेल्या बांधकामाशी संबंधित असलेले **वास्तुविशारद यांच्यावर** महानगरपालिकेने कायदेशीर कारवाई करून त्यांचे **नांव काळ्या यादीत टाकावे.**
४) **वर उल्लेख केलेल्या संस्थांचे नोंदणीपत्रक, या संस्थांची पात्रता दर्शविणारी कागदपत्र, संस्था किती वर्ष मिरा भाईंदरमध्ये कार्यरत आहे याचे पुरावे, संस्थेचा पुर्वानुभव, इत्यादी महत्वाची कागदपत्रे या करारनाम्यामध्ये करण्यात आलेल्या नाहीत.**

सदर करारनामे नोंदणीकृत करण्याकरिता **आयुक्त मिरा भाईंदर महानगरपालिका** यांना **विधीवत अधिकार नसूनसुद्धा त्यांनी हे करारनामे नोंदणीकृत केलेले आहेत.**
५) मा. स्थायी समिती सभा दि. १५/०६/२००७ द्वारे प्रकरण क्र. ६७ व ठराव क्र. ६०अ हा **ठराव** बेकायदेशिर असल्याने सर्वप्रथम तो रद्द करण्यात यावा. तसेच या ठरावात अंतर्भुत असलेले **दि. १८/०७/२००७ व दि. ३१/०७/२००७ रोजीचे नोंदणीकृत करारनामे रद्द करावेत** कारण या कराराअंतर्भुत करण्यात आलेल्या अशा आर्थिक निकषांबाबत असलेल्या अटीशर्ती यासुद्धा प्रचलित बाजारमुल्यानुसार योग्य नसल्याने संपुर्ण व्यवहारच नुसता संशयास्पद असून पुर्ण बेकायदेशिर आहे. त्यामुळे **महानगरपालिकेचे आजपर्यंतचे झालेले आर्थिक तसेच अन्य नुकसान व भविष्यात होणारे नुकसान याची सखोल चौकशी होउन नुकसानीस असणा-या संबंधित पदाधिकारी व अधिकारी म्हणजेच वरील बेकायदेशीर प्रकरणी जबाबदार असलेले विधी अधिकारी, सहा. संचालक, नगररचनाकार, व तद्कालीन आयुक्त व संबंधित पदाधिकारी यांच्याकडून व्यक्तीशः वसुल करावी व आजमितीस पदावर असलेल्या अधिका-यांस कार्यमुक्त करावे** असा ठराव मी मांडत आहे.

**सुनिता पाटील :-**

ह्या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो. सदर ठरावामध्ये पदाधिकारी असतील तर त्यामध्ये कार्यवाही व्हावी. पदाधिकारी स्टॅन्डीग कमिटीमध्ये मेंबर होते. सन्मा. सदस्य तुळशिदास म्हात्रे, खान साहेब, अगोदरचे सगळे सदस्य होते. त्यांच्यावरती पण कार्यवाही होणार का? आणि सदर ठराव हा काही हेतु परस्पर मांडलेला होता. कारण आपली आरक्षणे ११ आहेत. आणि शिवार गार्डनचे पण आरक्षण आहे. पण, त्या सगळ्या आरक्षणाला विरोध न करता फक्त ह्या चार आरक्षणाला विरोध केलेला आहे. तर, साहेब माझे असे मत आहे की, हा ठराव घेताना आमच्या गोष्टी पण विचारात घ्या. जर त्या ॲग्रीमेन्टमध्ये जर काही त्रुटी राहिल्या असतील तर त्या त्रुटी दुर कराव्या आणि जर

शासनाचे किंवा कोर्टाचे काही आदेश असतील त्याचे काही जी.आर. असतील तर ते जी.आर. तुम्ही विचारात घ्यावे. कोर्टाचे आदेश तुम्ही विचारात घ्यावे आणि त्याप्रमाणे ह्याच्यावरती थोडस रेक्टीव्हेशन करुन किंवा क्लेरीफिकेशन करुन कार्यवाही करावी. परंतु, हा ठराव कॅन्सल करु नये असे आमचे मत आहे.

**मिलन म्हात्रे :-**

ठराव मतदानाला घ्या.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. सभापती साहेब, ह्याच्यामध्ये एक सुचना ॲड करा. नगररचनांनी हे टेंडर काढलेले आहे. तर नगररचनांना ते अधिकार होते का?

**मिलन म्हात्रे :-**

तेच सर्व आले ना. ठरावामध्ये तेच आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

त्यामध्ये तुम्ही नोंद करा की, जे नगररचनाचे टेंडर काढण्याचे अधिकार नव्हते. त्यांनी ते टेंडर काढलेले आहे. तो ही मुद्दा तुम्ही त्याच्यामध्ये उल्लेख करा.

**मिलन म्हात्रे :-**

मा. सभापती साहेब, ठराव मतदानाला घ्या.

**मा. सभापती :-**

ठराव मतदानाला घ्या.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

सचिव साहेब, सन्मा. सदस्य ध्रुवकिशोर पाटील साहेब ह्यांनी जो प्रस्ताव मांडलेला आहे तो लेखी घ्यावा.

**मिलन म्हात्रे :-**

हा ठराव नाही. ह्या ठरावामध्ये जी पध्दत आहे ती चुकीची आहे. तुम्ही स्टॅन्डींगला होता. तेव्हा तुम्ही कुठे बोलला की, ॲग्रीमेन्ट असे बनवा. तुम्ही ह्याच्यामध्ये सरळ सरळ लिहलेले आहे की, कोर्टामध्ये जायचा तुम्हाला अधिकार नाही. डिस्ट्रीक कोर्ट, हाय कोर्ट, सुप्रिम कोर्ट ........

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

तो मुद्दा मी क्लीअर करतो. त्याबद्दल विधी अधिकाऱ्यांनी आपल्याला राईट अप दिले ना.

**मिलन म्हात्रे :-**

त्यांनी त्याच्यात सरळ सांगितले. आमचे काहीही नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

त्याच्यात अपेक्षा अशी होती की, ......

**मिलन म्हात्रे :-**

आर्बी ट्रेटर कोण?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

आर्बीटेशन समोर येण्याच्या पूर्वी कोणीही कोर्टात जावू नये. असे त्यांना अपेक्षित आहे.

**मिलन म्हात्रे :-**

असे कशाला? का? उद्या ऑर्बीट्रेटर जर मंत्रालयातून मॅनेज करुन आला आणि त्यांना देवून टाकले. असे कितीतरी आर्बीटेशनचे निकाल आम्ही बघितले. ऑर्बीट्रेटर म्हणजे फार महत्वाचा भाग आहे. असे नाही. तो क्लॉजच नाही टाकला पाहिजे आणि तुम्ही त्यांचे पत्र वाचले का?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सन्मा. सदस्य ध्रुवकिशोर पाटील साहेब यांनी जे विचारलेले आहे. आता ॲग्रीमेन्ट केले हे केले. फक्त जे मा. महासभेने मा. आयुक्त, मा. उपायुक्त, गटनेता यांना जी आपण मान्यता दिली त्यांच्या हिशोबाने हा ठराव आला. ॲग्रीमेन्टमध्ये काय त्रुटी घ्यावी ते स्थायी समितीच्या लोकांना माहित नाही का? ते ॲग्रीमेन्ट त्यावेळेला झाले नव्हते. आता त्यांनी जे ठराव ठेवले त्यामध्ये हे सर्व त्रुट्या महापालिकेचे नुकसान केले म्हणून त्याला कमिटी जबाबदार नाही. कारण ॲग्रीमेन्ट नंतर झाले. कमिटीकडे आलेच नाही. मग विधी सल्लागाराने ह्याच्यात खुलासा का केला? त्यांचा ह्याच्यात गैरसमज आहे.

**मा. सभापती :-**

कोणीही सभासद जबाबदार नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

म्हणून विधी सल्लागारांना पण काढावे ना. कारण .........

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

आता कोण जबाबदार आहे? कोण जबाबादार नाही म्हणण्याचा प्लॅटफॉर्म ह्या स्थायी समितीला नाही. एखाद्यात दोष असेल तर, आज आपण फायनल असेल असे म्हणता येणार नाही.

**मिलन म्हात्रे :-**

आम्ही चौकशी करु असे म्हणतो ना.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

तो चौकशीचा मुद्दा आहे. त्याच्यामुळे आज अधिकारी दोषी आहे किंवा समिती दोषी आहे. आज येथे सिध्द करणे किंवा म्हणणे हे बरोबर नाही.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही त्यांना आज कार्यमुक्त करु शकत नाही. त्यांची चौकशी करा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

हा विषय फेर प्रस्तावाचा आहे.

**मिलन म्हात्रे :-**

आम्ही आता नाही बोलत की, त्यांना काढा. रस्त्यावर आणा म्हणून. प्रत्येकाची चौकशी करा ना.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

सन्मा. सदस्य ध्रुवकिशोर पाटील साहेब, तुम्ही जो मुद्दा मांडलेला आहे ना तो कामकाजात आलेला आहे. आणि त्याला अनुमोदन दिलेले आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मी सुचना मांडली आणि सगळ्या सदस्यांना विनंती केली आहे की, माझी विनंती अशी आहे. सदर जो काही ठराव झालेला आहे आणि सदर जी काही आरक्षण डेव्हलप झालेली आहे. आणि आपण महानगरपालिकेचा जो काही पायंडा पडलेला आहे तो फर्स्ट आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

सभा कामकाज शास्त्राप्रमाणे तुम्ही सुचना मांडली आणि त्या सुचनेला अनुमोदन सन्मा. सदस्य .......

**ध्रुवकिशोर पाटील :-**

त्यांनी असे सांगितले की, मी जी सुचना मांडली ती बरोबर आहे.

**मिलन म्हात्रे :-**

ह्याच्यात त्यांचे म्हणणे काय आहे. ठराव मतदानाला टाका. सभागृहाला टर्म मिळतो. त्यांनी काय म्हटले की, एखाद्या एका व्यक्तीने जाणूनबुजून आणलेला हा ठराव आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

म्हणून म्हणतो की, तो दुसरा प्रस्तावच आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मी ठराव मांडतो आणि आम्ही तो ठराव रद्द करतो. त्याचे चार रोड आले. त्या चार मधल्या एका रोडला रद्द करा असे आम्ही म्हणत नाही. आम्ही चारही रोड रद्द करा असे बोलतो. हे रेकॉर्डवर घ्या. ठराव आहे ते बोलतात ना. तर मतदानाला ठराव टाका.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

शिवार गार्डनचे पण प्रपोजल बी.ओ.टी. तत्वार आहे. त्याचा विचार केला नाही. आणि बाकीचे आणखीन ११ आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

असु द्या ना तो आमचा प्रश्न आहे. त्या ठरावामध्ये त्याचे आरक्षणाचे उल्लेख नाही. तुम्ही सभागृहामध्ये विषय गुमराह कशाला करता? शिवार गार्डनचे ह्याच्यात उल्लेख आहे का? तेवढे बोला. मी ठरावाचे बोलतो. मी ठरावाला चॅलेन्ज केलेले आहे आणि तुमचे म्हणणे काय आहे की, सदरचा करारनाम्या बरोबर आहे म्हणून असे ठराव ठेवा. त्याबद्दल तुम्ही काही बोलत नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आम्ही असे म्हटलेले आहे की, ॲग्रीमेन्टमध्ये काही त्रुटी राहिल्या असतील आणि चुकीचे जर असतील तर बदली करुन घ्या. जर गर्व्हमेन्टचे जी.आर. असतील ते जी.आर. पण विचारात घ्या. कोर्टाचे आदेश असतील तर कोर्टाचे आदेश विचारात घ्या. आणि पाहिजे असेल तर लिगल एक्सपर्टला विचारा की, हे जे ॲग्रीमेन्ट आहे ते चुकीचे आहे की बरोबर आहे. जर याच्यामध्ये काही चुकीचे असतील तर ते रेक्टीफाय करा आणि चेंज करुन टाका हे आम्ही म्हटलेले आहे. ही आमची सुचना आहे. आणि आम्ही पण हे पण म्हटलेले आहे की, हा ठराव फक्त चार प्रपोजलसाठी आणलेला आहे. आणि आपल्याकडे ऑलरेडी ११ प्रपोजल आहेत. आणि शिवार गार्डनचे पण प्रपोजल आहे. पण त्याचा विचार न करता फक्त ..........

**मिलन म्हात्रे :-**

पुढच्या मिटींगमध्ये त्याचा ही विचार करु.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

नंतर करा. फक्त ह्या चारचाच विचार केलेला आहे. त्याच्यामुळे आम्हाला हा हेतु पुरस्कार वाटतो.

**मिलन म्हात्रे :-**

कशाला हेतु पुरस्पर वाटतो. तुम्ही सिध्द करुन दाखवा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

एक पर्टीक्युलर अँगलने तुम्ही विचार करा ना.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही सिध्द करुन दाखवा. म्हणूनच सांगतो की, ठराव मतदानाला घ्या.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

त्या मताला सन्मा. सदस्य टेरी परेराने सांगितले की, बरोबर मत आहे.

**मिलन म्हात्रे :-**

ठराव मतदानाला टाका.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, हा ठराव नाही.

**मिलन म्हात्रे :-**

सुचना नको. ठराव द्या. उगीच भाषणे बोलायचे नाही. आमचा हेतुपुरस्पर तुम्ही इलीगेशन करतात तर सिध्द करुन दाखवा. तुम्ही मला कागदोपत्री सिध्द करुन दाखवा. वाटेल तसे सभागृहात इलीगेशन करायचे नाही.

**नगरसचिव :-**

सुचना आणि अनुमोदन दिलेले आहे ना.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

म्हणजे तो प्रस्ताव झाला ना.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आम्ही सुचना मांडलेल्या आहेत. त्या सुचनेमध्ये सन्मा. सदस्य टेरी परेरा साहेबांनी सांगितले की ......

**मिलन म्हात्रे :-**

सांगितलेल नाही. अनुमोदन दिलेले आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मी ठराव मांडलेलाच नाही. तुम्ही रेकॉर्डींग ऐका मी सांगितले की, माझे मत मांडलेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

अनुमोदन रेकॉर्डवर आले.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

तो प्रस्ताव नाही. तुमची जी सुचना आहे त्याला त्यांनी अनुमोदन दिलेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

त्याच्यावर आमची हरकत अशी आहे की, त्यांनी जे माझ्यावर इलीगेशन केलेल आहे. हे हेतुपुरस्पर आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आम्ही ह्यांचे एलीगेशन केलेले नाही. तुम्ही जे ठराव मांडले त्या ठरावाला जे सपोर्ट करतील त्यांच्या विरुध्द जातील. त्यांच्यावर आहे ना.

**मिलन म्हात्रे :-**

म्हणजेच काय? आमचे हेतुपुरस्परचा अर्थ काय आहे?

**मा. सभापती :-**

एकच ठराव असल्यास मतदान घ्या असे का करता?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आम्ही ठरावाला विरोध करतो ना. ह्या ठरावाला आमचा विरोध आहे.

**मिलन म्हात्रे :-**

कराना. म्हणून सांगतो मतदान घ्या.

**नगरसचिव :-**

मी ह्या प्रकरणाच्या ठरावाचे वाचन करतो.

**प्रकरण क्र. ४० :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेकडे हस्तांतरीत झालेल्या आरक्षित जागा (बगीचे, क्रिडांगण, शाळा) विकसीत करणेकामी दिलेल्या मंजुरीबाबत फेरविचार करणे.

**ठराव :-**

तद्कालीन स्थायी समिती प्रकरण क्र. ६७ ठराव क्र. ६०अ द्वारे दि. १५/०६/२००७ रोजी निविदा मंजुरीच्या ठरावास मंजुरी देण्यात आली आहे.

१) या ठरावात मंजुर करण्यात आलेल्या निविदा या बेकायदेशीर असून तसेच त्यात **महानगरपालिकेच्या हितास तिलांजली देण्यात आलेली आहे.** सबब सदरहू ठराव क्र. ६०अ, दि. १५/०६/२००७ हा या कारणास्तव रद्द बातल करावा.

२) ह्या संपूर्ण प्रक्रीयेमध्ये ज्या **अधिकारी, पदाधिकारी व संबंधितांनी भाग घेउन या बेकायदेशीर कृत्यास खतपाणी घातलेले आहे.** व महानगरपालिकेचे हित जपलेले नाही. त्यांची **खातेनिहाय चौकशी करुन त्यानंतर त्यांच्यावर योग्य ती कायदेशीर कारवाई करावी.**

३) वरील ठरावाच्या अनुषंगाने महापालिके बरोबर केलेले लिज करार **दि. १८/०७/२००७ म्हणजेच महानगरपालिका व मे. दिपक चॅरीटेबल ट्रस्ट तसेच दि. ३१/०७/२००७ महानगरपालिका व मे. श्रीजी एक्झिबिटर्स हे दोन्ही करारनामे रद्दबातल करावे.** कारण दि. १८/०७/२००७ रोजी महानगरपालिके बरोबर मे. दिपक चॅरीटेबल ट्रस्ट या संस्थेने करार केला असून दस्त हजर केल्याचा दि. २४/०७/२००७ असा आहे. सदर करार नोंदणीकृत केलेला आहे. परंतु, **सदर करार नोंदणीकृत होण्याअगोदर म्हणजेच दि. २७/०६/२००७ रोजीच्या या संस्थेच्या पत्रामध्ये नमुद केल्याप्रमाणे सदर संस्थेस महानगरपालिकेने दि. २०/०६/२००७ रोजी म्हणजेच एक महिन्या अगोदर या संस्थेला कार्यादेश बहाल केलेला आहे.** सदर संस्थेचा पूर्वानुभव तसेच संस्थेची कार्यपध्दती नियमावली तसेच सदर संस्था वरील काम करण्यास पात्र आहे. किंवा कसे इत्यादी बाबी दर्शविणारे कोणतेही कागदपत्र या करारनाम्यामध्ये अंर्तभूत करण्यात आलेली नाहीत. सर्वात महत्वाची बाब म्हणजे त्या संस्थेचे **फक्त तीन ट्रस्टी** असून तिघांनी एकास सदर करार पूर्ण करण्यास अनुमती दिलेली आहे. या करारनाम्यातील परिच्छेद क्रमांक २३ नुसार **कोणत्याही इतर कार्यक्रमासाठी आयुक्तांची पूर्व परवानगी घेउन आरक्षित जागेचा वापर आरक्षित कारणा व्यतिरिक्त करण्याची तरतुद केलेली आहे. परंतु, तशा प्रकारचे कायदेशीर अधिकार आयुक्तांना नाहीत.** परिच्छेद क्रमांक ४३ हा संदिघ्न आहे. परिच्छेद क्रमांक ४० हा भारतीय राज्य घटनेच्या विरुध्द आहे.

**करारनामा दि. ३१/०७/२००७** रोजी नोंदणीकृत करण्यात आलेला दुसरा करारनामा हा **महानगरपालिका व मे. श्रीजी एक्झिबिटर्स** यांच्यामध्ये केलेला आहे. म्हणजेच **आरक्षण क्र. ९६ मधील सर्व्हे क्र. 678/2pt, 677/3B, 678/1, 677/4, 677/3A, 677/6, 574/3, 574/2, 678/3, 677/7D, 677/7A तलाठी सजा भाईंदर, जिल्हा ठाणे येथील 6000 चौ.मी.** या जागेवरील असलेल्या मुळ आरक्षणाचा वापर बदलत असून तो **एम.आर.टी.पी कायद्याचे उल्लंघन करणारा असल्याने तो बेकायदेशिर ठरत आहे.** तसेच सदर आरक्षण बदलताना विकासकांनी मुळ आरक्षण बदलून त्याच्या इतर व्यवसायीक **सिनेमा हॉल व मॉल या करिता त्याचा एफ.एसआय., टी.डी.आर. हा अगोदरच मिळविलेला आहे.** करारनाम्या नुसार ठरविल्याप्रमाणे त्यांच्या **वास्तुविशारदाने (आर्किटेक्ट) आरक्षण विकसित करावयाचे नकाशे सर्वप्रथम महानगरपालिकेकडे सादर करून त्यानंतर इतर मोबदले घ्यावयाचे होते. परंतु, तसे झाल्याचे आढळून येत नाही.** त्या कारणास्तव या संस्थेशी, या आरक्षणावर केलेल्या बांधकामाशी संबंधित असलेले **वास्तुविशारद यांच्यावर** महानगरपालिकेने कायदेशीर कारवाई करून त्यांचे **नांव काळ्या यादीत टाकावे.**

४) **वर उल्लेख केलेल्या संस्थांचे नोंदणीपत्रक, या संस्थांची पात्रता दर्शविणारी कागदपत्र, संस्था किती वर्ष मिरा भाईंदरमध्ये कार्यरत आहे याचे पुरावे, संस्थेचा पुर्वानुभव, इत्यादी महत्वाची कागदपत्रे या करारनाम्यामध्ये करण्यात आलेल्या नाहीत.**

सदर करारनामे नोंदणीकृत करण्याकरिता **आयुक्त मिरा भाईंदर महानगरपालिका** यांना **विधीवत अधिकार नसूनसुद्धा त्यांनी हे करारनामे नोंदणीकृत केलेले आहेत.**

५) मा. स्थायी समिती सभा दि. १५/०६/२००७ द्वारे प्रकरण क्र. ६७ व ठराव क्र. ६०अ हा **ठराव** बेकायदेशिर असल्याने सर्वप्रथम तो रद्द करण्यात यावा. तसेच या ठरावात अंतर्भुत असलेले **दि. १८/०७/२००७ व दि. ३१/०७/२००७ रोजीचे नोंदणीकृत करारनामे रद्द करावेत** कारण या कराराअंतर्भुत करण्यात आलेल्या अशा आर्थिक निकषांबाबत असलेल्या अटीशर्ती यासुद्धा प्रचलित बाजारमुल्यानुसार योग्य नसल्याने संपुर्ण व्यवहारच नुसता संशयास्पद असून पुर्ण बेकायदेशिर आहे. त्यामुळे **महानगरपालिकेचे आजपर्यंतचे झालेले आर्थिक तसेच अन्य नुकसान व भविष्यात होणारे नुकसान याची सखोल चौकशी होउन नुकसानीस असणा-या संबंधित पदाधिकारी व अधिकारी म्हणजेच वरील बेकायदेशीर प्रकरणी जबाबदार असलेले विधी अधिकारी, सहा. संचालक, नगररचनाकार, व तद्कालीन आयुक्त व संबंधित पदाधिकारी यांच्याकडून व्यक्तीशः वसुल करावी व आजमितीस पदावर असलेल्या अधिका-यांस कार्यमुक्त करावे** असा ठराव मंजुर करण्यात येत आहे.

ह्या ठरावाच्या बाजुने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. ठरावाच्या विरोधात जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. ह्या ठरावाला तटस्थ जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत.

**मा. सभापती :-**

ठरावाच्या बाजुने १० सभासद आहेत, विरोधात ३ आहेत आणि सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे यांनी मांडलेला ठराव वाचून कायम करण्यांत येत आहे.

**प्रकरण क्र. ४० :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेकडे हस्तांतरीत झालेल्या आरक्षित जागा (बगीचे, क्रिडांगण, शाळा) विकसीत करणेकामी दिलेल्या मंजुरीबाबत फेरविचार करणे.

**ठराव क्र. ३० :-**

तद्कालीन स्थायी समिती प्रकरण क्र. ६७ ठराव क्र. ६०अ द्वारे दि. १५/०६/२००७ रोजी निविदा मंजुरीच्या ठरावास मंजुरी देण्यात आली आहे.

१) या ठरावात मंजुर करण्यात आलेल्या निविदा या बेकायदेशीर असून तसेच त्यात **महानगरपालिकेच्या हितास तिलांजली देण्यात आलेली आहे.** सबब सदरहू ठराव क्र. ६०अ, दि. १५/०६/२००७ हा या कारणास्तव रद्द बातल करावा.

२) ह्या संपूर्ण प्रक्रीयेमध्ये ज्या **अधिकारी, पदाधिकारी व संबंधितांनी भाग घेउन या बेकायदेशीर कृत्यास खतपाणी घातलेले आहे.** व महानगरपालिकेचे हित जपलेले नाही. त्यांची **खातेनिहाय चौकशी करुन त्यानंतर त्यांच्यावर योग्य ती कायदेशीर कारवाई करावी.**

३) वरील ठरावाच्या अनुषंगाने महापालिके बरोबर केलेले लिज करार **दि. १८/०७/२००७ म्हणजेच महानगरपालिका व मे. दिपक चॅरीटेबल ट्रस्ट तसेच दि. ३१/०७/२००७ महानगरपालिका व मे. श्रीजी एक्झिबिटर्स हे दोन्ही करारनामे रद्दबातल करावे.** कारण दि. १८/०७/२००७ रोजी महानगरपालिके बरोबर मे. दिपक चॅरीटेबल ट्रस्ट या संस्थेने करार केला असून दस्त हजर केल्याचा दि. २४/०७/२००७ असा आहे. सदर करार नोंदणीकृत केलेला आहे. परंतु, **सदर करार नोंदणीकृत होण्याअगोदर म्हणजेच दि. २७/०६/२००७ रोजीच्या या संस्थेच्या पत्रामध्ये नमुद केल्याप्रमाणे सदर संस्थेस महानगरपालिकेने दि. २०/०६/२००७ रोजी म्हणजेच एक महिन्या अगोदर या संस्थेला कार्यादेश बहाल केलेला आहे.** सदर संस्थेचा पूर्वानुभव तसेच संस्थेची कार्यपध्दती नियमावली तसेच सदर संस्था वरील काम करण्यास पात्र आहे. किंवा कसे इत्यादी बाबी दर्शविणारे कोणतेही कागदपत्र या करारनाम्यामध्ये अंर्तभूत करण्यात आलेली नाहीत. सर्वात महत्वाची बाब म्हणजे त्या संस्थेचे **फक्त तीन ट्रस्टी** असून तिघांनी एकास सदर करार पूर्ण करण्यास अनुमती दिलेली आहे. या करारनाम्यातील परिच्छेद क्रमांक २३ नुसार **कोणत्याही इतर कार्यक्रमासाठी आयुक्तांची पूर्व परवानगी घेउन आरक्षित जागेचा वापर आरक्षित कारणा व्यतिरिक्त करण्याची तरतुद केलेली आहे. परंतु, तशा प्रकारचे कायदेशीर अधिकार आयुक्तांना नाहीत.** परिच्छेद क्रमांक ४३ हा संदिघ्न आहे. परिच्छेद क्रमांक ४० हा भारतीय राज्य घटनेच्या विरुध्द आहे.

**करारनामा दि. ३१/०७/२००७** रोजी नोंदणीकृत करण्यात आलेला दुसरा करारनामा हा **महानगरपालिका व मे. श्रीजी एक्झिबिटर्स** यांच्यामध्ये केलेला आहे. म्हणजेच **आरक्षण क्र. ९६ मधील सर्व्हे क्र. 678/2pt, 677/3B, 678/1, 677/4, 677/3A, 677/6, 574/3, 574/2, 678/3, 677/7D, 677/7A तलाठी सजा भाईंदर, जिल्हा ठाणे येथील 6000 चौ.मी.** या जागेवरील असलेल्या मुळ आरक्षणाचा वापर बदलत असून तो **एम.आर.टी.पी कायद्याचे उल्लंघन करणारा असल्याने तो बेकायदेशिर ठरत आहे.** तसेच सदर आरक्षण बदलताना विकासकांनी मुळ आरक्षण बदलून त्याच्या इतर व्यवसायीक **सिनेमा हॉल व मॉल या करिता त्याचा एफ.एसआय., टी.डी.आर. हा अगोदरच मिळविलेला आहे.** करारनाम्या नुसार ठरविल्याप्रमाणे त्यांच्या **वास्तुविशारदाने (आर्किटेक्ट) आरक्षण विकसित करावयाचे नकाशे सर्वप्रथम महानगरपालिकेकडे सादर करून त्यानंतर इतर मोबदले घ्यावयाचे होते. परंतु, तसे झाल्याचे आढळून येत नाही.** त्या कारणास्तव या संस्थेशी, या आरक्षणावर केलेल्या बांधकामाशी संबंधित असलेले **वास्तुविशारद यांच्यावर** महानगरपालिकेने कायदेशीर कारवाई करून त्यांचे **नांव काळ्या यादीत टाकावे.**

४) **वर उल्लेख केलेल्या संस्थांचे नोंदणीपत्रक, या संस्थांची पात्रता दर्शविणारी कागदपत्र, संस्था किती वर्ष मिरा भाईंदरमध्ये कार्यरत आहे याचे पुरावे, संस्थेचा पुर्वानुभव, इत्यादी महत्वाची कागदपत्रे या करारनाम्यामध्ये करण्यात आलेल्या नाहीत.**

सदर करारनामे नोंदणीकृत करण्याकरिता **आयुक्त मिरा भाईंदर महानगरपालिका** यांना **विधीवत अधिकार नसूनसुद्धा त्यांनी हे करारनामे नोंदणीकृत केलेले आहेत.**

५) मा. स्थायी समिती सभा दि. १५/०६/२००७ द्वारे प्रकरण क्र. ६७ व ठराव क्र. ६०अ हा **ठराव** बेकायदेशिर असल्याने सर्वप्रथम तो रद्द करण्यात यावा. तसेच या ठरावात अंतर्भुत असलेले **दि. १८/०७/२००७ व दि. ३१/०७/२००७ रोजीचे नोंदणीकृत करारनामे रद्द करावेत** कारण या कराराअंतर्भुत करण्यात आलेल्या अशा आर्थिक निकषांबाबत असलेल्या अटीशर्ती यासुद्धा प्रचलित बाजारमुल्यानुसार योग्य नसल्याने संपुर्ण व्यवहारच नुसता संशयास्पद असून पुर्ण बेकायदेशिर आहे. त्यामुळे **महानगरपालिकेचे आजपर्यंतचे झालेले आर्थिक तसेच अन्य नुकसान व भविष्यात होणारे नुकसान याची सखोल चौकशी होउन नुकसानीस असणा-या संबंधित पदाधिकारी व अधिकारी म्हणजेच वरील बेकायदेशीर प्रकरणी जबाबदार असलेले विधी अधिकारी, सहा. संचालक, नगररचनाकार, व तद्कालीन आयुक्त व संबंधित पदाधिकारी यांच्याकडून व्यक्तीशः वसुल करावी व आजमितीस पदावर असलेल्या अधिका-यांस कार्यमुक्त करावे** असा ठराव मंजुर करण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. मिलन वसंत म्हात्रे** **अनुमोदन :- श्रीम. सुनिता पाटील**

| ठरावाच्या बाजुने | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|
| १) गोहिल शानु जोरावरसिंग | १) पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | १) ज्योत्स्ना हसनाळे |
| २) सुनिता कैलास पाटील | २) प्रकाश पांडूरंग ठाकुर | २) राजु भोईर |
| ३) रॉड्रीक्स मॉरस जोसेफ | ३) टेरी पॉल परेरा | |

| **ठरावाच्या बाजुने** | **ठरावाच्या विरोधात** | **तटस्थ** |
|---|---|---|
| ४) म्हात्रे तुलसीदास दत्तात्रेय | | |
| ५) शफीक अहमद सादत खान | | |
| ६) शेट्टी गणेश गोपाळ | | |
| ७) मिलन वसंत म्हात्रे | | |
| ८) नयना गजानन म्हात्रे | | |
| ९) अग्रवाल ओमप्रकाश गंगाधर | | |
| १०) पाटील शरद केशव | | |

**ठराव बहुमताने मंजुर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**
प्रकरण क्र. ४१ पुर्नविनियोजन करणेबाबत. (वाहन विभाग)

**एस. ए. खान :-**
मा. सभापती साहेब, ह्याच्यामध्ये ४ लाख रु. दिलेल आहे. त्यामध्ये वाहनचा जो आपला वापर आहे. तर कुठले अधिकार करतात? मिरा भाईंदर शहरामधले राहणारे आहे की, बाहेरचे? त्याचा खुलासा करावा.

**मा. सभापती :-**
वाघ साहेब, जरा खुलासा करावा.

**एस. ए. खान :-**
तुम्ही जे वाहन दिलेले आहे. तर मिरा भाईंदरमध्ये राहणारे किती अधिकारी ह्याच्यामध्ये आहे? आणि वापर कुठे करतात? ४ लाख रु. आणखीन पाहिजे ना.

**बाबुराव वाघ (वाहन विभाग प्रमुख) :-**
ते पेट्रोलसाठी आहे.

**एस. ए. खान :-**
६५ लाख रु. ची तरतुद ऑलरेडी होती ना.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**
पेट्रोल व इंधन दुरुस्ती करीता वाहन विभागाला मुळ तरतुद ८ लाख रु. ची आहे. नोव्हेंबर अखेरपर्यंत ७ लाख ९९ हजार ५२ रु. खर्च झालेला आहे. मार्च २००७ पर्यंत अंदाजित खर्च ४ लाख ९४८ रु. आहे. तर ते ४ लाख पुर्नविनियोजन करण्याचा हा प्रस्ताव आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**
साहेब, तुम्ही मागच्या वेळेला पण सांगितलेले होते. तर तुम्ही व्यवस्थित द्याना. कोणत्या गाडीवर किती इंधन वापरले कारण आपला जी.आर. पण आहे. जसे तुम्ही रिलायन्स फोन जास्त वापरले तर तुम्ही ते पैसे वसुल करता.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**
गाडीचे सेप्रेट व्हाईस काढलेले नाही. विभागाचा आपण हा प्रस्ताव दिलेला आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**
प्रत्येक वेळी असे सांगून अवलोकनात आणायचे आहे ते आम्हाला विचारता कशाला?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**
साहेब अवलोकनाचे नाही. महापालिकेला वाहन आहे. त्याचे जे इंधन खर्च आहे.....

**ओमप्रकाश अग्रवाल :-**
ह्याच्यामध्ये तुम्ही प्रत्येक वेळी टिपणी देत नसाल. फक्त आज चार लाख रू. द्यावे. त्याच्यातून......

**शरद पाटील :-**
गाडी वॉईस काढून आणा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**
गाडी वाईस ची चर्चा इथे करायची? तुम्ही त्यांना माहिती द्या ती माहिती सर्वांना दिली जाईल.

**एस. ए. खान :-**
मिरा भाईंदर शहरामध्ये किती अधिकारी राहतात.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सोा.) :-**

मग वाहने बंद पडतील. ॲम्बुलन्स आहे सर्व वाहने आहेत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

जेव्हा पेपरच्या जाहिरातीमध्ये विषय निघाला. त्यावेळी पण हीच गोष्ट बाकी होती. कुठल्या वर्तमान पत्रामध्ये....

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.):-**

आम्ही डिटेलमध्ये माहिती दिली.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

नंतर देता ना. आधी तुम्हाला माहित आहे. मग मागितल्यावर का देत नाही?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.):-**

मला वाटले की, तुमच्या सर्वांचे कामकाजावर विश्वास आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मागच्यावेळी स्थायी समितीने विश्वास दाखवला म्हणून तर हे झाले. म्हणून ठराव मागायची पाळी आली ना.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.):-**

प्रत्येक ठिकाणी तसे नसते.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, इंधनावर जर बोलायचे झाले तर तुम्हाला कोणी बंधन घातलेले नाही. आपल्या इकडच्या अधिका-यांच्या गाड्या शनिवारी जातात शनिवार-रविवार ठाण्याला जातात. त्या अधिका-यांना मी नाही त्या ठिकाणी बघितलेले आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.):-**

माझी जी चर्चा झाली ना. ते १७ हजार रू १५ हजार रू. चे त्याचे आम्ही थोड्या दिवसात प्रश्न उपस्थित करणार आहे.

**मिलन म्हात्रे :-**

माझे म्हणणे मी शॉर्टमध्ये बोलतो. साहेब आम्ही तुम्हाला परवानगी देवू. पण त्या गाड्या किती फिरतात. माहितीच्या अधिकारामध्ये एका ॲम्बेसिटर गाडी ही दिवसाला किती कि.मी. चालली पाहिजे. तुम्ही जरा मला क्लेरिफिकेशन द्या आणि वाहन विभागाने द्यावे. त्यांच्या सहीचे माझ्याकडे असे एक पत्र आहे की, मिरा भाईंदर महानगरपालिकेची गाडी एक दिवसामध्ये भाईंदर ते उत्तन ५०० कि.मी. चालली जाते. त्यांनी नाही सांगितले. मग मी कागद देतो. आपण जिल्हाधिकारी कार्यालयाला उल्हासनगर महानगरपालिकेच्या सार्व. निवडणूकीकरिता एक गाडी जिल्हाधिकारी कार्यालय अधिका-याकडे दिली. ती गाडी त्यांच्याकडे सहा महिने होती. महाराष्ट्रातली सगळी हिल स्टेशन तो अधिकारी फिरून आला आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.):-**

विषय झाला ना.

**मिलन म्हात्रे :-**

विषय कुठे झाला? रेकॉर्ड वरती मला दाखवा. तुम्ही मला सांगा. रणखांब साहेब असताना मी तक्रार केली होती. त्याचा कोणी शोध घेतला का? त्याला जबाबदार कोण आहे? तुम्ही चार लाख रू. बोलणार आणि आम्ही मंजुरी देणार. आज आमच्या गाड्या कलेक्टर ऑफिसला सहा सहा महिने पडून आहे. तर त्याचे काय घेणे देणे आहे ते जरा सांगा. ठिक आहे. इलेक्शनच्या कामाला मागवल्या इलेक्शन संपले निकाल झाल्यानंतर दहा दिवस. त्याच्यानंतर आमच्या गाड्या पाहिजे की नाही. टायर आम्ही टाकायचे, ड्रायव्हर आमचा, इंधन आम्ही टाकायचे, मॅकेनिक आमचा, गॅरेजचा खर्च आम्ही करायचा. निवडणूकीमध्ये पत्र आल्याबरोबर तुम्ही तुमच्या गाड्या लगेच त्याला ताब्यात देता. त्या आदेशामध्ये आहे. निवडणूक संपल्यानंतर....

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.):-**

मतदान यादीच्या निवडणूकीच्या कामासाठी कलेक्टर ऑफिसला गाडी गेली नव्हती.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्हाला असे कोण बोलले? तुम्ही तसे बोला मी ते बोलत नाही. मी उदा. देतो.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.):-**

आता कलेक्टर ऑफिसकडे आपल्या गाड्या नाही.

**मिलन म्हात्रे :-**

मी ते बोलतो. कारण त्यावेळेला सुद्धा आम्ही खर्चाच्या परवानगी दिली होती आणि गाड्या दुसरीकडे चालत होत्या. मा. सभापती साहेब तुम्ही जे आता निर्णय द्याल. त्याच्यामध्ये काहीतरी बंधन टाकावे कोणी कुठेही वापरते. पदाधिकारी जे असतील त्यांच्या बायका पोर फिरतात. कोणी बाजाराला जाते. कोण कुठे जाते? हे काय चाललेले आहे. तुमचे रिस्ट्रीक्शन ऐका हायकोर्टच्या ऑर्डर नुसार तुमच्या मेंटेन करायचे आहे. तुमचे लॉग बुक आहे का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.):-**

मागच्या बैठकी मध्ये सन्मा. सभापती साहेबांनी निर्देश दिलेले आहे. या महापालिकेने कर्मचाऱ्यांसाठी, पदाधिकाऱ्यांसाठी, खुप चांगली योजना आखलेली आहे. स्वतःचे वाहन वापरून तो जे नियमाप्रमाणे अनुज्ञेय भत्ता आहे. ते घ्यायचे आणि त्याबाबतची कार्यवाही सर्व पदाधिकारी अधिकारी करण्याच्या स्टेजमध्ये आहे. काहीने केलेले सुद्धा आहे.

**मिलन म्हात्रे :-**

ह्याच्यामध्ये कोणी केले. ज्या वॉर्ड ऑफिसरला तुम्ही १३ हजार रू. देता ते अधिकारी महानगरपालिकेचे १३ हजार रू. घेतात. त्याच्यात गाडीच्या इंस्टॉलमेंट भरतात. पण त्या शहरामध्ये कुठेही फिरत नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.):-**

प्रत्येकाने गाडी वापरा.

**मिलन म्हात्रे :-**

त्याचे कि.मी. कोणी चेक केले.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.):-**

ते वाहन विभाग करेल ना.

**मिलन म्हात्रे :-**

१३ हजार रूपया वरती १४ हजार रू. बिल आले. १ हजार रू. आम्ही वसुल केले. तर मेहरबानी नाही केली. शहराकरिता केलेला खर्च नाही. आज आमच्या प्रभाग अधिकाऱ्यांना चार महिने झाले. वॉर्डमध्ये बघितले नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.):-**

दिवटे साहेब ज्यांना आपण हे देतो ना तर त्याचे लॉग बुक मागवून घ्यावे.

**मिलन म्हात्रे :-**

महापालिकेच्या प्रोव्हीजनाकरिता तुम्ही १३ हजार रू. दिले. खाजगी गाडी असु द्याना.

**नयना म्हात्रे :-**

मा. सभापती साहेब, आज आपण वॉर्ड ऑफिसरला गाड्या दिल्या. त्यांना १३ हजार रू.देतो. पण ते १३ रू. चे पण काम करत नाही. इलेक्शन होउन सहा महिने झाले तो वॉर्ड ऑफिसर आमच्या वॉर्डमध्ये बघायला पण येत नाही. त्या वार्ड ऑफिसरला असे पण माहित नसेल की, ह्या वॉर्डमध्ये मुकादम कोण आहे?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.):-**

सन्मा. सदस्य म्हात्रे साहेब, ह्याच्यामध्ये वाहन विभागाचे मा. उपायुक्त साहेबांनी माझी चर्चा झाली. त्याच्यामध्ये शासनाचे जे निर्देष आहे. जे फिक्स रक्कम आहे ती फिक्स रक्कम द्यायची. पण त्याच्या प्रतिकृती त्यांचे लॉग बुक घेण्याची तरतुद नाही. असे म्हणतात. तर आपण ते तपासून घेवू.

**मिलन म्हात्रे :-**

कोणाची?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.):-**

आपण म्हणतात ना  की १३ हजार रू. किंवा १० हजार रू. देतो त्याच्याबद्दल त्यांनी महिन्यात गाडीत किती रन अप केले? ते तपासून बघावे. त्यांना आपण पैसे देतो ना. त्यांनी किती.....

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, ज्यावेळेला तुम्ही रक्कम देता ना. त्या तरतुदी बघायच्या नसतात. हिशोब बघुनच पैसे द्यायचे असतात. तुमचे म्हणणे असे आहे की, १३ हजार रू. खर्च आम्ही करायचे. अधिकाऱ्यांनी एक महिना रजेवर रहायचे. रजेवर असलेल्या अधिकाऱ्यांनी पण पैसे घेतलेले आहे. तशी तरतुद आहे. तुम्ही विड्रॉल केले. तरतुद आहे का? अधिकारी रजा टाकून गावी पळतात १५-१५ दिवस गावी राहतात आणि महिन्याच्या शेवटच्या तारखेला तुमच्याकडून बरोबर पैसे घेतात.

**ओमप्रकाश दिवटे (मा. उपायुक्त सो.) :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने मी एक निवेदन करू इच्छितो.सदर शासन निर्णयाप्रमाणे जी तरतुद आहे. त्याच्यामध्ये ठोक रक्कम निश्चित करून दिलेली आहे. की, कोणी किती कि.मी. फिरले किंवा नाही फिरले हे आपण बघायची आवश्यकता नाही. तथापी आपण जी म्हणता रजा, रजेच्या संदर्भात असे की, किती दिवसाची रजा असली तर त्याला किती रक्कम मिळेल. ह्या संदर्भातली ती तरतुद आहे. त्या तरतुदीचे पालन माझ्या माहितीप्रमाणे आपण करतो. जर तसे होत नसेल तर त्याप्रमाणे तपासून कडकपणे त्या तरतुदीची आपण अंमलबजावणी निश्चित करू.

**मिलन म्हात्रे :-**

तुमच्या स्वतःच्या लॉग बुक तरी ठिकाणावर आहे का? साहेब, तुम्ही आता नविन आलेले आहात.

**ओमप्रकाश दिवटे (मा. उपायुक्त सो.) :-**

मी शासन निर्णय संदर्भातले बोलतो.

**मिलन म्हात्रे :-**

असु द्या. आम्हाला ऐकून काय करायचे आहे त्यांनी १३ हजार रू. सांगितले आणि अधिकारी फिरला नाही. तर आमचे पैसे फुकट जातात.

**ओमप्रकाश दिवटे (मा. उपायुक्त सो.) :-**

ह्या शासन निर्णया संदर्भात जो शासन निर्णय आहे तो मी सन्मा. सभागृहाला सांगितला.

**मिलन म्हात्रे :-**

शासन निर्णय आणि फि रक्कम, गावाच्या विकासा करिता आणि कामाकरिता खर्च करा असे लिहिले.

**ओमप्रकाश दिवटे (मा. उपायुक्त सो.) :-**

शासन निर्णयामध्ये जे लिहिले. त्याबाबत मी बोलतो.

**मिलन म्हात्रे :-**

शासन निर्णय मी दहा वेळा वाचले. त्याच्यावर माझा केस लॉग आहे. त्याच्यावर मी कोर्टात केस ही केले. शासन निर्णयात तुमच्या कामाकरिता पैसे दिलेले आहे. तुम्ही असे कसे म्हणता. जर काम होत नसेल तर आम्ही का द्यायला पाहिजे? तुम्ही फक्त त्याचे बोला.

**ओमप्रकाश दिवटे (मा. उपायुक्त सो.) :-**

ह्या संदर्भात ह्या तरतुदी आहे. त्या तरतुदी तपासुन....

**मिलन म्हात्रे :-**

एखादा अधिकारी १३ हजार रू. घेवून आमच्या महानगरपालिकेच्या कामाकरिता फिरत नसेल. मोबाईल फोन त्यांना देवून सुद्धा ते मोबाईल फोन वापरत नसतील बंद करत असतील तर ती सेवा आम्हाला कशासाठी पाहिजे.

**ओमप्रकाश दिवटे (मा. उपायुक्त सो.) :-**

ह्या संदर्भातल्या परिणाम कारक मधल्या तरतुदी अवलंबीत केल्या जात नसतील त्या शासन निर्णया मधल्या सर्व तरतुदीचा अवलंब करून घ्या पुढे संबंधितांची अदायगी ही केले जातील.

**मिलन म्हात्रे :-**

सांगायचा दृष्टीकोन असा की, अधिकारी येथे वेस्टलाच राहतात समोर ऑफीसला येतो. पण प्रभागात फिरत नाही. १३ हजार रू. मात्र बरोबर घेतात. आतातुमचे घर ठाण्याला आहे. आम्ही समजु शकतो की ३५ – ४० कि. मी. फिरायला लागते पण समोर ऑफिस समोर घर स्वतःची गाडी महानगरपालिकेचे १३ हजार रू. तुम्ही घ्या. पण वॉर्डात तर फिरा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, अजिबात फिरत नाही. आमचा प्रभाग अधिकारी अजिबात फिरत नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.):-**

तुम्ही फिरत नाही का? भरपुर फिरा सर्व सदस्यांकडे फिरा आपले पुर्ण कामकाज बघायचे....

**ध्रुवकिशोर पाटील :-**

हेमंत पाटील साहेब, तुम्ही काय कुठे फिरता ते जरा सांगा. तुम्ही कुठे राउन्ड अप ला गेले होता ते जरा सांगा.

**मिलन म्हात्रे :-**

मा. सभापती साहेब, असे आहे की, तुम्ही एक लॉग बुक ठेवा. आरोग्यामध्ये असे आहे की, आमच्याकडे जे काम होते. नगरसेवक या नात्याने मी त्याच्यावर सही करून देतो. तर हे काम पुर्ण झाले जसे फायर ब्रिगेड चा कॉल गेला....

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.):-**

दिवटे साहेबांनी सांगितले ना की, महापालिकेच्या गाड्या आहेत आणि प्रत्येकाला लॉग बुक आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

लॉग बुक नाही. मी काय बोलतो ते पूर्ण ऐकून घ्या. समजा माझ्या वॉर्डमध्ये बत्त्या नाही पाण्याची परिस्थिती आता वाईट आहे. तर प्रभाग अधिका-यांनी फेरी मारलेली नाही. आमच्याकडे पद्धत असे ठेवले की, आम्ही रजिस्टर ठेवलेले आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.):-**

त्या अधिका-यांनी वर्क शिट ठेवावे. जिथे जिथे राउन्ड अप केलेले आहे त्या दिवसाचे त्यांनी वर्क शिट मेंटेन करावे उद्या कोणी काही बोलले तर, दाखवायला पाहिजे. त्याला आपण रोजनीश म्हणतो. जो अहवाल प्रत्येकानी रोजनिशी लिहावा.

**मिलन म्हात्रे :-**

रूलिंग तुम्ही द्यायची आहे.

**ध्रवकिशोर पाटील :-**

साहेब, ज्याप्रमाणे बांधकाम विभाग आपली रोजनिशी ठेवते तसे प्रत्येकाने ठेवावा.

**मिलन म्हात्रे :-**

आणि आमच्या सह्या घ्या ना. आज प्रभाग अधिकारी घेवून गेले.

**ध्रवकिशोर पाटील :-**

सह्या नाही पण ॲटलिस्ट टाईम सांगा ना.

**मिलन म्हात्रे :-**

कोणाल वाईट वाटत असेल तर आम्ही द्यायला तयार आहोत. उद्या अधिकारी खोटे बोलतात मी म्हणतो ना करावे. आम्ही आमच्याकडे रजिस्टर ठेवलेले आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.):-**

एखाद्यांनी सही दिली नाही.

**मिलन म्हात्रे :-**

नको ना.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.):-**

म्हणणार की आम्ही आलोच नाही.

**मिलन म्हात्रे :-**

उद्या जर तसे झाले तर की अधिकारी...

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.):-**

एवढे अधिका-याकडून अपेक्षित नाही.

**मिलन म्हात्रे :-**

माझ्याकडे मी ठेवलेले आहे. तशी पद्धत करावी. बाकीचे मला माहित नाही. आमच्याकडे अधिका-यांनी भेट दिली तर आम्ही सही घेतो.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.):-**

सफाई कामगारांचे जे मुक्कादम आहे. आपण त्या त्या वस्तू...

**मिलन म्हात्रे :-**

प्रश्न तसा नाही. प्रभाग अधिका-याला जेव्हा आम्ही पैसे देतो. त्यावेळेला तुमचे प्रभाग अधिकारी फे-या मारत नाही. ते कोण रेक्टीफाय करणार.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

मा. सभापती साहेब, प्रभाग अधिका-यांनी ज्या वॉर्डमध्ये येतील त्या वॉर्डच्या संबंधित नगरसेवकांना कल्पना द्यावी की आज आम्ही तुमच्या वॉर्डामध्ये आहोत. म्हणजे दोघांची समक्ष पाहणी वॉर्डमध्ये व्हावी. आणि कोऑर्डीनेशन राहिल.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.):-**

एखाद्या वॉर्डमध्ये अधिकारी जात असेल तर त्यांनी त्या त्या सदस्यांना सांगायला हरकत नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

भाईंदर वेस्टला आमचे वॉर्डपण छोटे आहेत. पाच मिनिटात एका वॉर्डमध्ये फेरी होईल.

**मिलन म्हात्रे :-**

एका रस्त्याने गेलात तर तीन वॉर्ड पूर्ण होतात. तरी सुद्धा फिरत नाही. गटारे सगळी गचागच भरले. दुनियाची मच्छर चावतात. कोणाचे लक्ष नाही. १३ हजार रु. पाहिजे. १७ हजार रु. पाहिजे सरकारी नियमानुसार.

**मिलन म्हात्रे :-**

आपल्या विषयावर मंत्रालयाच्या एक इन्क्वायरी बसले हायकोर्ट च्या नियमानुसार आणि तिकडून तुमच्याकडे डायरेक्शन यु.डी. २४ तारखेला आलेले आहे. त्यांनी पी.डब्ल्यू.डी. चा एक नॉर्म्स दिले. खर्चावरती किती खर्च करावा. हे युडीला चालले म्हणजे आपले अंडर इन्क्वायरी आहे. ॲज पर हाय कोर्ट ऑर्डर. त्याच्यामध्ये नेमके काय झाले ते बघा. आणि त्यांचे डायरेक्शन काय येतात. सब्जेक्ट टू दॅट कंडीशन्स.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) साो.):-**

जे काही शासनाचे धोरण, निर्देष असतील त्याच्या अधीन...

(सन्मा. सदस्या शानु गोहिल यांनी प्रकरण क्र. ४१ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

मिरा भाईंदर महानगरपालिका अर्थसंकल्प सन २००७-०८ वाहन विभागा अंतर्गत इतर कर, कर वि. - ६ पेट्रोल इंधन व दुरूस्ती या लेखाशिर्षा अंतर्गत सर्व विभागातील वाहनांची दुरूस्ती तसेच इंधन पुरवठा करणे कामाची देयके प्रदान करण्यात येतात. सदर लेखाशिर्षा अंतर्गत तरतुद संपुष्ठात आलेली आहे. तरी इंधन पुरवठा ठेकेदारास वेळेवर इंधनाचे देयक न दिल्यास अत्यावशक सेवेत येणा-या वाहनांना इंधन पुरवठा वेळेवर होणार नाही. तरी फ संकिर्ण (१७) खाजगी गाड्या भाड्याने घेणे या लेखाशिर्षातुन इतर कर, कर (६) पेट्रोल, इंधन, दुरूस्ती या लेखाशिर्षात वर्ग करून उपलब्ध करणे आवश्यक आहे.

**नमुना क्र. १०**
**नियम ३० (३) पहा**

| अ.क्र. | लेखाशिर्ष | मुळ तरतुद | नोव्हेंबर अखेर २००७ पर्यंत झालेला खर्च | होणारा अंदाजित खर्च (माहे मार्च २००८) पर्यंत | उपलब्ध शिल्लक |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | फ - संकिर्ण (१७) खाजगी गाड्या भाड्याने घेणे | ६५००००० | ४५२४९०२ | १५७५०९८ | ४००००० |

| लेखाशिर्ष | मुळ तरतुद | नोव्हेंबर अखेर २००७ पर्यंत झालेला खर्च | होणारा अंदाजित खर्च (माहे मार्च २००८) पर्यंत | प्रस्तावित वाढीची रक्कम |
|---|---|---|---|---|
| ७ | ८ | ९ | १० | ११ |
| इतर कर, कर वि. - ६ पेट्रोल इंधन व दुरूस्ती | ८००००० | ७९९०५२ | ४००९४८ | ४००००० |

सन २००७-०८ च्या अर्थसंकल्पीय अंदाज पत्रकात फ संकिर्ण - १७ खाजगी गाड्या भाड्याने घेणे या लेखाशिर्षाखाली असलेल्या तरतुदीतून झालेला खर्च व माहे मार्च २००८ पर्यंत होणारा खर्च अंदाजित खर्च रू. १५,७५,०९८/- गृहीत धरला असता उर्वरीत शिल्लक रू. ४,००,०००/- इतर कर, कर विभाग - ६ पेट्रोल इंधन दुरूस्ती या लेखाशिर्षाखाली वर्ग करणेस शासन परिपत्रकानुसार कार्यवाही करणेस ही सभा मंजुरी देत आहे.

**सुनिता पाटील :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ४१ :-**

पुर्नविनियोजन करणेबाबत. (वाहन विभाग)

**ठराव क्र. ३१ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका अर्थसंकल्प सन २००७-०८ वाहन विभागा अंतर्गत इतर कर, कर वि. - ६ पेट्रोल इंधन व दुरूस्ती या लेखाशिर्षा अंतर्गत सर्व विभागातील वाहनांची दुरूस्त्ी तसेच इंधन पुरवठा करणे कामाची देयके प्रदान करण्यात येतात. सदर लेखाशिर्षा अंतर्गत तरतुद संपुष्ठात आलेली आहे. तरी इंधन पुरवठा ठेकेदारास वेळेवर इंधनाचे देयक न दिल्यास अत्यावशक सेवेत येणाऱ्या वाहनांना इंधन पुरवठा वेळेवर होणार नाही. तरी फ संकिर्ण (१७) खाजगी गाड्या भाड्याने घेणे या लेखाशिर्षातुन इतर कर, कर (६) पेट्रोल, इंधन, दुरूस्ती या लेखाशिर्षात वर्ग करून उपलब्ध करणे आवश्यक आहे.

**नमुना क्र. १०**
**नियम ३० (३) पहा**

| अ.क्र. | लेखाशिर्ष | मुळ तरतुद | नोव्हेंबर अखेर २००७ पर्यंत झालेला खर्च | होणारा अंदाजित खर्च (माहे मार्च २००८) पर्यंत | उपलब्ध शिल्लक |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | फ - संकिर्ण (१७) खाजगी गाड्या भाड्याने घेणे | ६५००००० | ४५२४९०२ | १५७५०९८ | ४००००० |

| लेखाशिर्ष | मुळ तरतुद | नोव्हेंबर अखेर २००७ पर्यंत झालेला खर्च | होणारा अंदाजित खर्च (माहे मार्च २००८) पर्यंत | प्रस्तावित वाढीची रक्कम |
|---|---|---|---|---|
| ७ | ८ | ९ | १० | ११ |
| इतर कर, कर वि. - ६ पेट्रोल इंधन व दुरूस्ती | ८००००० | ७९९०५२ | ४००९४८ | ४००००० |

सन २००७-०८ च्या अर्थसंकल्पीय अंदाज पत्रकात फ संकिर्ण - १७ खाजगी गाड्या भाड्याने घेणे या लेखाशिर्षाखाली असलेल्या तरतुदीतून झालेला खर्च व माहे मार्च २००८ पर्यंत होणारा खर्च अंदाजित खर्च रू. १५,७५,०९८/- गृहीत धरला असता उर्वरीत शिल्लक रू. ४,००,०००/- इतर कर, कर विभाग - ६ पेट्रोल इंधन दुरूस्ती या लेखाशिर्षाखाली वर्ग करणेस शासन परिपत्रकानुसार कार्यवाही करणेस ही सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्रीम. शानु गोहिल.** **अनुमोदनः- श्रीम. सुनिता पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**
**ठराव वाचुन कायम करण्यात आला**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा- भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिव यांनी प्रकरण क्र. ४२ चे वाचन केले.)

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ४२, मा. आयुक्त यांनी मंजुर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे. दुर्गंधीनाशक बायोकल्चर, बायोस्टॅबिलायझर ही दुर्गंधीनाशके पुरवठा करणे. (आरोग्य साफसफाई विभाग)

**नयना म्हात्रे :-**

मा. सभापती साहेब मला माझे अजुन उत्तर भेटले नाही. कारण, हेमंत पाटील साहेबांनी माझ्या वॉर्डमधल्या आरोग्याची माणसे टॅक्स डिपार्टमेंटला घेवून गेले तर ते मला चालणार नाही. त्यांनी मला त्याचे उत्तर द्यावे. कारण सहा महिने पासुन माझे पत्र आहे की, मला आरोग्याची माणस वाढवून द्या. तर मला आरोग्याची माणसांनी अद्याप पर्यंत मला माणस वाढवून दिली नाही. की, मा. आयुक्त साहेब नाही म्हणून तर मा. आयुक्त साहेब नाही तर शहराची साफ सफाई होणार नाही का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.):-**

तात्पुर्त्या कामासाठी घेतलेले आहे.

**नयना म्हात्रे :-**

तात्पुर्त्या कामासाठी घेतले. तर आम्हाला त्याची गरज पडली नाही. तर तुम्ही अशी माणस आम्हाला पण द्या. साहेब, गेल्या दोन वर्षापासुन माझा माणूस घेतलेला आहे. त्याची मी माझ्याकडे हजेरी लावत नाही.

**हेमंत पाटील :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो. ज्या कर्मचाऱ्यांनी पहिला काम केलेले होते. त्या सफाई कर्मचाऱ्यांनी मागे कामे केली होती. आणि वसुली वाढवली होती. उत्तन मध्ये वसुली कमी आहे. म्हणून मार्च पर्यंत त्या दोघांची बदली केलेली आहे. तथापी तुमच्या वॉर्डमध्ये जे आहे तिचे पर्यायी व्यवस्था करून देणार.

**नयना म्हात्रे :-**

तुम्हाला माझे सहा महिन्यापासुन पत्र आहे. तर, तुम्ही मला माणस वाढवून दिली का? साहेब, तीन माळ्याची माझी शाळा आहे. त्याठिकाणी मला आरोग्याची माणसे पाठवावी लागतात. त्यामुळे मला माणस दिली का? मग तुम्ही माझ्या वॉर्ड मधुन माणस कशाला नेता. तुम्ही माझ्या वॉर्डमधुन माणस न्यायची नाही.

**मा. सभापती :-**

मी हेमंत पाटील साहेबांना सांगतो की, तुमची माणस तुमच्या वॉर्डमध्ये ठेवू द्या. पाणीपट्टी आणि कर विभाग यांनी किती वसुली केली याचा अहवाल पुढच्या सभेला आणावा.

**प्रकरण क्र. ४२ :-**

मा. आयुक्त यांनी मंजुर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे. दुर्गंधीनाशक बायोकल्चर, बायोस्टॅबिलायझर ही दुर्गंधीनाशके पुरवठा करणे. (आरोग्य साफसफाई विभाग)

**ठराव क्र. ३२ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात दैंनदिन निर्माण होणाऱ्या घनकचऱ्यावर मौजे उत्तन व पाली येथे घनकचऱ्यावर प्रक्रिया करुन खत निर्मिती व तद अनुषंगाने इतर पदार्थ प्राप्त करण्याच्या प्रकल्प उभारणीचे काम प्रगतीपथावर आहे.

महापालिका क्षेत्रात सध्या दैंनदिन निर्माण होणारा घनकचऱ्यावर शास्त्र शुध्द पध्दतीने विल्हेवाट लावण्याकरिता जागा उपलब्ध नाही याकरिता नवघर येथे खाजगी जमीन मालकाची परवानगी घेउन दैंनदिन निर्माण होणारा घनकचरा टाकण्यात येतो. सदर घनकचऱ्यातुन मोठ्या प्रमाणात दुर्गंधी येत असल्याने त्यावर दुर्गंधीनाशक बायोकल्चर, बायोस्टॅबीलायजर टाकणे, गरजेचे होते.

मा. आयुक्त यांच्या मंजुरीने बायोकल्चर व बायोस्टॅबीलायजर ही दुर्गंधीनाशके पुरवठा करणेकामी जाहीर निविदा मागवून सर्वात कमी दराची निविदा सादर केलेला निविदाकार **मे. इको सेव सिस्टीम प्रा. लि.** यांचे दर मा.

आयुक्त यांनी मंजुर केले आहेत. मा. आयुक्त यांनी मंजुर केलेल्या दरास आरोग्य विभागाने ३००० किलो बायोकल्चर व १०० लीटर बायोस्टॅबीलायजर खरेदी केले या कामी १,३७,४००/- खर्च झाला आहे. सदर खर्चास मा. आयुक्त यांनी मंजूरी दिली आहे.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य/सदस्या, अधिकारी/पदाधिकारी व कर्मचारी वर्ग, आजची सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडल्या त्याबद्दल आपणा सर्वांचे आभार मानून आजची सभा संपली असे जाहिर करतो.

**सभा संपल्याची वेळ :- दु. ०२.५५ वा.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**